# एस . वाय . बी . कॉम .

# उद्योजकता विकास

# (Entrepreneurship Development)

**NMU/IDEAL/२२/हस्तदेय/२०१४** **दि. ०१/११/२०१४**

**आयडीयलमध्ये द्वितीय व तृतीय वर्षास प्रवेशित पदवी व पदव्यूत्तर शिक्षणक्रमाचे प्रिय विद्यार्थी ...**

**विषय :- स्वयं अध्ययन साहित्याबाबत ...**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आपणांस देण्यात येणाऱ्या स्वयं अध्ययन साहित्याच्या छपाईसाठी मोठ्या प्रमाणात तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे **आपणांस शिक्षणक्रमानुसार छपाई केलेली पुस्तके सध्या उपलब्ध करुन देऊ शकत नाही. त्याऐवजी सदर शिक्षणक्रमांतर्गत असलेल्या अध्ययन साहित्याची सि.डी. मात्र आपणांस आम्ही उपलब्ध करुन देत आहोत.** सदर सि.डी.तील मसुद्याचे अंतीम संपादन होणे बाकी आहे त्यामुळे व्याकरणदृष्ट्या व अंशत: आशयासंदर्भात काही त्रुटी असण्याची शक्यता आहे. परंतू, आपले शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठाने आपल्या शिक्षणाच्या दृष्टिने सदरचा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी दिलेल्या सि.डी. द्वारे आपण आपला अभ्यास नियमीत करावयाचा आहे. ज्या शिक्षणक्रमांतर्गत स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध होणार नाही त्याची यादी संकेत स्थळावर टाकलेली आहे.

**सदर शिक्षणक्रमांतर्गत प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर डिसेंबर २०१४ च्या तीसऱ्या आठवड्यानंतर आपल्या संपर्क संत्रांचे आयोजन तीनही जिल्ह्यातील अभ्यासकेंद्रांवर करण्यात येईल.** त्यासंबंधीची माहिती आयडीयलच्या संकेत स्थळावर (www.nmu.ac.in/ideal.html) उपलब्ध करुन देण्यात येईल. सध्या संकेत स्थळावर विषयनिहाय ज्या अभ्यासकेंद्रांच्या नावांची यादी दिलेली आहे त्या अभ्यासकेंद्रांवर त्याच विषयांची संपर्क सत्रे होतील. आयडीयलद्वारे वेळोवेळी आपणापर्यंत पोहोचविण्यात आलेली माहिती व निर्णय सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. याची कृपया नोंद घ्यावी व आयडीयल विभागास सहकार्य करावे.

**संचालक**

**आयडीयल, उमवि, जळगाव**

# घटक १
## उद्योजकता
## *Enterpreneurship*

अनुक्रमणिका


१.० उदिष्टे
१.१ प्रास्तावना
१.२ विषय विवेचन
 १.२.१ उद्योजकता– व्याख्या व संकल्पना
 १.२.२ उद्योजकतेचे स्वरूप
 १.२.३ उद्योजकतेचे महत्व
 १.२.४ उद्योजकतेची उत्क्रांती
 १.२.५ उद्योजकतेची वैशिष्टये
 १.२.६ उद्योजकाच्या अंगी असणारे गुण
 १.२.७ उद्योजकांची कार्ये
 १.२.८ नेतृत्व व उद्योजक
१.३ परिभाषिक शब्द
१.४ स्वयं अध्ययन प्रश्न
१.५ सारंश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### १.० उदिष्टे

या घटकाच्या अध्यायनानंतर तुम्हाला............

- ❖उद्योजकतेचे वर्णन करता येईल.
- ❖ उद्योजकतेचे स्वरूप व महत्व नमुद करता येईल.
- ❖ उद्योजकतेची उत्क्रांती विशद करता येईल.
- ❖उद्योजकाच्या अंगी असणाऱ्या गुणाची महिती देता येईल.
- ❖ उद्योजकांची कार्ये स्पष्ट करता येईल.
- ❖ नेतृत्व व उद्योजकाचे वर्णन करता येईल.

## १.१ प्रस्तावना

उद्योजकता ही संज्ञा फार प्राचीन काळापासुन प्रचलीत आहे. परंतु अलिकडे व्यवस्थापनेला जेवढे महत्व प्राप्त झालेले आहे तेवढच महत्व उद्योजकतेला सुध्दा आहे.उद्योजकता ही संज्ञा विकसीत आणि अविकसीत देशात प्रचलीत आहे. परंतु त्या त्या देशातील उद्योजकांनी उद्योजक होण्यासाठी अंवलबलेली प्रकिया मात्र समान आहे. उद्योजकतेत उद्योजकाचे कौशल्य, गुण, त्यांने केलेले धाडस व संशोधन कृती यांचा समावेश होतो.उद्योजक आपल्या व्यवसायात सतत कार्यरत असतो.त्याला त्याच्या कार्यातच उद्योजकीय शिक्षण प्राप्त होत असते. तर काही उद्योजक पंरपरागत पद्वतीतुन पुढे आलेले असतात व काही उद्योजक उद्योजकीय प्रशिक्षण घेऊन विविध ज्ञानशाखा मार्फत ज्ञान प्राप्त करून उद्योजक झालेले असतात. अलिकडे उद्योजकांना अभिप्रेरण देण्यासाठी अनेक संस्थानी पुढाकार घेतलेला आहे, कारण मागासलेल्या भागाचा विकास व्हावा,लोकांन मध्ये स्वयंरोजगार करण्याची वृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने लहान लहान उद्योजकांना प्रोत्साहन देऊन उद्योजक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. आर्थिक विकास हा औद्योगिक विकासावर अवलंबून असतो. देशाचा विकास हा औद्योगिकरणाचा वेगावर व औद्योगीकरणाचा वेग उद्योजकांच्या कार्यक्षमतेवर व योग्यतेवर अवलंबून असतो. केंद्र व राज्य सरकारे औद्योगिक विकासाठी उद्योजकता विकासाकरीता प्रयत्न करीत आहेत.परंतु औद्योगीक विकास हा मर्यादीत ठिकाणी दिसून येतो उद्योजक नवीन जागेत उद्योग उभारणीसाठी पुढाकार घेत नाहीत हे कशामुळे होते या साठी अभ्यास करणे आवश्यक आहे. उद्योजकतेचा विकास होण्यासाठी कोणते कार्य करणे अपेक्षित आहे. व कोणते साहाय्यभूत सोयी पुरविण्यात याव्यात आणि कोणत्या प्रकारची साधनसामुग्री असणे आवश्यक

आहे या बाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. अमेरिकन मानशास्त्रज्ञ डी. सी. मॅक्लीलॅड यांनी प्रदीर्घ संशोधनातून असे सिध्द करून दाखविले आहे की कोणत्याही राष्ट्राची औद्योगिकरणाची गती पायाभूत सोयी, नैसर्गिक साधन सपत्ती, तंत्रज्ञान, व्यवस्थापनाचे ज्ञान, भांडवलाची उपलब्धता यावर अवलंबून नसून,त्या देशातील जनतेच्या प्रेरणेवर आणि उद्योजकतेवर अवलंबून असते. व अंतःप्रेरित असा उद्योजक नैसर्गिक व इतर साधन संपत्तीचा वापर करून औद्योगिकरणाची गती वाढवू शकतो.

उद्योजक औद्योगिकरणाचे आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. जे. आर.डी.टाटा जर भारतात जन्माला आले नसते तर भारतात औद्योगिक चित्र वेगळे दिसले असते. जेव्हा आपण अमेरिकेच्या नावाचा उच्चार करीत असतो. तेव्हा रॉक फेलर हे नाव आठवते. तसेच जपान देशाच्या बाबतीत मित्सूबिसनी, सोमिटोयो,यासुडे ही नावे नजरे समोर येतात. आज देशात उद्योजकता विकासाची गरज आहे. आदर्श उद्योगजक निर्माण होऊन देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हात भार लवीत असतात. देशाची ओळख ही औद्योगिकरणावरून होत असते.

उद्योजक ही संज्ञा मुळ फ्रेंच शब्द ***Antreprendre*** या शब्दापासुन तयार झालेली आहे. या शब्दाचा अर्थ जबाबदारी घेणे असा होतो.ऑक्सफर्ड शब्दकोशात या संज्ञाचा अर्थ धारिष्टयाचे प्रकल्प असा दिला होता. तर वेल्स्टर शब्दकोशाप्रमाणे धारिष्टयाचे प्रकल्प हाती घेण्याची तयारी असा अर्थ दिलेला आहे. यावरून उद्योजकता या संज्ञेत धीटपणा, निर्भयता,गतिक्षमता व धोका पत्करण्याची तयारी हे सर्व गुणविशेष एकत्रित दिलेले आहेत. यावरून उद्योजकता या शब्दाचा अर्थ बोध होतो. प्रत्येक देशाला उद्योजकता विकासाला महत्व द्यावे लागते कारण उद्योजकतेच्या विकासावर त्या देशाची प्रगती अवलंबून असते.

## ‘१.२.विषय विवेचन

### १.२.१ व्याख्या व संकल्पना *(Definition and Concept)*

उद्योजक हा नवीन्य निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. आपण इतरांपेक्षा पेक्षा कसे वेगवेगळे वस्तू वा सेवा निर्माण करू यासाठी कार्य करीत असतो.त्याच्या मनातील नवीन नवीन कल्पना साकार करण्याच्या प्रयत्नात असतो त्या हे कार्य यश मिळवून देते तया वेळी त्याच समाधान झालेल असते. परंतू तो तेवढयावर न थांबता पुन्हा पुढे नवीन शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. उदा. टाट उद्योग समुह हा फार पुर्वी पासून प्रचलीत आहे त्यांचे जे काम पुर्वी होत

तेच काम चालवत आलेली नाहीत नवीन कल्पना साकार करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. म्हणून या वरून उद्योजक हा सतत काही तरी करण्याचा प्रयत्न करीत असतो.कारण आज स्पर्धेचे युग आहे अशा स्पर्धेमध्ये टिकूण राहण्यासाठी उद्योजक धडपड करीत असतो त्याला उद्योगाला अधिक उंचावर नेऊन सोडण्याची त्याची अपेक्षा असते. या वरून आपणास उद्योजकतेची व्याख्या स्पष्ट करता येईल.

(१) अधुनिक तंत्रज्ञान नवीन कल्पना व संधी शोधुन व्यवसायिक अनिश्चिततेत आर्थिक धोका पत्कारून स्वतःचा अंगी असलेले संघटन कौशल्याने योग्य नियोजनबध उपक्रम अस्तित्वात आणून यशस्वी करणे म्हणजे उद्योजकता होय.

(२) विशिष्ट ध्यैयांने झपाटून अथक प्रयत्न करून इतरांच्या मदतीने नवीन मार्गाचा शोध घेणे व निसर्ग संपदा, पैसा, कामगार या घटकांना कुशलतेने कार्यवाही करण्याचे कार्य म्हणजे उद्योजकता होय

(३) जोखीम स्विकरण्याची क्षमता,संघटन व कुवत आणि उद्योग संस्थेत वविधता आणण्याची व नवनिर्मिती करण्याची तीव्र इच्छा म्हणजे उद्योजकता होय

(४) जे. बी.से यांनी (१८१५) मध्ये उद्योजकतेची संकल्पना स्पष्ट करीत असतांना असे स्पष्ट केले की उत्पादनासाठी लागणारी साधनसामुग्री एकत्रित करणे व धोका पत्करणे या सर्वांची जबाबदरी उद्योजकावर असते. त्याने उद्योजक या संज्ञेची व्याख्या स्पष्ट करीत असतांना असे सांगितले की असा मध्यस्थ जी उत्पादन साधने संघटित करतो,गुंतवणूक केलेल्या भांडवलाचे व्याज, मजुरी व भाडयाने पुनर्स्थापना तयार वस्तूंच्या मुल्याद्वारे करीत असतो. व स्वतःसाठी नफा मिळवितो आणि त्याच्या जवळ निर्णय शक्ती व व्यवसायचे व जगाचे ज्ञान हे गुण असले पाहीजेत. देखरेख व प्रशासन करण्याची कला त्याला अवगत असावी.

(५) शूम्पीटर यांनी (१९४७) मध्ये उद्योजकतेची संकल्पना स्पष्ट केली आर्थिक विकासाच्या मुळाशी मानवी घटक असतो. उद्योजक महणजे नाविन्य आणणारा जो नवीन गोष्टी घडवून आणतो किंवा अगोदर केलेल्या गोष्टी नव्या ढंगात पेश करीत असतो.

(६) ए. एच.कोल यांची व्याख्या नफा मिळविणे नफयाचे प्रमाण टिकवून ठेवणे किंवा नफयात वाढ करण्याच्या हेतूने आर्थिक वस्तू व सेवांचे

उत्पादन किंवा वितरण करण्याकरीता एखादी वयक्ती किंवा परस्परांशी संबधित असलेल्या व्यक्तींच्या एखाद्या समूहाने केलेले सहेतूक कार्य म्हणजे उद्योजकता होय.

(७) जेफरी टिमन्स यांच्या मते उद्योजकता म्हणजे प्रत्यक्षात कोणतीही अनुकूलता नसतांना काहीतरी नव्याने उत्पन्न करण्याची व निर्माण करण्याची क्षमता होय.

(८) डॉ. जे.ई. स्टेपनेक यांच्यामते, जोखीम पत्कारण्याची क्षमता, संघटनाची कुवत आणि उद्योगसंस्थेत विविधता आणण्याची व नवनिर्मिती करण्याची तीव्र इच्छा म्हणजे उद्योजकता होय.


उद्योजकतेची संक्ल्पना स्पष्ट करण्यासाठी अनेक शास्त्रज्ञांनी संशोधन केलेले आहे.मॅक ले लंडने याने( १९६९) मध्ये यशाच्या गरजेमुळे मिळणाऱ्या प्रेरणेस प्राधान्य दिले.किल्बीने (१९७१) मध्ये व्यवस्थापकीय व तांत्रिक ज्ञानाचे महत्व स्पष्ट केलेले आहे. फॅक्स, माइन्स व पापनिक याने १९७३ मध्ये यांनी आर्थिक व राजकीय पर्यावरणाचा उद्योजकतेवर होणारा परिणामांचा अभ्यास केला. नंदी याने( १९७३) मध्ये उत्तेजन देणाऱ्या समाज व्यवस्थेत उद्योजकता आर्थिक विकसित होते हे सिध्द केले. अशारितीने वेगवेळया कालखंडात उद्योजकतेचा विकास कसा होतो हे अभ्यास करणे गरजेचे आहे कारण उद्योजकतेचा अर्थ परिस्थिती नुसार बदल आहे हे स्पष्ट करता येते.

वरील विवेचनावरून उद्योजकता म्हणजे संधीचा फायदा घेणे, व्यवसायाचे संघटन करणे, योग्य पध्दतीची निवड करणे व व्यवसायसंस्था विकासावर राहील असे कार्य करणे म्हणजे उद्योजता होय.उद्योजकता म्हणजे नव्या गोष्टी करणे किंवा अगोदर माहीत असलेल्या गोष्टी नवीन पध्दतीने करणे होय.

उद्योजकता ही संकल्पना अनेक लोकांनी वेगवेळया प्रकारे स्पष्ट केलेली आहे उद्योजकता बाबत स्पष्टीकरण करणे कठीण आहे.ही संकल्पना वेगवेगयळ्या देशात बदलत गेलेली दिसते.मॅक्लेलँडने या बाबत एका लक्षाधीशाचे उदाहरण दिले आहे. या व्यक्तीस पत्न व मुले नाहीत तरी तो उत्पन्न मिळविण्यासाठी धडपड करीत असतो. त्याला यश व सत्ता याचे समाधान मिळते. तो केवळ समाधानासाठी उद्योजक बनण्यास प्रवृत्त होतो. अर्थात आपण इतरांपेक्षा काही नवीन करीत आहोत अशी त्याची इच्छा असते म्हणून त्यास उद्योजक म्हटले जाते. उद्योजक हा नवीन प्रयोग करून शोधण्याचा प्रयतन करीत असतो त्यात काग्र मग्न राहे अशी त्याची स्वतःहून तयारी असते.जे उद्योजकाच्या अंगी गुण आवा लागतात ते गुण

त्यात असतात पुढे भविष्यात एक आदर्श उद्योजक म्हणून ओळखण्यात येतो. उदा. टाटा, अंबानी, महेता किर्लोस्कर, गरवारे,राहूल बजाज, इत्यादी उदाहरणे देता येतील.

जॉन काओ (**John kao**) यांनी उद्योजतेची संकल्पनात्मक रचना पुढील प्रमाणे स्पष्ट केलेली आहे




आकृती १.१ उद्योजकतेची संकल्पनात्मक रचना

**उद्योजकतेची विश्लेषणात्मक चौकट**

**१)** **व्यक्ती**: व्यक्तिमत्व, कौशल्य,अनुभव,प्रेरणा आणि मानशास्त्रीय अग्रक्रम

२) **कृती**: संधीचे आकलन करणे, संसाधनांचे संघटन करणे, नेतृत्व देणे

३) **पर्यावरण**: संसाधनांची उपलब्धता, पायाभूत सेवा, स्पर्धात्मक दबाव, सामाजिक मुल्ये, नियम व कायदे, तंत्रज्ञान इत्यादी.

उद्योजक जी कृती किंवा कार्य पारपाडतो त्यास उद्योजकता असे म्हणतात उद्योजक हा नवीन शोधण्यासाठी धडपड करीत असतो त्याला त्याचा मोबला या संशोधक वृत्तीतून मिळत असतो. उद्योजकाचे कार्य हे योजनाबध्द चाललेले असते. त्यात तो बाजारपेठेचा अभ्यास करीत असतो. ग्राहकांच्या अपेक्षा आणि बाजारपेठेतील इतर वस्तू त्यात काय बदल करता येइेल यासाठी संशोाधन कार्य करीत असतांना साधनसामग्रीची जुळवाजुळव करीत असतो . याधाडशी वृत्तीस त्याला उद्योजक म्हणता येईल.

१.२.२ **उद्योजकतेचे स्वरूप (Nature of Entrepreneurship)**

उद्योजकता ही संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी उद्योजकतेचे स्वरूप समजून घेतले पाहीजे कारण उद्योजकतेची भुमिका अनेक संशोधकांनी स्पष्ट केलेली आहे. त्यावरून उद्योजकतेचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येईल.

*(१)* **नवनिर्मिती (Innovatikon)**: नवनिर्मिती साठी उद्योजक प्रयत्न करीत असतांना उद्योजक हा नवनिर्मिती या प्रक्रियेचा सर्व प्रथम विचार करीत

असाते. हयातून उद्योजकाचे कार्य पुढ सरकत असते. जोसेफ शुम्पीटरने असे स्पष्ट केले आहे की उद्योजक हा नवनिर्मिती करणारा असतो.व विविध मार्गांनी नवनिर्मिती करीत असतो. आणि बदल घडून येत असतात.व आर्थिक विकासाला चालाना मिळते. उद्योजक हा नेहमी नवीन संधी शोधण्याच्या प्रतिक्षेत असतो. त्यातून योग्य मार्ग मिळत असतो.

(२) **सिध्दी प्रेरणा *(Need for Achievement)***:उद्योजक यश मिळविण्यासाठी विविध मार्गांनी नवनिर्मिती घडवून आणित असतो. त्या करीत त्यास निर्णय घ्यावे लागतात .उत्पादन घटक एकत्रित करणे,संघटनेची उभारणी करणे, जोखीम स्विकारणे, इत्यादी कार्य करावी लागतात. उद्योगात यशस्वी होण्यासाठी उद्योजकाला धोरणात्मक निर्णय घेऊन स्वतः जबाबदारी स्विकारावी लागते. त्याला जी प्रेरणा मिळते त्यातुन तो योग्य मार्गाची निवड करीत असतो. आणि तो अधिक परिश्रम करीत असतो. त्यातून त्याला यश साध्ये करता येते.


(३ **संघटनेची उभारणी करणे**: कोणत्याही उपक्रमासाठी कार्यक्षम संघट नाची आवश्यकता असते.व त्या मार्गाने उद्योजकला अनेक कार्य करावी लागतात.म्हणून उद्योजकात संघटनेची प्रक्रिया उभाकरण्याची क्षमता असते. उद्योजकाला यशस्वी होण्यासाठी विविध प्रकारची क्षमता व कौशल्य असावी लागते. संघटनेची उभारणी करीत असतांना उद्योजकाला योग्य असे नियोजन करावे लागते व कौशल्याचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करून परिणामकारक संघअन रचना करू शकतो.

(४) **व्यवस्थापकीय कौशल्य आणि नेतृत्व**: उद्योजकला यशस्वी होण्यासाठी त्याच्या जवळ अनेक प्रकारची कौशल्य असावी लागतात. उद्योजकला उपक्रमाचे व्यवस्थापन करून नियोजित कार्यात यश मिळविण्यासाठी त्याच्या जवळ व्यवस्थापकीय कौशल्य व नेतृत्व करण्याची क्षमता असावी लागते. उपक्रमांचे संचालन व विस्तार करण्याकरीता त्याच्या जवळ अधिक भांडवलाची आवश्यकता असते व तो योग्य वेळी कमीतकमी खर्चात भांडवल उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करीत असतो.

(५) **समस्या सोडविण्याचा प्रयत्न करणे**: उद्योजक उपक्रमाच्या संदर्भात नविन प्रक्रियेवर भर देत असतांना त्याला उणीवा जाणवू लागल्यास त्या सोडविण्यासाठी त्याचे प्रयत्न असतात त्यातून सुयोग्य अशा मार्गाची

निवड करण्याचा प्रयत्न केला जातो. आणि उणीवा सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याचे कार्य हे उद्योजकाचे असते.

उद्योजकतेचे स्वरूप पुढील आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल.




**आकृती १.२ उद्योजकतेचे स्वरूप**

**१.२.३ उद्योजकतेचे महत्व (Importance of Entrepreneurship):**

उद्योजकता ज्याप्रमाणे व्यवसाय चालविण्यासाठी भांडवल, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, कामगारांची आवश्यकता असते हे आपण मिळवू शकतो परंतू उद्योजकता आयात करता येत नाही म्हणून उद्योजकता ही देशातल्या देशात निर्माण होत असते. उद्योजकता तयार होण्यासाठी उद्योजकीय संस्कार व उद्योजकीय प्रशिक्षण देवून उद्योजक निर्मान करू शकतो. उद्योजकता ही देशाला व समाजाला आर्थिक सुबत्ता प्राप्त करून देत असते तसेच देशाची प्रगती विकासाकडे वाटचाल करीत असते. म्हणून आजच्या तरूण पिढीत उद्योजकता रूजावी या साठी जागरूकता निर्माण होणे अपेक्षित आहे. उद्योजकतेचे महत्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) **उद्योजकीय संस्कृती (Entrepreneural Culture):** भारतीय संस्कृती ही मुळातच उद्योजकीय संस्कृती आहे. आज जपान देशाकडे पाहीले जाते की त्या देशात उद्योजकीय वातावरण निर्माण झालेले आहे त्यामुळे तो देश प्रगती पथवर दिसत आहे. सुरवातीला जपानमध्ये उद्योजकांनी तंत्रज्ञानाच्या बळावर नविन उद्योग सुरू केलेत व काही उद्योजकतेडे राहीलेत त्यामुळे तेथील उद्योजकीय वातावरणात वाढ होत गेली म्हणुन कोणत्याही देशात उद्योजकतेचा विकास होणे गरजेचे आहे. उद्योजकतामुळे देशात उद्योजकीय

संस्कृती वाढीस लागते आणि देशाची संस्कृती समृध्द होत जाते.

२) **आर्थिक विकास (Economical Development):** प्रत्येक देशाचे आर्थिक विकास व्हावा अशी अपेक्षा असते परंतू देशातील तरूणांनी उद्योजकतेडे प्रवृत्त होणे आवश्यक असते. उद्योजक उद्योगाची उभारणी करतात त्यावेळी ते नवनिर्मिती करून उद्योग चालवित असतात. उद्योग निर्माण झाल्यने तेथील लोकांना रोजगाराची संधी प्राप्त होत असते.समाजाला लागणाऱ्या वस्तू उपलगब्ध होतात व समाजाची गरज पुर्ण करण्यासाठी उद्योजक सतत प्रयत्न करतात आणि देशाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यासाठी हातभार लागत असतो पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासात भर पडत असते.

३) **सामाजिक विकास (Social Development):** सामाजिक विकास होण्यासाठी लोकांना रोजगाराची संधी प्राप्त होणे आवश्यक असते तसेच लोकांचे जिवमान उंचावण्यासाठी त्यांना दररोज लागणाऱ्या वस्तू व सेवा कमीत कमी किंमतीत उपलब्द होणे अपेक्षित असते हे कार्य उद्योजक करू शकतो म्हणून सामाजिक विकास होण्यासाठी उद्योजकतेत वाढ होणे गरजेचे आहे.

४) **औद्योगिक विकास (Industrial Development):** उद्याजकतेमुळे औद्योगिक विकासात भर पडत असते अनेक उद्योजक निर्माण झाल्याने औद्योगिककरणची वाढ होत असतांना दिसून येते आणि देशाची उन्नती होण्याकडे वाटचाल असते.म्हणून उद्योजता विकासामुळे औद्योगिक विकास होत असतो. उद्योजकतेमुळे देशात व्यवसायाचा अधिक विकास होत असतो. उद्योगाचा विकास म्हणजेच देशाचा विकास होय. म्हणून उद्योजकता ही देशाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहे.

५) **भांडवल निर्मिती (Capital Formation):** भांडवला शिवाय व्यवसाय चालू शकत नाही.म्हणून उद्योगाला भांडवल ही आवश्यक बाब आहे जेव्हा उद्योजकाला व्यवसायाची निर्मिती करावयाची असते. तेव्हा त्याला सर्व प्रथम भांडवलाची आवश्यकता भासते तेव्हा तो भांडवलाची उभारणी स्वतः व कर्जाने करीत असतो. भांडवलाची गुंतवणूक केल्याने व्यवसाय निर्मिती चालू झाल्याने नफा झाल्यास नफ्याची पुनर्गुंतवणुक केल्याने भांडवलात वाढ होत असते. उद्योगाची निर्मिती झाल्याने उत्पादन कार्यात वाढ होते आणि बँक व वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थाच्या कार्यात वाढ होत असते कारण ते उद्योगाला कर्जपुवठा करीत असतात आणि उद्योगाने

घेतलेल्या कर्जावर व्याज द्यावे लागते पर्यायाने देशातील वित्त व्यवसायात वाढ होते. म्हणन उद्योजकता ही देशाच्या भांडवल निर्मितीस साहाय्य करीत असते.

६) **तंत्रज्ञानाचा विकास *(*Technological Developmen*)*:**उद्योजकतेमुळे तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानमुळे उद्योजकतेचा विकास होतो असे म्हणता येईल.कारण उद्योजक हा नवीन नवीन संधीच्या संशोधनात असतो आणि त्याला तंत्रज्ञानाची गरज असते त्यावेळी तंत्रज्ञान स्वतःविकसित करीत असतो किंवा बाहेरील घटकांकडून मिळवित असतो. म्हणून तंत्रज्ञानाच्य बदलाने उद्योजकतेस पोषक वातावरण निर्माण करता येते आणि नवीन तंत्रज्ञान विकास करता येणे शक्य होत असते.

७) **रोजगार (Employment)**: उद्योजकतेळे देशातील लोकांना रोजगाराची संधी प्राप्त होत असते.आर्थिक विकासाच्य दृष्टीने लोकांना रोजगार मिळाल्याने कुटुंबातील व्यक्तींना उदरनिर्वाह करणे शक्य होते त्यांना आधिक उत्पन्न मिळविण्यासाठी मार्ग उपलब्ध होतात.व देशातील बेरोजगारी कमी करण्यास उद्योजकता ही महत्वाची भूमिका पारपाडीत असते.

८) **सेवा क्षेत्राचा विकास *(Development of Service Sector)***: उद्योजकतेचे विकास होत आहे त्याच बरोबर सेवा क्षेत्राचा विकास दर वाढत असतांना दिसून येतो कारण उद्योजकतेने अनेक संधी सेवांच्या माध्यमातून निर्मान केलेल्या आहेत. व अनेक लोकांना रोजगाराची संधी प्राप्त झालेली आहे.माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उद्योजकतेने रोजगार बरोबर देशाला अर्थिक विकासावर पोहचविले आहे. आता उद्योजकतेने पंरपरागत पध्दती सोडून अधुनिक पध्दतीचा स्विकार केलेला आहे. आणि देशात अधिक संधी उपलब्ध करण्यासाठी उद्योजकता कार्य करीत आहे हे सेवा क्षेत्राच्या विकासा वरून दिसून येते.

९) **कृषी क्षेत्राचा विकास*(*Agricultural Development)**: उद्योजकता ही वेगळे काही तरी करण्याची प्ररणा देत असते. कारण उद्योजकता म्हणजे उद्योगाची उभारणी करणे नव्हे तर त्यातून नवीन संशोधन करून एखाद्या क्षेत्राचा विकास करण्यास प्रोत्साहीत करीत असते. आज कृषी क्षेत्राचा विकास हा उद्योजकतेमुळे झालेला दिसून येतो कारण वेगवेगळ्या उद्योजकांनी कृषी क्षेत्रासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित केलेले आहे.आज कषी क्षेत्रात नवीन साधन, साधनसामग्रीचा वापर केला जात आहे. परंपरागत पध्दतीचा

वापर न करता अधुनिक पध्दतीने शेती केली जात आहे. म्हणुन उद्योजकते च्या माध्यामातून कृषी क्षेत्राचा विकास झालेला आहे.

१०) **अयात निर्यात (Import-Export):** उद्योजकतेच्या साहाय्याने आपण उत्पादकाता वाढवून निर्यात करीत असतो व ज्या वस्तूची कमतरता आहे अशा वस्तू आपण परकिय देशाकडून आयात करू शेकतो किंवा आयातीवर पर्याय निर्माण करून देशातल्या देशात उत्पादन करणे हे उद्योजकतेच्या माध्यमातून शक्य झालेले. आहे. व अधिक प्रमाणात उत्पादन करून निर्यातीत वाढ करून परकीय चलन मिळविता येते व देशाच्या विकासात भर देण्याचे कार्य उद्योजकता करीत असते.

उद्योजकतेचा आर्थिक सामाजिक विकासात असलेला सहभाग हा देशाच्या प्रगतीसाठी केलेलाा प्रयत्न हा अधिक महत्वाचा असून उद्योजकतेची भूमिका स्पष्ट करण्यासाठी वरील विवेचानावरून उद्योजकतेचे लक्षात येते.

### १.२.५ उद्योजकतेची वैशिष्ट्ये Fetures Entrepreneurship

उद्योजकतेच्या वरील व्याख्येवरून उद्योजतेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१) **धोका स्वीकारणे**: उद्योजक हा संधी शोधत असतो व संधी मिळाल्यास तिचा पुरपूर फायदा घेत असतो. तसेच भविष्यकालीन नियोजन करून निर्णय घेत असतो.हे सर्व कार्य धोका स्विकारून केले जात असते धोका स्विकारणे हा उद्योजकाचा मुलभुत गुणधर्म आहे.त्याला जी प्रेरणा मिळते त्यातून हे कार्य करीत असतो.

२) **नवनिर्मिती करणे**:उद्योजक आपल्या व्यवसायात नवनिर्मिती करून विपणनाची संधी शोधत असतो. उत्पादन पध्दतीत बदल करून नविन वस्तू बाजारपेठेत आणण्याचा प्रयत्न करीत असतो.नव्या मार्गांनी कच्चा माल उपलब्ध करता येईल काय या बाबत शोध घेत असतो

३) **वैयक्तीक जबाबदारी**: उद्योजक व्यावसायात जे काही निर्णय घेत असतो त्याला तो पुर्ण जबाबदार असतो. व्यवसायाच्या फायद्या-तोट्यास उद्योजक स्वतः जबादार राहतो. कारण तो जे निर्णय घेत असतो त्यात त्याने धाडस केलेले असते.

४) **परिणामांचे ज्ञान**: उद्योजक व्यवसायत जे काही निर्णय घेत असतो त्याचे परिणाम काय होतील त्याची त्यास जाणीव असते.तसेच व्यवसाय चालू ठेवण्यासाठी आपण कोणत्या दिशेने जात आहोत त्याचे मुल्यामापन करणे अपेक्षित असते. त्या प्रमाणे तो अपेक्षित कार्य हाती घेत असतो.

५) **भविष्यकालीन अदांज:** उद्योजक व्यावसायात वाढ करण्यासाठी प्रयत्न करीत असतो.त्याने भविष्यकाळासाठी आखलेल्या योजना कर्यन्वित काण्यसाठी अनुमान करीत असतो.त्याने केलेले भविष्यकालीन अंदाज अचूक झाल्यास त्याला मानसिक समाधान लाभत असते. उद्योजक व्यवसायात भविष्याचे वेध योजनांची आखणी करीत असतो.

६) **संघटन कौशल्य:**कोणत्याही उद्योजकास संघटन कौशल्य आवगत असते.त्यात साधनसपत्ती, मनुष्यबळ यांचे संघटन करीत असतो. व कोणती कृती किवा कार्य करावीत हे ठरवित असतो. विविध कार्यांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य केले जाते.उद्योजकला उद्योगातील साधनसपत्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी जुळवाजूळव करणे आणि उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे हया बाबत धोरणे ठरविण्यात येतात. व उद्योगातील विविध कार्यामध्ये एकसुत्रीकरण केले जाते.

७) **व्यावसायिक पर्यावरणाचे ज्ञान:** उद्योजकाला व्यवसायिक कार्य करीत असतांना व्यवसायाच्या पर्यावरणाचा अभ्यास करावा लागतो. कारण कोणत्या वातावरणाचा व्यवसायावर काय परीणाम होतो. याची जाणीव असते. बदलत्या वातावरणात व्यवसायिकाने काय केले पाहीजे हे ठरवावे लागते म्हणून उद्योजकाला व्यवसायाच्या पर्यावरणाचे ज्ञान असते. त्या अधारावर व्यवसायिक निर्णय घेत असतो उद्योजक हा नवीन नवीन बाजापेठांचा शोध घेत असतो व त्या बाजारपेठेची स्थिती समजून घेवून त्या बाजारपेठेत उतरावे किंवा नाही या बाबत निर्णय घेत असतो. उद्योजकाला जे कार्य करावे लागते व उद्योजकाच्या ज्या व्याख्या करण्यात आलेल्या आहेत त्यावरून उद्योजकाची वैशिष्टे स्पष्ट करता येतात.

**१.२.४ उद्योजकतेची उत्क्रांती (**Evolution of Entreneurship**):-**

अनेक ज्ञानशाखांतील तज्ज्ञांचे यश 'उद्योजक' 'उद्योजकता' ह्या संकल्पनांनी आकर्षून घेतलेले आहे. उत्पादन संसाधनांचा अथवा आर्थिक साधनसंपत्ती संघटक या अर्थाने उद्योजक ओळखला जातो. उद्योजक ही संकल्पना आंत्रप्रूनर (Entrepreneur) ह्या पाश्चिमात्य संकल्पनेच्या अर्थाने मराठीत वापरली जाते: **"योजकता आणि उपक्रमशीलता यांचा संगम म्हणजेच उद्योजकता आणि हा संगम ज्या व्यक्तीमध्ये झालेला असेल ती व्यक्ती उद्योजक असे सर्वसामान्यपणे मानले जाते."** आपल्या नेहमीच्या ज्ञात असलेल्या व्यापरी वृत्तीपासून उद्योजकता अगदी भिन्न आहे, विस्तृत आहे.

व्यापरी वृती ज्याच्या बाणलेली असते ती व्यक्ती चालाखा, हुशार, चाणाक्ष, सुयोग्य संधीचा/ परिस्थितीचा लाभ उठवणारीअसावी लागते. अर्थात ह्यसाठी त्या व्यक्तीला सभोवतालच्या परिस्थिकडे काकदृष्टीनेच नजर ठेववी लागते. 'उद्योजकता 'ही मात्र एक अगळीच वृत्ती आहे. उद्योजकामध्ये व्यापारी वृत्तीसाठी आवश्यक असणारे गुण तर अंगी असावे लागतातच परंतु त्याच्याच बरोबरीने नवनिर्मितीची आणि नित्य परंपरेपासून काही वेगळे करून दाखविण्याची इर्षा त्याच्यामध्ये असते. **नवनिर्मितीची योजनापुर्वक सांगड जर उद्योगविषयक ज्ञानाशी घातली तर उद्योजकतेचा अविष्कार दिसून येतो**.

उद्योजकतेविषयी एक गैरसमज होण्याची दाट शक्यता असते. हा गैरसमज म्हणजे उद्योजकता ही केवळ उद्योगाशीच संबंधित असते. वास्तविक उद्योजकता कोणत्याही क्षेत्रात असू शकते ."दुरदृष्टीने सर्वकष विचार करून काही नवनिर्मिती करणाऱ्यामध्ये, उपक्रम करणाऱ्यामध्ये उद्योजकता आहे असे आपण म्हणू शकू." उद्योजकच्या कृतीमुळे कुणाचे तरी हित साधणे, संसाधनाचा सुयोग्य वापर करणे अपेक्षित आहे. उद्योजकता ही काही ठाराविक वर्गाची मक्तेदारी नाही. सुशिक्षित, अशिक्षित,श्रीमंत, गरीब ह्या सर्वामध्येच ती असू शकते.

उद्योजकता या संकल्पनेचा विकास फार पूर्वीवसून होत आलेला दिसतो. 'Entreprenerurship'हा शब्द फ्रेंच भाषेतून सर्वप्रथम वापरलेला आढळतो. त्या वेळी या शब्दाचा अर्थ 'जोखीम स्वीकारणारा' 'धाडस करणारा' 'धाक्यामध्ये झाकून देणारा ' या अर्थाने घेतला जात होता. त्योवेळी या शब्दाचा उच्चार फ्रेंच भाषतून 'Entreprendre' असा केला जात होता. काल परत्वे या शब्दात बदल होऊन 'Entrepreneurship'असा उच्चार केला जाऊ लागला. **सोळाव्या शतकात** फ्रान्समध्ये सैन्यामध्ये जे अधिकारी नेतृत्व करीत असत, त्यांना Entrepeneure असे संबोधले जात असे. सैन्यातील लोकांना सातत्याने अनेक धोक्यांना तोंडद्यावे लागत. म्हणून अशा धाडसी सैनिकी अधिकाऱ्यांना, सतत जोखीमीचे काम करणाऱ्या व्यक्तींना किंवा जे जिवाची पर्वा न करता स्वतःला धोक्यांमध्ये झोकून देतात अशा प्रवृत्तीच्या लोकांना सार्वप्रथम फ्रान्समध्ये 'Entrepreneure' या उपाधीने संबोधेले गेले. लढईवर जाणाऱ्या प्रत्येक सैनिकालाच ही उपाधी दिले जात नव्हती, तर स्वतः प्रचंड जोखीम स्वीकारून,स्वबळावर निर्णय घेऊन, धडाडीने संकटावर मात करून काहीतरी भव्यदिव्य करून दाखविणाऱ्या व्यक्तीस या शब्दाने एक प्रकारे गौरविलेच जात होते. **कालांतराने या संकल्पनेची व्याप्ती राजकीय क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, आर्थिक क्षेत्र इ. मधून विकसित होत गेली.**

**१७ व्या शतकात** ही संकल्पना अनेक क्षेत्रांत वापरली जाऊ लागली. यामध्ये प्रामुख्याने बांधकाम क्षेत्राशी संबधित असणारे स्थापत्यकार, ठेकेदार यांचा समावेश होता.जे लोक

Entrepreure असे म्हटले जाते होते. त्याचबरोबर मोठया प्रमाणात युध्दसाहित्याची निर्मिती व विक्री करणाऱ्या कारखानदारांना व ठेकेदारांनादेखील या नावने संबोधले जाऊ लागले. या संदर्भात एक फ्रेंच बँकर रिचर्ड कँटीलॉन यांनी खालील प्रमाणे व्याख्या केलेली होती

"जी व्यक्ती स्वतःच्या देशाकरीता मोठया प्रमाणात वस्तूंची खरेदी करून,त्यांची विक्री अनिश्चत दरांनी करून मोठया प्रमाणात लाभ मिळविते तिला उद्योजक म्हणावे."

या अर्थाची व्यवयासाच्या जवळ जाणारी व्याख्या कँटीलॉन यांनी मांडली.यानंतर कँटीलॉन यांनी १७५५ यध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'Essay on the Natural of Geeral Commerce' यामध्ये असे म्हटले आहे, "**अशी व्यक्ती जी देशाच्या आर्थिक घडामोडीत महत्त्वाचे स्थान बाळगून आहे, ती उद्योजक.**"

**१८ व्या शतका** बऱ्याच फ्रेंच तत्त्वज्ञांनी या वेगवेळे अर्थ दर्शवून स्पष्टीकरण केलेले आहे. यामध्ये सोयी-सुविधा पुरविणारा,जबाबदारी स्वीकारणारा, व्यावसायिक निर्णय घेणारा,भविष्यकालीन व्यावसायिक घटनांचा अंदाज व्यक्त करणारा,लढाईचे नेतृत्व करणारा, विविध क्षेत्रातील मोठी कामे स्वीकारणारा इत्यादी. या शतकात Entrepreneure या शब्दाचा अर्थ जास्तीत जास्त व्यावसायिक दृष्टिकोणातून असा घेतला गेला.अनियमीत पाऊस, नैसगिक आपत्ती, आकस्मिकपणे घडून येणारे बदल व इतर प्रकारच्या प्रतिकूलतेमुळे शेती करणाऱ्या व्यक्तींना विविध प्रकारची जोखीम स्वीकारावी लागते.ही जोखीम स्वीकारून शेतीच्या क्रिया करणे हे धाडसाचे काम होते. त्यामुळे अठराव्या शतकात फ्रान्समध्ये शेतकऱ्यांना तेसेच जोखीम स्वीकारण्यासाठी पुढे येणाऱ्या उद्योजक म्हटले जाऊ लागले.

**१९ व्या शतकात** खऱ्या अर्थाने जो अर्थ आज प्रचलित आहे, वापरला गेलेला आहे. जास्तीत जास्त व्याप्ती या काळातच 'उद्योजक' व 'उद्योजकता' याबद्दल समोर आलेली आहे.या शतकात देशाच्या व जागतिक पातळीवर झालेली आर्थिक स्थित्यंतरे, बाजारपेठांचा विकस,उत्पादनाचे नवीन तंत्र, यांत्रिकीकरण,देशाला औद्योगिक दृष्टीने समृध्द करण्याचे ध्येय अशा अनेक बाबींतून उद्योजकतेची व्याप्ती वाढत गेलेली आहे.चित्रपटांचे दिग्दर्शन करणारा दिग्दर्शक,संगीतकार यांनादेखील Entrepreneure म्हटले जाऊ लागले.

**२० व्या शतकात उद्योजकता या संकल्पनेस संपूर्ण जगात कमालीचे महत्व प्राप्त झाले**.उद्योजकतेचे अनेक पैलु याच शतकात जगासमोर आले. प्रचंड भांडवल संचय ही महत्वेपूर्ण बाब याच शतकात मागे पडली.स्व- सामर्थ्यांच्या बळावर व कोणतेही भांडवली पाठबळ नसलेले उद्योजक धडाडीने उद्योग क्षेत्रात नावाजले गेले. **बिल गेट्स, धीरूभाई अंबानी, राहूल बजाज विप्रोचे अझीम प्रेमजी या सारख्या कितीतरी व्यक्तींनी आपल्या**

**अचाट बुध्दिमत्तेच्या जोरावर कर्तुत्ववान अशा देदीप्यमान तेजाने संपूर्ण जगालाच अचंबित करून टाकले.** संगणक क्रांती, जैविक तंत्रज्ञानासचा शोध, सीमारहित बाजारपेठा यांनी उद्योजकतची कठारे परीक्षा घ्यावयास याच शतकात सुरूवात केलेली आहे. येणारे **२१ वे शतक उद्योजेतेची कसोटी पणाला लावणारे शतक ठरणार आहे**.या शतकात उद्योजकतेकरिता अनेक नवीन दालने उघडलेली आहेत.

उद्योजक म्हणजे धाडस करणारी, साहसी, धोका पत्करणारी व्यक्ती हा अर्थ अठराव्या शतकापासून रूढ झाला आहे. हा अर्थ आजही काही प्रमाणात कायम आहे. पण अलिकडे कोणताही उपक्रम करण्याकरिता जोखीम स्वीकारणे ह्या क्रियेशिवाय अनेक प्रकारच्या क्रिया कराव्या लागतात. उदा. उत्पादनाचे कार्य करण्याकरिता आवश्यक असलेले सर्व घटक गोळा करणे, उपक्रमाकरिता आवश्यक असलेली संघटना उभारणे, धारणे ठरविणे व निर्णय घेणे, बदल घडवून आणणे, इ.अलिकडे ह्या सर्व क्रिया करणाऱ्या व्यक्तींना उद्योजक असे म्हणतात. उद्योजक नवीन कल्पना व विचार देतात. विविध प्रकारचे बदल घडवून आणतात व प्रत्यक्ष क्रियेला चालना देतात. उद्योजक नवीन उपक्रमांची स्थापना तर करतातच, पण त्यांचे नेतृत्वही करतात. उपक्रमांची यशस्वी वाटचाल करीत असतांना येणारे सर्व अडथळे दूर सारण्याचे कामही उद्योजक करीत असतात.

### १.२.६ **उद्योजकच्या अंगी असणारे गुण:Entreprenurial traits**

उद्योजक होण्यासाठी उद्योजकाच्या अंगी जे गुण असावे लागतात त्यात कौशल्य व व्यक्त विशेष गुण असणे आवश्यक असते. काहीच्या मते उद्योजक हा जन्मावा लागतो. तर काहींच्या मते उद्योजक हा निमार्ण केला जोतो असे उद्योजकाच्या द्दषटीकोनातून विविध मते दिसून येतात प रंतू सर्वसामान्यपणे उद्योजक होण्याचे जे गुण उद्योजकात असतात त्या वरून उद्योजकाच्या अंगी असणारे गुण पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

(१) **शोधकवृत्ती:** उद्योजक हा बाजार पेठ व ग्राहकांचा विचार करून वस्तूची नवनीर्मिती साठी प्रयत्न करीत असतो. तो आपल्या व्यवसाया संबंधी काहीतरी नवीन संशोधन करण्यासाठी घडपड करीत असतो.कारण त्याला

त्याच्या कार्याचा मोबदला मिळणार असतो आजच्या स्पर्धायुकत परिथितीत उद्योजकाने इतर उद्योगांबरोबर टिकून राहण्यासठी नियमित संशोधन करून नाविन्य निर्मिती केली पाहीजे तरच तो त्याच्या व्यवसायचे अस्तित्व टिकून ठेवण्यात यशस्वी होत असतो. शोधक वृत्ती असणारे उद्योजक साधनसामग्री व मनुष्यबळाचा पर्याप्त वापर करून खर्चात बचत करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. तसेच सर्जनशीलता हा त्याचा स्वाभिमान असतो त्याला वर्षानु वर्ष चालत आलेली साधन सामग्री किंवा कार्य पध्दतीचा वापर करणे आवडत नाही तर तो त्यात बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करीत असतो.

(२) **धोका पत्कारण्याची तयारी**ःउद्योजकाला व्यवसाय करीत असतांना धोका स्विकारावा लागतो तो धोका स्विकारून कार्य हाती घेतल्यास त्याला मिळालेले यश हे त्याचा द्ष्टीने उद्योगातील महत्वाचा टप्पा असतो.परिस्थितीनुसार कसे निर्णय घ्यावेत या विषयी उद्योजक सक्षम असल पाहीजे तरच तो आदर्श उद्योजक होऊ शकतो.

(३) **अनुकरण शक्ती**ःउद्योजकान अनूकरणशील असावे कारण व्यवसायात कोणत्या उद्योजकाने कोणत्या प्रकारचे उत्पादन केलेले आहे त्याचा फायदा त्यांना का होत आहे असे यशस्वी उद्योजकांचे अनुकरण करून त्याच्या व्यवसायातील धाडसी निर्णय घेता आले पाहीजेत परंतू अनूकरण करण्यात तो चाणक्ष्य असावा लागतो. तसेच त्याला सभवतालच्या परिस्थितीची जाणीव असावी. त्या प्रमाणे उद्योजक व्यवसायिक निर्णय घेत असतात.

(४) **तांत्रिक व व्यवसास्थापकीय ज्ञान**ःउद्योजकाला त्याच्या व्यवसायातील तांत्रिक ज्ञान असावे लागते त्या शिवाय तो त्याच्या व्यवसायातील कार्यांक अंमलबजावणी करू शकत नाही व्यवसायात केव्हा कोठे कोणत्या प्रकारची समस्या आहेत किंवा कोणती साधनसामग्री मागविणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे नियोजन,करण्याचे त्याला ज्ञान असावे लागते. त्या शिवाय उद्योजक निर्णय घेऊ शकत नाही. तसेच व्यवस्थापना करीत असतांना नियोजन, संघटन, समन्वय,संदेशवहन, नियंत्रणाची कार्य करीत असतो. व अधिक चांगले कामकरणा-यास प्रेरणा देणे,कामाचे वाटप करणे इत्यादी कार्य उद्योजकाला करावी लागतात.

(५) **सिध्दी प्रेरणा**ः सिध्दी प्रेरणा म्हणजे काही तरी नवीन करण्यासाठी

घडपड होय. उद्योजक त्याच्या व्यवसायात इतरांपेक्षा काही नवीन करून दाखविण्यासाठी तो प्रयत्न करीत असतो मॅक्लिलॅड याच्या मतानुसार शसिध्दीच्या गरजेची प्रेरणा ही उद्योजकतेत महत्वाची असते.या प्रेरणेमुळे उद्योजकाला नवनिर्मिती करावी असे वाटते. आपल्या भोवताच्या अनेक लोकांच्या काम करावे आणि जगावे एवढयावर तो संतुष्ट नसतो.यश सिघ्दीच्या गरजेमुळे तो इतरांपेक्षा वेगळा वाटत असतो. उद्योजकला अधिक प्रतिष्ठा, व्यचसायातील यश,नवीन वस्तू शोधणे व लोकप्रिय होणे इत्यादी बाबत त्याला समाधान वाटतअसते.उद्योजकयशसिघ्दीच्या गरजेकरीत आपल्या व्यवसायाचा विस्तार करतो व नवनिर्मिचे प्रयोग करीत असतो उत्पादनात बदल करीत असतो अपले उत्पादन इतरांपेक्षा कसे वेगळे आहे दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. तसेच हा उद्योजक भविष्यात यशाची अपेक्षा करीत असतो.

(६) **कालबध्द**ःउद्योजकाला वेळेचे महत्व अधिक असते कारण त्याने केलेल्या कामाचा निकाला त्याला तात्काळ हवा असतो त्या शिवाय तो त्यास परवडत नाही कोणते ही काम वेळेत पुर्ण करणे त्यास आवडत असते. कारण त्याचे यश हे त्याच्या कार्यावर अवलंबून असते. उद्योजक हा त्याच्या कामाचे वेळापत्रक करीत असतो तसेच कामाचे नियोजन करीत असतो त्या प्रमाणे त्याला उत्तरे अपेक्षित असतात.

(७) **पाठपुराव्यातून शिकण्याची तत्परता**ः उद्योजक त्याचे कार्य करीत असतांना कामात पाठपुरावा करणे ही तयारी वृत्ती असते कारण घेतेलेले निर्णय बरोबर आहेत किंवा नाहीत याची खात्री होणे अपेक्षित असते .उत्तरे बरोबर मिळत नसतील तर त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्या प्रमाणे व्यवस्थापक कामांची अंमलबजावणी करीत असतांना पाठपुरावा करीत असतो त्या प्रमाणे उद्योजकाला पाठपुरावा करावा लागतो त्या शिवाय तो व्यवसायात यशस्वी होत नाही उद्योजकाच्या अंगी शिकण्याची वृत्ती असवी लागते त्याने निवड केलेल्या मार्ग बाबत जागृत राहवे लागते. त्याला अडचणी सोडविता आल्या पाहीजेत म्हणून पाठपुराव्याच्या माध्येमातून त्याला माहीती गोळा करता येते व निष्कर्य काढता येतात भविष्यकालीन नियोजन करता येते.समस्या सोडविण्यासाठी माहीतीचा उपयोग होत असतो.

(८) **पर्यावरणा वाबत जागरूकता**ःउद्योजकाला विशिष्ट परिस्थित कार्य कारावे लागते त्याच्या जवळ उपलब्ध साधनसामग्रीच्या साहीय्याने जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी कामाचे नियोजन करावे लागते .काही वेळेस उद्योगाच्या भोवतालाचे वातावरण बदलते असते अशा परिस्थितीत कशारितीने काम केले पाहीजे उद्योजकाला विचार पुर्वक निर्णय घ्यावे लागतात तसेच राजकीय बदलामुळे औद्योगिक धोरणात बदल होत असतात त्या वेळी औद्योगिक वातावरणात उद्योजकाला टिकून राहण्यासाठी व्यवसायात त्या प्रमाणे निर्णय घेण्याची त्याची असावी लागते. बदलत्या पर्यावरणात नविन संधीचा फायदा घेण्यासाठी उद्योजकाला शोध घेण्याची आवश्यकता असते. अर्थात उद्योजकाला व्यावसायिक वातावरणानुसार त्याला निर्णय घेणे फायदेशीर असते.

(९) **विचार व कृतींबाबत स्वालंबीपणा**ःलेविन यांच्या मतानुसार उद्योजकाच्या अंगी स्वावलबीपणा हा गुण असावा लागतो.उद्योजक व्यवसायात स्वतःच्या कल्पना वापरून व्यावसायिक निर्णय घेत असतो. उद्योजकाला दुस- याच्या हाताखाली काम करणे आवडत नाही उद्योगातील निर्णय स्वतःघेत असतो.स्वत:च्या इतरांचे मार्गदर्श घेत असतांना विचारपुर्वक निर्णय घेण्याचे ठरवित असतो.

(१०) **साधन संपत्ती संपादन करण्याचे कौशल्य**ःउद्योजकला साधनसामग्री आणि मनुष्यबळाचे संयोजन करावे लागते.हे घटक मिळविण्यासाठी त्याला प्रयत्न करावे लागतात. भांडवलाची उभारणी करण्यासाठी वित्तपुरवठा करणा-या संस्थांशी संपर्क करावा लागतो उद्योगाच्या उभारणीच्या वेळी उद्योगासाठी जमीन, यंत्रसामुग्री, कच्चामाल, मनुष्यबळ यांची जुळवाजुळव करावी लागते हे कार्य जो उद्योजक अधिक चांगल्या प्रकारे करीत असेल तो उद्योजक एक आदर्श म्हणून सर्व त्याचे अनुकरण करीत असतात.

(११) **उत्साही वृत्ती**ःउद्योजक हा उत्साही वृत्तीचा असावा लागतो कारण त्याने कोणते ही कार्य करीत असतांना सहकाऱ्या बरोबर नेहमी चिकाटीने काम करण्याची त्याची इच्छा असवी उद्योजक स्वतः कष्टाळू असावा तर तो आपल्या सहकार्यांबरोबर कार्य करू शकतो. अडणीवर मात करण्याची त्याची तयारी असावी लागत

(१२) **प्रभावी व्यत्तीमत्वः** उद्योजक हा वैचारीक व स्वभाव गुणंनी इतरावर

प्रभावशाली असावा कारण उद्योजकाचे व्यक्तीमत्व हे सर्वात जमेची बाजू असते.त्याची क्षमता, कौशल्य,सवयी,वृत्ती इत्यादींचा इतरांवर प्रभाव झाल्यास तो एक आदर्श उद्योजक म्हणून ओळखला जातो.कारण त्याच्यात कष्ट करण्याचा प्रवृत्ती,सहनशीलता, जनसंपर्क, धडपड जिद्द, चिकाटी, दूरद्दष्टी,सातत्य, पाठपुरावा,व्यक्ती जोडण्याची कला इत्यादी गुण असावे लागतात.

(१३) **सकारात्मक भूमिकाः** उद्योजकाने नेहमी आशावादी असावे परंतू त्याने नैराश्यात राहू नये कारण उद्योगात यशअपयश मिळत असते त्या वेळी त्याने समस्येतून मार्ग काढता आला पाहीजे.उद्योजकाने कोणते ही कार्य हाती घेतल्या नतंर आपण त्यात यश सिघ्दी करू अशी त्याची वृत्ती असावी कारण उद्योजक कोणतेही कार्य जेव्हा हाती घेत असतो तेव्हा तो उद्योगात एक प्रकाराची जोखीम स्विकरीत असतो.म्हणून त्याने कार्य करीत असातोना कसकारात्मक भूमिकेतून कार्य करावे.

(१४) **शिकण्याची तयारीः** उद्योजकाला नवीन नवीन गोष्टी शिकण्याचा छंद असावा कारण त्याला नवीन क्षेत्राची जाणीव असावी व त्यालाची अभ्यासू वर्तन असावे बदलत्या काळा प्रमाणे उद्योगात बदल करणे अपेक्षित असते.म्हणून उद्याजकाने अद्यावयत असणे गरजेचे असते. जर उद्योजक जिज्ञासू असल्यास त्याला अपेक्षित उत्तरे मिळतात उद्योजक जे काही नवीन मिळवित असतो ते त्याच्या शिकण्याच्या वृत्तीतून मिळत असते. हे सर्व त्यास यश प्राप्त करण्यासाठी फायदेशीर असते.

(१५) **दूरद्दष्टीः नेहमी** उद्योजकाने दूरद्दष्टीकोणातून बघणे हा उद्योगातील महत्वचा टप्पा आहे पुढील कालावधीत काय घडू शकेल याचा त्याला वेध घेता आला पाहीजे तेव्हा आपण काय करू शकतो. हया द्दष्टीने उद्योजकाने पाहीले पाहीजे म्हणून उद्योजका जवळ दूरद्दष्टी हा गुण असावा.

(१६) **संघटन व वाटाघटचे कौशल्यः** उद्योजकाला चांगल्या प्रकारचे संघटन कौशल्य अवगत असावे तो जे काही जिंकतो त्याच्या अंगी असण्याऱ्या संघटन कौशल्याच्या जोरावर करीत असतो. उद्योजकाच्या अंगी संघटन कौशल्य हा गुण असेल तर तो सर्व कार्य आदर्श पध्दीतीने करू शकतो. उद्योगाची उभारणी करीत असतांना साधनसामग्री, मनुष्यबळ, कच्चामाल, यंत्रसामग्री व सर्व उत्पादन घटकांचे एकत्रिकरण करता आले पाहीजे व उद्योजकला वाटाघाटी करणे अवगत असावे कारण कर्मचारी,वरिष्ठ

अधिकारी, पुरवठादार, ग्राहक, यांच्याशी संपर्क येतो त्याचया वेळोवेळी करार करावे लागतात त्या वेळी तो योग्य पध्दतीने निर्णय घेता आले पाहीजेत.तरच तो उद्योजक यशस्वी होऊ शकतो.अशारितीने उद्योजकाच्या अंगी असणारे विविध गुण स्पष्ट करता येतात.

### **१.२.७ उद्योजकांची कार्ये** (Functions of Entreprenur)

मानशसास्त्रज्ञ,अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ अशा विविध ज्ञानशाखातील तज्ज्ञांचे लक्ष उद्योजकता हया संकल्पेनेने वेधून घेतलेले आहे आणि प्रत्येकाने आपापल्या दृष्टीकोनातून त्याकडे पाहीले. उद्योजकतेच्या विविध व्याख्यांावरून असे लक्षात येते की,विविध लेखकांनी, तज्ज्ञांनी निरनिरळी मते मांडलेली आहेत. त्यातील अनेकांनी कार्यात्मक व्याख्या दिलेल्या आहेत.**कॅन्टिलॉन, नाईट, से यांच्यासारख्या अर्थशास्त्राज्ञांनी जोखीम पत्करणे हे उद्योजकाचे अत्यंत महत्त्वाचे कार्य असते** असा विचार मांडला तर **मार्शल आणि से यांनी उद्योजकाची भूमिका संघटनेतील समन्वय, देखरेख आणि व्यवस्थापन या कार्याशी असल्याचा विचार मांडला. जोसेफ ए. शुम्पीटर यांनी उद्योजकाचे सर्वात प्रमुख कार्य म्हणजे नवनिर्मिती असा विचार मांडला.**

**शूम्पीटरने नवनिर्मिती- कार्य हेच उद्योजकाचे सर्वात प्रधान कार्य मानले आहे.** उद्योजकाचा अंगी सूजनशीलता असल्याने तो नवनिर्मिती करू शकतो. यात पुढीलप्रकारच्या **नवनिर्मिती- कार्याचा** शूम्पीटरने समावेश केला आहे.

**१. नवीन वस्तू निर्माण करणे**: उपभोगाच्या दृष्टीने पूर्ण नवीन अशी वस्तू व नवीन प्रकारचा दर्जा असणारी वस्तू उद्योजक निर्माण करतो.

**२. नवीन उत्पादन पध्दती वापरणे**: रूढ उत्पादन पध्दतीपेक्षा वेगळी अशी उत्पादनानी किंवा वस्तू हाताळण्याची पध्दत तो विकसत करतो.

**३. नवीन बाजारपेठ मिळविणे** :वस्तूला पूर्वी उपलब्ध नसलेली अशी नवी बाजारपेठ किंवा नवीन ग्राहक उद्योजक मिळवून देतो.

**४. माल पुरवठ्याचा नवीन मार्ग शोधणे**: वस्तू निर्मितीसाठी लागणाऱ्या उत्पादन घटकांच्या पुरवठयाचा सर्वस्वी नवा, चाकोरी बाहेरचा असा स्त्रोत तो शोधून काढतो.

**५. नव्याप्रकारे उद्योगाचे संघटन करणे**: उद्योगातील प्रस्थापितांची मक्तेदारी उद्योजक मोडून काढतो किंवा स्वतःची मक्तेदारी बाजारपेठेत निर्माण करतो.

भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या व्यक्ती जे कार्य करतात, त्यापेक्षा उद्योजकाचे व्यावसायिक घडामोडींना नेतृत्व देण्याचे कार्य वेगळे असते. असे शूम्पीटर मानतो. एखाद्या उद्योजक यशस्वी झाला की नाही हे व्यवसायात त्याचा नफा कसा वाढत गेला यावरून दिसते. **जे.एस.मिल या अर्थशास्त्रज्ञांच्या मते व्यवसायातील प्राप्ती वाढली व खर्च कमी झाला म्हणजे नफा वाढतो.** यासाठी उद्योजकाची तीन कार्ये महत्वाची ठरतात.

१) उत्पपदन घटकांचा योग्य संयोग व्हावा व उत्पादकता वाढावी यासाठी **पर्यवेक्षण** आवश्यक ठरते२) व्यवसायातील **वित्त व्यवहारांवर** नियंत्रण ठेवावे लागते.३) व्यवसाय संस्थेकडील मानवी व अन्य साधन संपत्तीचा सर्वोत्तम उपयोग होण्याच्या दृष्टीने त्याने **संचालन** करणे.

**मार्शल या शास्त्राज्ञाने उद्योजकाची चार प्रमुख कार्ये सांगितली आहेत.**

अ) **श्रमविभागणी** साध्यहोईल अशा तऱ्हेने संघटन-रचना करणे. ब) **धोरणे व योजना** यांच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थापन करणे.क) व्यवसायात नाविन्य आणणे.ड) **धोका पत्करणे.** यावरून सतत नाविन्याचा शोध घेणे व धोका पत्करणे या मुलभूत कार्याच्या जोडीला व्यवसायातील सातात्य टिकविण्याच्या दृष्टीने संघटन व व्यवस्थापन कार्येदेखील महत्वाची ठरवतात. उद्योजकाने व्यवसायाची स्थापना,धारणा व स्थिरता यासाठी आवश्यक कार्य पार पाडली, तर त्यातून आर्थिक व सामाजिक उन्नती घडवून आणण्याचे कार्यदेखील आपोआप सिध्द होते.

**पिटर किल्बी (Peter Kilby)** यांच्या मते, यशस्वीपणे उद्योग चालवण्यासाठी उद्योजकाला विविध प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात. त्यांच्या मते उद्योजकाला खालील कोंय करावी लागतात.

१) बाजारपेठेतील संधींचे आकलन
२) दुर्मिळ संसाधने प्राप्त करणे.
३) संसाधनांची खरेदी करणे
४) वस्तूंचे विपणन करणे स्पर्धेला तोंड देणे
५) सार्वजनिक क्षेत्रातील अधिकाऱ्यांशी सुसंबध राखणे
६) कर्मचाऱ्यांशी सुदृढ मानवी संबंध प्रस्थापित करणे.

७) ग्राहक आणि पुरवठा संस्था यांच्यांशी संबधं राखणे.
८) वित्तीय व्यवस्थापन.
९) उत्पादन व्यवस्थापन.
१०) कारखान्याची असेंब्ली प्राप्त करणे आणि त्यावर देखदरेख ठेवणे.
११) औद्योगिक अभियांत्रिकी
१२) उत्पादन प्रक्रिया सुधारून दर्जा उंचावणे.
१३) नवीन उत्पादन तंत्रज्ञाने आणि उत्पादने बाजारपेठेत आणणे.

लघुउद्योगात ही कार्ये बहुधा एकाच व्यक्तीकडून म्हणजेच उद्योजकाकडुन पार पाडली जातात. मात्र बडया उद्योगात प्रत्येक संबेधित क्षेत्रात कुशल असलेल्या अधिकाऱ्याकडून ही कार्ये करवून घ्यावी लागतात. कारण बडया उद्योगात प्रचंड संसाधनं, असंख्य कर्मचारी, विविध औद्योगिक कार्ये, पुरवठादार, ग्राहक आणि सरकर यांच्याशी असलेले गुंतागुंतीचे संबंध असतात.

**ऑर्थर एच कोल** हया उद्योजकाचा उल्लेख **निर्णय घेणारा** असा केला आणि **उद्योजकाची महत्वाची कार्ये** खालीलप्रमाणे वर्णन केली आहेत.

**अ) व्यवसायाची उद्दिष्टे ठरविणे**: उद्योजकाला स्वतःच्या उद्योगाची उद्दिष्टे ठरवावी लागतात. ज्या प्रकारचा उद्योग/उपक्रम सुरू केला असेल त्या संदर्भात ही उद्दिष्टे असतात. उत्पादन किती करावयांचे किंवा विक्री किती करायाची किंवा एखादी संस्था नव्यांनेच यशस्वीपणे सुरू करण्याचा विचार असेल तर तिच्या उलाढालीचे उद्दिष्ट उद्योजक ठरवतो.

**आ) संघटनेची निर्मिती** : उद्योजक स्वतःच्या उद्योगास अनुरूप अशा संघटनेची निर्मिती करतो.योग्य त्या प्रकाराची संघटना निवडून संघटनेची अंतर्गत रचना उद्योजक करतो.

**इ) वित्त संघटन करणे**: उद्योजकाला अत्यंत कौशल्याने वित्त संघटनाचे कार्य करावे लागते. अगदी प्रवर्तनापासून उद्योग सुरू झाल्यानंतरध्दा उद्योगाची आर्थिक परिस्थिती कशी असावी, किती खर्च होईल ह्या सर्वाचे आराखडे उद्योजकाला बांधावे लागतात.वित्त संघटन कार्य करण्यासाठी त्याने बाजारपेठेत आपली पत निर्माण करावी लागते.

**ई) तांत्रिक प्रगतीबाबत जागरूकता**: तंत्रज्ञान अतिशय झपाटयाने बदलते आहे. ह्याचे भान उद्योजकाला ठेवावे लगते.आत्याधुनिक तंत्रज्ञानाची तो माहिती करून घेतो. ह्याकरिता निरनिराळे अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांच्याशी तो आवश्यकतेप्रमाणे विचारविनिमय करतो.

**उ) बाजारपेठेचा विस्तार**: ग्राहकांना नेमकी कोणत्या वस्तूंची गरज आहे. हे ओळखून त्याप्रमाणे वस्तू /सेवांचा पुरवठा उद्योजक करतो. त्याचबरोबर बाजारपेठेचा विस्तार करतो.

**ऊ) जनसंपर्कः** उद्योजक उत्कृष्ट पध्दतीने जनसंपर्क प्रस्थापित करतो. कारण **जनसंपर्कावरच त्याच्या उद्योगाचे यश अवलंबून असते.** समाजातील प्रत्येक स्तराशी, तसेच सरकारशी योग्य तऱ्हेने उद्योजक जनसंपर्कठेवतो. अर्थात त्यामुळे उद्योजकाला यश मिळण्यास हातभार लागतो. जनमानसात आपली प्रतिमा उजळ करण्याच्या उद्योजक काटेकोर प्रयत्न करतो.

उद्योगाच्या स्वरूपात किती बदल झाले आणि उद्योगसंस्थेतील गुंतागुंत कितीही वाढली तरी **उद्योजकाची मध्यवर्ती कार्ये साधारणतः तीच राहतात** म्हणजेच कल्पनेचा विचार करणे आणि त्याची संघटना निर्माण करणे.

बड्या उद्योगांमध्ये लहान उद्योगाच्या तुलनेत उद्योजकांची कार्ये थोडी वेगळ्या स्वरूपात असतात .बड्या उद्योगात विविध प्रकारच्या व्यवस्थपकांकडुन कार्ये पार पाडली जातात आणि श्रमविभाजन हे वैशिष्ट्य असते.

थोडक्यात, खाजगी अथवा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकास मग उद्योजक एखादी व्यक्ती असेल किंवा व्यक्तींचा समुह असेल; खालीलप्रमाणे कार्ये करावी लागतात.

१) जोखीम पत्करणे आणि अनिश्चित आर्थिक स्थिती हाताळणे, (२) नवनिर्मिती,(३) उद्योगसंस्थेचे नियोजन,(४) समन्वय, प्रशासन आणि नियंत्रण,(५) उद्योगसंस्थेत दैनंदिन देखरेख करणे.

### १.२.८ नेतृत्व आणि उद्योजक

उद्योजक हा इतरांचे नेतृत्व करतो, त्यांना प्ररणा देतो व मार्गदर्शन करतो. या दृष्टीने त्याला नेता म्हणायला हवे. तो कार्यास प्रारंभ करतो व त्यात नाविन्य आणतो.इतर लोक

सहजपणे जी जबाबदारी स्वीकारायाला तयार होणार नाहीत,ती तो स्वीकारत असतो.

व्यवसायाची वाढ करायाची असेल तर कोणीतरी व्यवसायास योग्य असे क्षेत्र शोधावयास लागते, कामास सुरूवात करावी लागते.

नेतृत्वाची व्याख्या अनेक तऱ्हेने करता येईल. **"इतरांमध्ये एका समान उद्दिष्टांसाठी प्रयत्न करण्याची इच्छा निर्माण करण्याचे कौशल्य म्हणजे नेतृत्व असे"**वर्णन लिव्हिंग्स्टन करतो. त्याने नेत्याच्या अभिप्रेरण कार्यावर भर दिला आहे.**अल्फोर्ड व बीही यांच्या मते** नेतृत्व म्हणजे अनुयायांच्या गटाकडून अपेक्षित कार्य कोणतीही जबरदस्ती न करता करून घेणे.इतरांचे विचार, दृष्टीकोन व कार्य यांच्यावर परिणाम करून संघटनेची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने त्यांचे वर्णन घडवून आणण्याचे कौशल्य म्हणजे नेतृत्व असे **क्रिबीन म्हणतो**. सुप्त उपयुक्तता असणाऱ्या साधनसंपत्तीचे खऱ्या, उपयुक्त वस्तू व सेवांमध्ये रूपांतर करण्याची जबाबदरी उद्योजकावर असते. या दृष्टीने त्याच्यात नेतृत्वाचे गुण असणे जरूर आहे. **बुध्दिमत्ता, सामाजिक जाणीव, मानसिक प्रेरणा व कार्यसिध्दीची इच्छा यासारख नेतृत्वाचे मूलभूत गुण उद्योजकाच्या अंगी असावे लागतात.**

परिस्थिती जाणून त्यामधून ताबडतोब मार्ग काढण्यासाठी उद्योजक बुध्दिमान असावा लागतो. उपलब्ध साधन सामुग्री व मनुष्यबळ यांचा नवनव्या मार्गांनी सर्वोतम उपयोग करून घेता येण्याची कुवत त्याच्या अंगी असावी लागते. उद्योजकाला कामाचे संघटन करता आले पाहीजे, त्याचप्रमाणे कामाच्या तांत्रिक बाजूचीदेखील चांगली माहीती असली पाहीजे.**कोणत्याही उद्योजकाच्या अंगी नेतृत्वाचे हे सर्वसामान्य गुण असावेच लागतात.**

आपल्या कार्यगटाकडू काम करून घेण्यासाठी उद्योजकाला नेत्याची भूमिका अधिक कसोशीने पार पाडावी लागते.कारण आपल्याला त्याने प्रेरणा व मार्गदर्शन द्यावे अशी कार्य गटाची अपेक्षा असते. नेतृत्वाचे काही गुण असे आहेत की,जे प्रत्येक उद्योजकाच्या अंगी असतीलच असे नाही. **उत्तम नेता बनण्यासाठी उद्योजकाला हे गुण अंगी बाणवावे लागतील व त्यामुळे आपोआपच तो आपले योजलेले कार्य अधिक परिणामकारक पध्दतीने करू शकेल.**

प्रत्येक नेत्याला काही अनुयायी असले पाहिजे. या बाबतीत त्याचा मानवी संबधाबाबतचा दृष्टीकोन महत्वाचा असतो. उद्योजकाने नेता या नात्याने आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांची मनोभूमिका समजावून घेतली पाहिजे, त्यांना मार्गदशन केले पाहिजे व त्यांचा विश्वास पटकावला पाहिजे.

चांगला नेता नेहमीच कर्मचाऱ्यांच्या कामगिरीची दाद घेतो. त्यांचे कौतुक करून विकासाला उत्तेजन देतो. **जमशेटची टाटा किंवा लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्यासारख्या आपल्या देशातील महत्त्वाच्या उद्योजकांच्या चरित्राचा अभ्यास केला, तर त्यांनी आपल्या**

**कनिष्ठांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास उत्तेजन दिले व सर्व प्रकारची मदत केली असेच दिसून येते.** ह्या मनाच्या मोठेपणामुळेच त्यांचे स्थान इतरांपेक्षा वेगळे वाटते.उद्योजक-नेत्याने अशा वृत्तीने कनिष्ठांशी वर्तन केले तर त्यांच्या मनात नेत्याविषयी वेगळाच विश्वास निर्माण होतो. आपल्या चुकांचे तो भांडवल करणार नाही, तर त्यापासून काय शिकावे याचेच मार्गदर्शन करले,ही खात्री त्यांना वाटू लागते. उद्योजक-नेत्याजवळ कामातील तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य तर असावे लागतेच, पण त्यापेक्षाही महत्वाचे असे मानवी कौशल्य असेल, तर तो व्यवसायत व व्यक्तीगत जीवनात, व्यावसायिक म्हणूनच नव्हे तरं माणूस म्हणून यशस्वी होऊ शकेल.

## घटक २
## उद्योजकांचे प्रकार
## Types of Entrepreneurs

**अनुक्रमणिका**

२.० उदिष्टे
२.१ प्रास्तावना
२.२ विषय विवेचन
    २.२.१ उद्योजकांचे वर्गीकरण
    २.२.२ नवनिर्मितीवादी उद्योजक
    २.२.३ अनुकरणवादी उद्योजक
    २.२.४ परंपरावादी उद्योजक
    २.२.५ परिवर्तनवादी उद्योजक
२.३ परिभाषिक शब्द
२.४ स्वयं अध्ययन प्रश्न
२.५ सारंश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.० उदिष्टे


या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला.............

- ❖उद्योजकांचे वर्गीकरण स्पष्ट करता येइल.
- ❖नवनिर्मितीवादी उद्योजकाचे वर्णन करता येइल.
- ❖अनुकरणवादी उद्योजक नमुद करता येईल.
- ❖परंपरावादी उद्योजकची महिती देता येईल.
- ❖परिवर्तनवादी उद्योजक विशद करता येईल.

## २.१ प्रस्तावना

उद्योजकांचे गुण, वैशिष्टये, कार्य काम करण्याची पध्दती, तो कोणत्या कोणत्या क्षेत्रात काम करतो. कौटुंबिक स्थिती व वारसा, सामाजिक व राष्ट्रीय स्थिती, त्यांची इच्छाशक्ती या विविध घटकांचा उद्योजकांवर परिणाम होत असल्याने उद्योजकांचे तत्वानुसार व कार्यानुसार विविध प्रकार पडतात. या प्रकरणात अपणास विविध प्रकारच्या उद्योजकांचा अभ्यास करावयाचा आहे. **देशाच्या ज्या अर्थव्यवस्थेत उद्योजकाला कार्य करावे लागते ती अर्थव्यवस्था अतिशय महत्वाची समजली पाहिजे. कारण उद्योजकाचे अनेक निर्णय अर्थव्यवस्थेवरच अवलंबून असतात.**प्रगत किंवा विकसित अर्थव्यवस्थेत विविध प्रकारचे संशोधनपर प्रयोग करणे शक्य होते तर विकसनशील राष्ट्रात संसाधनांच्या तुटपुंज्या उपलब्धतेमुळे नवीन प्रयोग करीत न बसता सिध्द झालेल्या तंत्रज्ञानाचेच अनुकरण करणे अपरिहार्य ठरते. शिक्षणाच्या प्रचाराचासुध्दा उद्योजकतेवर परिणाम होतो. विशेष परिणाम होतो तो सामाजिक पर्यावरणाचा. कारण संभाव्य उद्योजक जेव्हा उद्योजकजा हा आयुष्यक्रम म्हणुन स्वीकारण्याचा निर्णय घेतो तेव्हा समाजाकडून, कुटूंबियांकडून त्याला प्रोत्साहन मिळते की विरोध केला जातो हेही महत्वाचे ठरते. प्रस्तुत प्रकरणाच्या अभ्यासाच्या सोयीसाठी उद्योजकांचे वर्गीकरण अभ्यासणे आवश्यक आहे. प्रारंभी आपण क्लॅरेन्स डॉनहॉफ यांनी केलेले उद्योजकांचे वर्गीकरण आणि त्यानंतर संकीर्ण वर्गीकरण अभ्यासणार आहोत.

उद्योजक क्लॅरेन्स डॉनहाफ यांनी अमेरिकेत शेतीमधील प्रयोगाच्या आधारावर विशिष्ट क्षेत्रातील उद्योजकते बाबत काही नोंदी केलेल्या आहेत.त्यांना अभ्यासात उद्योजकाचे चार प्रकार दिसुन आले होते. या प्रकारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे




**आकृती २.१ डॉनहॉफ यांनी स्पष्ट कलेले**

या उद्योजकाचे प्रकार पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील

**२.२.२ नवनिर्मितीवादी उद्योजक** (Innovative Entrepreneurs)**:**

नवनिर्मितीवादी उद्योजक या संज्ञेची व्याख्या करणे कठीण आहे परंतू जे उद्योजक विविध स्वरूपात घडून येणाऱ्या नवनिर्मितीचे स्वागत करतात व ही नवनिर्मिती आत्मसात करून प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी उद्योगाच्या विविध अंगामध्ये सुधारणा घडवून आणतात त्यांना नवनिर्मितीवादी उद्योजक असे म्हणतात. ज्या उद्योगांच्या प्रयत्नांमुळे नवनिर्मिती घडून येत त्यांनी नवनिर्मितीवादी उद्योजक म्हणतात.हे उद्योजक ग्राहक ांना हवी असलेली वस्तू भिन्न व आकर्षक स्वरूपात उपलब्ध करून देतात. व उत्पादनात नवीन पध्दतीचा स्विकार करतात. नवीन बाजारपेठांचा शोध घेत असतात. नवीन बाजारपेठेत ग्राहक निर्मिती करणे, व तेथे योग्य किंमती वस्तूचा पुरवठा करणे, उत्पादन पध्दतीच्या साधनसामग्रीसाठी नवीन मार्गाचा शोध घेणे व त्याचा उपयोग करणे, विविध पध्दतींच्या उपयोग करून कामगारांची कार्यक्षमता वाढविणे,ग्राहकांच्या अपेक्षा जाणून घेऊन त्यांचया आवडी प्रमाणे वस्तूचे उत्पादन करणे, स्पर्धकांचे दोष व चुका यांच्या मर्यादा समजुन त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करून नवीन वस्तूंचा पुरवठा करणे याबाबत व्यूहरचना ठरविणे उद्योजक नवनिर्मिती कोणत्याही क्षेत्रात घडवून आणू शकतो.उदा.उत्पादन प्रक्रिया,उद्योग संघटना, कच्चा माल व सामग्रीचा उपयोग, वित्तपुरवठा, विपणन प्रणाली, वस्तूंची वितरण व्यवस्था,जाहीरात मोहीम इत्यादी नवनिर्मितीवादी उद्योजक व्यावसायिक पर्यावरणावर अधिक प्रमाणात लक्ष ठेवून असतो. नवीन नवीन संधीची वाट पाहत असतो, व माहिती संकलन करीत असतो. एखादी संधी मिळल्यास त्याप्रमाणे त्या संधीचा उपयोग घेण्याची कार्यवाही केली जाते.

नवनिर्मिती करणे हे उद्योजकांचे एक कार्य आहे. जोसेफ शम्पीटर यांच्या मते नवनिर्मिती करणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय. उद्योजकाचे व्यवच्छेदक वैशिष्ट्ये आणि महत्वाचे कार्य असते. इतर उद्योजकांपेक्षा नवनिर्मितीवादी उद्योजकाची मानसीकता व दृष्टीकोण व त्याची प्रवृती भिन्न स्वरूपाची असते. हे उद्योजक वर्तमान काळातच भविष्यकाळाचा विचार करीत असतात.प्रचलीत पध्दतीविषयी त्यांचे समाधन झालेले नसते ते परिवर्तनाचे स्वागत करीत असतात या परिवर्तनाच्या माध्यामातून उद्योगांची आणि समाजाची प्रगती होत असते.

सर्व प्रकारचे संशोधन हा परिवर्तनाचा व नवनिर्मितीचा मार्ग आहे नवनिर्मितीवादी उद्योजक हा स्वतः हा संशोधन करीत नाही संशोधक नवीन

प्रक्रिया,नवीन पध्दती,नवीन तंत्रे, नवीन सामग्री, वस्तूचे नवीन उपयोग शोधून काढतात. नवनिर्मितीवादी उद्योजक हा संशोधनाचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करून,नवीन तंत्राचा वापर करून उत्पादन करीत असतात.आणि नवीन वस्तू बारपेठेत विक्रीसाठी सादर करीत असतात.

नवनिर्मितीवादी उद्योजक हे फक्त मोठया व संघटित उद्योगात असतात असे नाही सर्वच उद्योगांमध्ये नवनिर्मितीवादी उद्योजक असतात. हे उद्योतक जोखीम स्विकारतात स्पर्धेला समर्थपणे तोंड देत असतात.उपलब्ध साधसामग्रीचा परिपुर्ण वापर करीत असतात.आणि शास्त्रशुध्द पध्दतीने साधनसामग्रीचा वापर करून नवीन मार्ग शोधून काढीत असतात.

समाजात नवनिर्मितीवादी उद्योजकांची संख्या अधिक असल्यास तांत्रिक प्रगती झापाटयाने होत असते.तंत्रज्ञानाची प्रगती होते. परिवर्तन घडून येते. सर्व क्षेत्रात नवीन सुधारणा घडून येतात व आर्थिक विकासाला चालना मिळते. वेगवेगान प्रगती आणि मुलगामी परिवतर्न घडून येण्यासाठी नवनिर्मिवादी उद्योजक मोठया प्रमाणावर निर्माण झाले पाहीजेत. देशात नवनिर्मितीवादी उद्योजकाचा अभाव आहे समाजाच्या विकासासाठी नवनिर्मितीवादी उद्योजक निर्माण होणे आवश्यक आहे.

**२.२.३ अनुकरणवादी उद्योजक(Imitative Entrepreneurs):** हया उद्योजकाचे वर्तन नवनिर्मितीवादी उद्योजकासारखे नसते. तो केवळ इतंरोचे अनुकरण करून त्या प्रमाणे योजनांचा स्विकार करीत असतो. म्हणून त्यास अनूकरणवादी उद्योजक असे म्हणतात. अनुकरणवादी उद्योजक हा व्यवसात कोणती ही जोखीम स्विकारण्यास तयार नसतो.इतर उद्योजकांनी कोणत्या तंत्राचा स्विकार केला आहे त्याच तंत्राचा स्विकार करून उद्योगातील निर्णय घेत असतो तो कोणत्या ही प्रकारची जोखीमीचा स्विकार करीत नाही जे उद्योजक नवनिर्मितीसाठी प्रयत्न करतात या बाबतचे प्रयत्न अनुकरणवादी उद्योजक करीत नाही. एखदा उद्योजक यशस्वी झालेला असेल त्याचे उद्योगातील ध्येय धोरण स्विकर करून त्याचा व्यवसाय चालवित असतो. अर्थात अनुकरणवादी उद्योजक हा परिचित उद्योगाचे अनुकरण करून निर्णय घेत असतो.म्हणून त्यास अनुकरणवादी उद्योजक असे म्हणतात.

अनुकरणवादी उद्योजक हा प्रयोगशील नसतो.मिळालेल्या मार्गाने प्रवास करीत असतो. हा उद्योजक आपल्या जबाबदाऱ्या नैमित्तीक पध्दतीने पार पाडीत असतो. तो कोणत्या प्रकरची मोठी जोखीम स्विकारण्यास तयार नसतो. या

उद्योजकाचे नवीन उत्पादन बाजारात येत नाही व उत्पादनात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करीत नाही.

अनुकरणवादी उद्योजक इतराचे अनुकरण करतात त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) यशस्वी प्रभावी व सपन्न उद्योजकाचे अनुकरण करून व्यवसायाचे संचलन करीत असतो कारण यशस्वी उद्योजकाचे अनुकरण केल्याने आपला उद्योजगातील प्रवास सुरळीत व योग्य होईल असा त्याला विश्वास असतो.

(२) यशस्वी व प्रभावी व्यक्तीचे अनुकरण करणे ही सर्वसामान्य लोकांची स्वाभावीक प्रवृत्ती असते. उद्योजक त्याला अपवाद कसा राहणार!

(३) अनुकरणवादी उद्योजक नेहमी मर्यादीत जोखीम स्वीकारतात अनूकरण करून उद्योग चालवून निश्चित नफा मिळविण्याचा मार्ग पसंत करतात.

(४) विसनशील देशात आर्थिक विकासाच्या संरचनात्मक सोयींची कमतरता असते.उद्योजकांना विविध प्रकारे साहाय्य करणाऱ्या संस्थांचा अभाव असतो. उद्योजकाची व्यक्तीगत साधने मर्यादित असतात.उद्योजकला अनेक प्रकारचे अडथळे असतात व समस्या पण असतात समाजातील व्यावसायिक पर्यावरण उद्योजकांना प्रोत्साही करणारे व दिलासा देणारे नसते.समाजात उद्योजकीय स ंस्कृ ती प्रचलीत नसते.अशा अनेक कारणामुळे विकसनशील देशातील उद्योजक स्वतःचे कार्य क्षेत्र मर्यादीत ठेवत असतात.

विकसनशील देशात अर्थव्यवस्थेमध्ये अनुकरणवादी उद्योजक अधिक संख्येने असतात. त्यांचेचे प्रस्त असते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अनुकरणवादी उद्योकांची कामगिरी व कर्तृत्व महत्वाचे असते.याबाबत थोडक्यात विवेचन करता येईल.

१) अनुकरणवादी उद्योजक व्यवसायात इतरांचे व्यावसायिक तंत्रे स्विकारून फायदा मिळवित असतात. कारण त्यांना माहित असते की हे उद्योजक हया तंत्रावर यशस्वी झालेले आहेत असे अनेक उद्योजक अनुकरण करून व्यवसाय करण्यास प्रवृत होत असतात. बाजारात वस्तुच्या उत्पादनात वाढ होते लोकांना पर्यायी वस्तू उपलब्ध होतात बाजारात स्पर्धा कमी होते.त्यामुळे लोकांना कमी किंमतीत वस्तू उपलब्ध होतात व लोकांचे जिवनमान उंचावते.

२) अनुकरणवादी उद्योजकांच्या प्रयत्नांमुळे विकसनशील देशात नवीन उद्योगांची स्थापना होते. जुन्या उद्योगांचा विस्तार होतो आणि औद्योगिकीकरणाला

चालना मिळते देशात रोजगाराची संधी निर्माण होते. बेकारी कमी होण्यास मदत होत.

३ ) विकसनशील देशात भांडवलाची कमतरता व कुशल कामगार आणि तंत्रज्ञांचा अभाव असतो या समस्यांमुळे अनुकरणवादी उद्योजक ज्या उद्योगाची स्थापना करीत असतात. त्या उद्योगांना कुशल कामगार व अधिक भांडवलाची गरज नसते.

४ ) अनुकरणवादी उद्योजक हे लघु उद्योगाची निर्मिती करीत असतात हे उद्योग विकसनशील देशाला फार महत्वाचे असतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात बदल घडून येत असतो.

५ ) विसनशील अर्थव्यवस्था असलेल्या देशांमधील आर्थिक समस्या सामाजिक वातावरण, राजकीय अस्थैर्य, बाजारपेठेतील परिस्थिती, ग्राहकांचे प्राधान्यक्रम व त्यांच्या जवळ असलेली मर्यादीत क्रयशक्ती इत्यादी बाबी विचारात घेतल्यास उद्योजकांना अधिक जोखीम घेणे शक्य नसते. अनुकरणवादी उद्योजक हे जे उद्योग स्थापना करतात.त्यांचा हेतू जोखीम स्विकारणे नसतो.इतर यशस्वी उद्योगाचे अनुकरण करून व्यवसाय चालविणे. स्वीकार करतात.

६ ) अनुकरणवादी उद्योजकच्या कार्याचे एकूण स्वरूप हे एका पध्दतीने उत्पादन घटक विशिष्ट दशेने वळविण्याचा शास्त्रोक्त मार्ग होय कारण विकसनशील देशात वाढती गरीबी कमी करण्यासाठी लघुउद्योग मोलाची भुमिका बजावित असतात. कारण लोकांना रोजगाराची संधी प्राप्त होते.

**२.२.४ परंपरावादी उद्योजक(Fabian Entrepreneurs):**औद्योगिक क्षेत्रात भूतकाळत रूढ झालेल्या काही प्रथा,प्रचलित असलेल्या परंपरा आणि कुटूंब प्रमुख्यांनी भूतकाळत प्रस्थापित कलेले आदर्श लक्षात घेऊन जे उद्योजक त्यांचा उद्योगाचे संचलन करतात त्यांना परंपरावादी उद्योजक असे म्हणतात. ज्या कुटूंबात जुनी व्यावसायिक पार्श्वभूमी आणि उद्योजकतेची परंपरा असते असे उद्योजक औद्योगिक क्षेत्रा मध्ये रूढ झालेली प्रथा व परंपरांना पवित्र मानून त्यांना चिटकून राहणे आणि त्या प्रमाणे सर्व व्यवहार करीत असतात.

परंपरावादी उद्योजक हे नावाने ओळखले जातात हे उद्योजक नेहमी सर्तक राहत असतात.परिवर्तनाच्या बाबतीत ते फार साशंक व उदासीन असतात. हे उद्योजक स्वतः नवनिर्मितीचे प्रयत्न करीत नाहीत पण कोणत्याही प्रकारच्या परिवर्तनाचे स्वगत करीत नाहीत.व्यवसायात जोखीम स्वीकारणे अनिवार्य

असते.तेवढी जोखीम स्विकारण्याची तयारी असते. उद्योजक म्हणून जी कार्य करणे आवश्यक आहे तेवढी कार्य परंपरावादी उद्योजक करीत असतात. महत्वकांक्षी व उत्साही उद्योजकांनी त्यांच्या उद्योगांमध्ये कलेले प्रयोग हे उद्योजकांनी स्विकारलेली पध्दत आणि विकसित केलेले तंत्र उद्योगात वापर करण्याची मानसिक तयारी नसते.

व्यवसायत नवीन नवीन संकल्पनांचा अभ्यास करण्यात येतो व्यवसायिक शिक्षण व्यवस्थापकीय शिक्षण इत्यादीचा वापर करण्यात ज्ञान देण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. परंतु परंपरावादी उद्योजक या सर्व सिध्दांताचा वापर करीत नाही ते केवळ त्यांचे पुर्वी पासून चालत आलेले कार्य करीत असतात.नवीन सेवांचा वापर करीत नाहीत आजच्या परिस्थितीत हे उद्योजक त्याच पध्दतीने कार्य करीत आहेत अधिकार प्रदान करण्याची त्यांची तयारी नसते सर्व काम आपण केले पाहीजे अशी त्यांची इच्छा असते.परंपरावादी उद्योजकाचे काही ठरावी वैशिष्ट वर्णन करून त्यांची वृत्ती लक्षात येते परंपरावादी उद्योजक हे त्यांना फायदेशीर ठरेल त्याच कार्य पध्दतीसाठी गुंतवणूक करीत असातात.व काळानुसार त्यांच्यामताने कार्यपध्दतीचा स्विकार करीत असतात. म्हणून असे स्पष्ट करू शकतो की परंपरावादी उद्योजक हे विसनशील देशाच्या अर्थकारणात स्वतःचे योगदान करीत असतात. ते परिर्वतनाच्या प्रक्रियेत भाग घेत नाहीत जलद आर्थिक विकासाच्या कार्यात सहभागी होत नसतात. मुळातच त्यांचे विचार परंपरावादी असतात.


**२.२.५ परिवर्तनवादी उद्योजक (Dron Entrepreneurs):** नवनिर्मिवादी उद्योजक आपल्या प्रयत्नांनी, विविध मार्गांचा वापर करीत असतात आणि नवनिर्मिती घडवून आणतात. ही नवनिर्मिती उद्योगाच्या परिवर्तनात नव्या मार्गावर नेण्याचे कार्य करीत असते. अनुकरणवादी उद्योजक कोणत्याही प्रकारे परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न करीत नसातात व त्यांची कोणत्याही स्थितीत तयारी नसते. ते फक्तयशस्वी आणि प्रभावी उद्योजकाचे अनुकरण करीत असतात. परंपरावादी उद्योजक परंपरा व प्रथेचे अनुकरण करीत असतात. परिवर्तनाच्या बाबतीत संपूर्ण उदासीन असतात. उद्योगात परिवर्तन घडवून आणणाऱ्या उद्योगास ते विराध करीत असतात. हे उद्योजक जुनी मुल्य व प्रस्थापित पध्दतींना अनुसरून व्यासयिक कार्य करीत असतात व परिावर्तन विरोधी लोकांचे प्रतिनिधीत्व करीत असतात.

विकसनशील देशातील परिवर्तन विरोधी उद्योजक बदलणाऱ्या तंत्रास

विरोध दर्शवितात उत्पादन पध्दतीत बदल करणे नवीन तंत्रज्ञानाचा वापरकण्यास त्यांची मानसिकता नसते.म्हणून त्यांना पविर्तन विराधी उद्योजक असे म्हणातात. बदलत्या काळानुसार उद्योजकांनी नवीन तंत्राचा स्विकार करून उत्पादन तंत्र व पध्दतीत बदल घडवून आणणे आवश्यक असते नाही तर त्याचे दुष्परिणाम उद्योगास भोगावे लागतात परंतू परिवर्तनास विरोध करणारे उद्योजक त्यांच्या कार्यावर ठाम असतात आणि नवीन बदलास विरोध करीत असतात. व नवीन तंत्र आत्मसात करीत नाही व त्यांची प्रवृत्ती पण नसते. असे उद्योजक जुनी परंपरागत पध्दतीचा वापर करून व्यासाय चालविणे त्यांना आवडत असते. बदलाची परिस्थिती आली तर त्यास विरोध दर्शवित असतात. असे उद्योजक जुन्या पध्दतीने कार्य करीत असल्याने कालांतराने त्यांचे उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर येतात.

**२.२.१ उद्योजकाचे वर्गीकरण (Classificfication of entrepreneurs):**

उद्योजक विविध प्रकारच्या उद्योग समूहात वेगवेळे उद्योजक दिसून येतात त्यांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल




**आकृती २.२ उद्योजकांचे वर्गीकरण**

**१) आनुवंशिक उद्योजक आणि पहिल्या पिढीतल उद्योजक (Entrepreneues by Inheritance and first Genertion Entepreneurs)**-या वर्गीकरणत उद्योजक हे पुर्वी पासुन चालत आलेले व्यवसायचे हस्तांतरण एक पिढी कडुन दुसऱ्या पिढीकडे वारसा हक्काने जात असते अशा उद्योगांना आनुवंशिक उद्योजक म्हणता येईल आज आपल्या देशात उद्योगात असलेले उद्योजकांचा पुर्व इतिहास पाहीला तर काही मोठया उद्योगातील उद्योजक हे आनुवंशिकतेतून उद्योग चालवत असल्याचे दिसून येते. उदा टाटा उद्योग समूहात जमशेटजी टाटा,जे.आर.डी टाटा व रतन टाटा असे एकाकडून दुसऱ्या पिढीतील कुटंबातील लोकांकडे उद्योगाचे हस्तांरण झालेले आहे. तसेच बजाजउद्योग समुहात जमनालाल बजाज, कमलनयन बजाज, रामकृष्ण बजाज, व राहूल बजाज असे चित्र दिसून येते. असे अनेक उद्योग समूहातील अशा प्रकारचे चित्र दिसून येईल.

**आनुवंशिक उद्योजकचे फायदे-**

१. भारतात सुरवातीच्या काळात जे उद्योग सुरू होते त्यामुळे आपल्या देशात औद्योगिक विकास घडुन आला असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही ज्या वयर्क्तीनर पुढाकार घेऊन उद्योगाची उभारणी केली त्याचा फायदा आज दिसुन येतो नाही तर विकासाच्या बाबतीत मागे राहीलो असतो.

२. या उद्योजकांनी केवळ परंपरागत व्यवसाय न करता नवीन उद्योग निर्माण करून औद्योगिक विकासात भर घातलेली दिसून येते म्हणून या उद्योगांची भूमिका औद्योगिक विकसात महत्वाची आहे.

३. आनुवंशिक उद्योगातील कुटूंबात जन्मजात उद्योजकीय गुण असल्याने त्यांनी उद्योगाच्या बाबतीत घेतलेले निर्णय केव्हा ही फायदेशीर असतात.

४. या उद्योजकातील कुटूंबात पोषक असे वातावरण असते. कुटूंबात जन्मात आल्या पासून त्यांच्यावर उद्योजकीय संस्कार घडत असतात. त्यामुळे भविष्यात भावी उद्योजक म्हणून कार्य करण्यास यशस्वी होतात.

५. हे उद्योजक जन्मजात बलाढये असतात त्यांना उद्योग निर्माण करण्यासाठी भांडवल गोळा करण्यासाठी उणीव निर्माण नाही वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था तात्काळ कर्ज पुरवठा करीत असतात.

६. आनुवंशिक उद्योजकांनी केलेले प्रयत्नांमुळे भारतीय समाजत उद्योजकीय संस्कृती रूजण्यास मदत होते.

७. या उद्योजकांनी शिक्षण, संशोधन,कला,साहीत्य आणि सांस्कृतीच्या विकासासाठी अधिक योगदान केलेले दिसून येते.

**आनुवंशिक उद्योजकाचे तोटे -**

१ या उद्योजकामुळे उद्योगाचे मार्ग विशिष्ट जातीत किंवा समाजात दिसून येतात.त्यामुळे औद्योगिकीकरणास चालना मिळत नाही ठराविक लोकांच्या हातात उद्योग परंपरने चालत आलेल असतात.

२. आनुवंशिकतेळे बहूतेक उद्योग निवडक लोकांचया हातात आहेत. त्यामुळे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झालेल दिसून येते.

३ आनुवंशिक उद्योजक हे उपभोग्य वस्तूचे उत्पादन करण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक करीत असतात. मुलभूत उद्योगांची संख्या त्या मानाने वाढत नाही व विकासाला गती निर्माण होत नाही

४ हे उद्योजक संपत्तीच्या जोरावर राजकाणात हस्तक्षेप करीत असतात व औद्योगिक धोरण ठरवित असतांना सरकारवर दबाव आणी असतात.

**पहिल्या पिढीतील उद्योजक(First Genertion Entepreneurs)**

जे उद्योजक परंपरागत उद्योगात रूढ झालेले नसतात ते स्वतःच्या प्रयत्नाने उद्योजकीय कार्य करून उद्योजक होतात त्यांना पहील्या पिढीतील उद्योजक असे म्हणता येइल अशा उद्योजकांना कोणत्याही प्रकाची कुटूंबिक पार्श्वभूमि नसते. ते कवळ स्वत्ःच्या प्रयत्नाने उद्योजक म्हणून निर्माण होतात. अशा प्रकारच्या उद्योजकाने एक प्रकारे धाडस करून उद्योजकीय क्षे्त्रात प्रवेश केलेला असतो व सरकार केलेल्या मदतीवर तो उद्योजक म्हणून कार्य करण्यास प्रवृत झालेला असतो.हा उद्योजक निर्माण होण्या मागे काही कारणे असू शकतात उदा. बेकरी, उद्योग कण्याची इच्छा, प्रेरणा,उद्योजतचे आव्हान स्विकारणे, त्याने घेतलेला भविष्याचा वेध, उद्योजकीय प्रवृत्ती, इत्यादी भारतात पहील्या पिढीतील उद्योजक निर्माण होणे आवश्यक आहे व उद्योजकीय अव्हानाना समोरे जाण्याची प्ररणा व्यकेतींमध्ये यावी म्हणून पुढील स्पष्टीकरण करता येईल

१. भारतात नैसर्गिक साधन सामुग्री भरपूर प्रमाणावर उपलब्ध आहे या नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करण्यासाठी उद्योजक निर्माण होणे आवश्यक आहे त्यामुळे देशाचा आर्थिक सामाजिक विकास होऊ शकतो.

२. मागास जातीत पहील्या पिढीतील उद्योजक निर्माण झाल्यास समाजात अर्थिक व सामाजिक विषमता कमी होण्यास मदत होईल. पहील्या पिढीतील उद्योजक निर्माण झाल्याने स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात वाढ होऊ शकते.

४. कोणताही उद्योजक स्वतःसाठी किंवा इतर व्यक्तींना कामाची संधी निर्माण व्हावी म्हणून कार्य करीत असतो. ज्या प्रमाण पहिल्या पिढीतील उद्योगांच्या संख्येत वाढ होईल त्या प्रमाणे रोजगार क्षेत्रात वाढ होत असते.व बेकारी कमी होण्यास मदत होते

५.पहिल्या पिढीतील उद्योजक निर्माण झाल्याने उद्योगास पुरक व्यवसायाची निर्मिती होत असते व जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते.

६. पहिल्या पिढीतील उद्योजक मोठया प्रमाणावर निर्माण झाल्याने समाजात आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंदीकरण आणि मक्तेदारी कमी होण्यास मदत होते.

आनुवंश उद्योजक हे पहिल्या पिढीचे उद्योजक नाहीत हया दोनभिन्न प्रकारच्या उद्योजकांची तुलना पुढील प्रमाणे करता येईल

१. उद्योजकाच्या कुटुंबात जन्माला आलेला व्यक्ती आनुवंशिकतेच्या आधारावर उद्योजक होतात तर पहिल्या पिढीलतील उद्योजक हे ते स्वयंप्रेरणेने व जानीवपुर्व उद्योजक म्हणून कार्य करतात

२. आनवंशिक उद्योजकाचा जन्म उद्योजकाच्या कुटूंबात झालेला असतो. त्यामुळे त्या व्यक्तीच्या अंगी उद्योजकीय गुण वैशिष्ट येतात.पहिल्या पिढीतील उद्योगात हे गुण जन्मजात नसतात त्याने अत्मसात केलेले असतात.

३. आनुवंशिक उद्योजकाचे कुटूंबात संगोपन केले जाते. त्याच्यावर संस्कार केले जातात. औपचारिक व आनौचारिक शिक्षण दिले जाते.उद्योगात विविध पदांवर जबाबदरी सोपविण्यात येते पहिल्या पिढीतील उद्याजकतेतअसे कोणते ही फायदे मिळत नाही.तो अडचणीवर मात करून संकटांना तोंड देऊन उद्योलक झालेला असतो.

४. आनुवंशिक उद्योजक हे पिढीजात संपत्तीचे मालक असतात त्यांचया जवळ वित्तीय साधने भरपूर असतात.तसेच या उद्योजकास समाजात मान प्रतिष्ठा असते.व राजकी पाठबळ असते. परंतू पहिल्या पिढीतील उद्योजक हा उद्योजकतेत प्रथम प्रवेश केलेला असतो त्याचे एवढे सबध प्रस्थपित नसतात तो त्याच्या पध्दतीने उद्योजकीय कार्य करीत असतो.

५. आनुवंशिक उद्योजक हे समाजातील उच्च जातीतील व संपन्न कुटूंबातील असतात. पहिल्या पिढीतील उद्योजक हे वेवेगळ्या जातीमधील असतात. त्यांना उद्योजक होण्याची प्रबळ इच्छा असते त्या प्रेरणेने किंवा

सरकारी योजनांच्या प्रेरणेने उद्योजक झालेल असतात.

२ **व्यक्तिगत उद्योजक आणि संस्थात्म उद्योजक** (Individual Entrepreneurs and Institutional Entrepreneurs)

व्यक्तीगत उद्योजक हा स्वतःचे भांडवल गुंतवणूक करून उद्योगाची उभारनी करीत असतो.हा व्यक्ती व्यवसायाच्या व्यवस्थापनेसाठी अनुभवी व कायद्याचे ज्ञान असलेल्या व्यक्तीकडून सल्ला व मार्गादर्शन घेत असतो. किंवा त्यांची नेमणुक उद्योगात करीत असतो. त्याच प्रमाणे हया उद्योजकास अधिक भांडवलाची गरज भासल्यास तो त्याचे नातेवाईक किंवा वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थे कडून कर्ज रूपाने भांडवल उपलब्ध करू शकतो. उद्योगातील मालकी टिकून ठेवण्यासाठी दक्षता घेत असतो म्हणून त्याला
व्यक्तीगत उद्योजक असे म्हणतात लघुउद्योग क्षेत्रात बहू संख्ये उद्योजक व्यक्तीगत स्वरूपाचे उद्योजक असतात. आपल्या देशातील औद्योगिक अर्थव्यवस्थेमध्ये हया प्रेकारचे उद्योजकांचे वर्चस्व आढळून येते. व्यक्तीगत उद्योजक खर्चाच्या बाबतीत अधिक काटकसर करीत असतात.आणि संसाधन सामग्रीचा अधिक परिणामकारक उपयोग होईल यासाठी काळजी घेत असतात. ते त्यांचे निर्णय तात्काळ घेत असतात व परिस्थितीनुसार व गरज प्रमाणे धोरणांमध्ये आवश्यकते बदल करीत असतात.

व्यक्तीगत उद्योजकाचे आर्थिक सामर्थ्य फार मर्यादीत असते त्याचे उद्योग त्याच्या संसाधनांच्या मर्यादेवर विकसित होत असतात.जर या उद्योजकास उद्योगाचा विस्तार व वाढ करण्यासाठी संयुक्त भांडवली संस्थेची स्थापना करून उद्योगांना संस्थात्मक स्वरूप देवून संस्थेची उभारणी करतो त्यास संस्थात्मक उद्योजक असे म्हणतात. आजच्या स्पर्धायुक्तपरिस्थितील व्यक्तीगत उद्योजकास टिकून राहणे कठीण झालेले आहे म्हणून
व्यक्तीगत उद्योजक एकत्रित येऊन संस्थात्मक उद्योगाची करतात. व बाजारपेठेत ग्राहकांच्या मागणी प्रमाणे वस्तू किंवा सेवा पुरवठा करतात हे संस्थात्मक उद्योजकांना सिध्द करून दाखविलेले आहे.आज संस्थात्मक उद्योजकांच्या संख्येत वाढ होत आहे.

३ **तंत्रज्ञ उद्योजक** (Technologist Entrepreneurs)

तंत्रज्ञ उद्योजक हा शिक्षण व प्रशिक्षण घेऊन निर्माण होत आहेत हे उद्योजके अजच्या नवीन पध्दतीनुसार तांत्रिक शिक्षण प्राप्त करून उद्योग क्षेत्रात प्रवेश करीत असतांना दिसून येत आहेत.कारण सरकारने तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थाची स्थापना केल्याने नवीन पिढीतील तरूण या शिक्षणाकडे आर्कर्षीत होत आहेत उद्योजकीय उच्च प्रतीचे शिक्षण घेऊन येणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. हे

उद्योजक नवीन उद्योगांची स्थापना करतात व त्याचा कारभार स्वतःपाहत असतात.उदा रसायन उद्योग व इलेक्टॉनिक उद्योग, मशीनरी उद्योग इत्यादी.

**४) खाजगी क्षेत्राजील उद्योजक आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजक (private Sector Entreprenuers and Public Sector Entrepreneurs)**

आज सर्वच देशात मिश्र अर्थव्यवस्थेत प्रवेश केल्याने उद्योगांची वाढ होत असतांना दिसून येते ठराविक लोक एकत्रित येऊन नफा मिळविण्य च्या हेतून औद्योगिक उपक्रमाची स्थापना करतात अशा उद्योगांना खाजगी क्षेत्रातील उद्योग असे म्हणतात. भांडवलशाही अर्थव्यस्थे मध्ये अशा उद्योजकांचे प्रबल्य अधिक असते.खजगी क्षेत्रातील उद्योजक ांनी प्रभावी कामगीरी केल्याने उद्योगांची भरभराट झालेली होते. अर्थव्यस्थेच्या विकासाचा वेगवाढतो, रोजगाराची संधी निर्माण होते व लोकांचे राहणीमान उंचावत असते.व खाजगी क्षेत्रातील उद्योजकांच्या
कामगीरीमुळे भांडवलशाही व्यवस्थेचा पाया भक्क म होते व आर्थिक सत्ता व संपत्ती ठरावीक लोकांच्या हातात असते आणि आर्थिक सामाजिक पिषमतेची दरी रूंदावते, साधनहीन व असंघटीत व्यक्तींची पिळवणूक होत
असते.

अर्थव्यवस्थेमधील ज्या क्षेत्रात उत्पादनाच्या साधनांवर सरकारची मालकी व नियंत्रण असते अशा क्षेत्रास सार्वजपिक क्षेत्र असे म्हणतात जेव्हा सरकार स्वतः पुढाकार घेऊन काही विशिष्ट आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे साध्य करून घेण्याकरीता, औद्योगिक व व्यापारी उपक्रमांची स्थापना घडवून आणली जाते त्या उपक्रमांना सार्वजनिक उपक्रम असे म्हणतात.सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात आधारभूत सेवा प्रदान करण्यात येतात,व देशातील उद्योगांसाठी आवश्यक अशा पायाभूत सोयी सुविधा निर्माण करण्यात येतात.समाजाच्या हितासाठी उद्योगांवर सरकारचे,नियंत्रण असते. औद्योगिक विकासाचा वेग वाढविणे, सरकारचे उत्पन्न वाढविणे,आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळणे,आर्थिक व सामाजिक विषमता कमी करणे, अशा प्रकारची उद्दिष्ट समोर ठेवून सार्वजकनिक क्षेत्रातील उद्योगांच्या कामगीरीमुळे आपला देश विकासाच्या मार्गावर आहे.

**५ व्यापारी उद्योजक (Trading Entrepreneurs)**

उद्योजकतेचा संबधं हा वस्तूंच्या किंवा सेवाच्या निर्मितीशी व कारखान्याशी असतो हे म्हणने चुकीचे आहे उद्योजकतेचा संबंध वस्तुच्या निर्मितीशी ज्या प्रमाणे असतो. त्या प्रमाणे विपणनाशी पण असतो व्यापाराच्या क्षेत्रात आव्हाने स्विकारणाऱ्या व्यक्तीस व्यापारी उद्योजक असे म्हणतात.

व्यापारी उद्योजकाचे क्षेत्र हे व्यापाराजतील लहान किंवा किरकोळ स्वरूपाचे किंवा घाऊक असू शकते व्यापारी उद्योजकार्य कार्य देशा पुरतेच किंवा अंतरदेशीय किंवा विदेशी व्यापार सारख्ये विस्तारीत असू शसते. व्यापारी उद्योजक हे उद्योजकाची सर्वच कार्य पारपाडीत असतात. तसेच हा उद्योजक वस्तूच्या विक्रित वाढ होण्यासाठी देशात व देशासाबापेठेचा शोध घेत असतो वस्तूची जाहीरात करून वस्तूला मागणी निर्माण करण्याचे कार्य हे उद्योजकाकडून केले जाते. ग्राहकांच्या मागणी प्रमाणे वस्तूंचा पुरवठा करण्याचे कार्य हे उद्योजक करीत असतात. त्याच प्रमाणे ग्राहकांना आवश्यक असलेल्या सेवा देण्याचे कार्य करीत असतात त्यात दुरूस्तीची सोय, वस्तूची हमी देणे इत्यादी कार्य व्यापारी उद्योजक करतात. हे उद्योजक ग्राहकांना सेवा पुरवून जास्तीत जास्त नफा मिळवित असतात अशारितीने व्यापारी उद्योजक कायम स्वरूपात ग्राहक वर्ग निर्माण करीत असतात व ग्राहकांचे समाधान करणे व नवीन ग्राहक वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न या उद्योजकांकडून करण्यात येतो.

६) औद्योगिक उद्योजक (Indudtrial Entrepreneurs)

उद्योजकविशिष्ट प्रदेशात ग्राहकांच्या वास्तविक गरजा ओळखून व संभाव्य गरजांचा शोध घेऊन हय़ा गरजा भागविण्यासाठी व उपयुक्त वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी उद्योगांची स्थापना करणाऱ्या व्यक्तींना औद्योगिक उद्योजक असे म्हणतात उद्योगिक उद्योजक म्हणतात उद्योगिक उद्योजक म्हणजे उद्योगांची स्थापना करणारे उद्योजक ,उद्योगपती किंवा कारखानदार होय. हे उद्योजक नैसर्गिक, आर्थिक व मानवी संसाधने आणि उपयुक्त तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री एकतत्रित आणून नफा मिळवून देणाऱ्या उद्योजगांची स्थापना करतात.

औद्योगिक उत्पादकाचा आता बदलेला द्दष्टीकोण दिसून येतो अगोदर वस्तूचे उत्पादन करतात नंतर त्या मालाची जाहीरात करतात आणि बाजापेठेत मालास मागणी निर्माण करतात. हे कार्य नफा मिळविण्याच्या हेतूने केले जाते. अलीकडे बाजारपेठेतील स्पर्धा सतत वाढत आहे म्हणून उद्योजाकांना त्यांच्या समोर उभे राहणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते.

७) शेती क्षेत्रातील उद्योजक (Agricultural Entrepreneurs)

जे उद्योजक शेती क्षेत्रातील सुधारणा घडवून आणण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करून जी साधने उत्पादन करण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवलाची गुंतवणू करीत असतात त्यांना शेती क्षेत्रातील उद्योजक असे म्हणतात .अशा प्रकारचे उद्योजक हे शेती व्यवसायासाठी लागणारे यंत्रसामाग्री व पाणी पुरवठया

सोयी निर्माण करण्यासाठी सुधारित तंत्रज्ञान आणून उद्योगाची स्थापना करतात व शेती उत्पादन घेण्यासाठी लागणारे बियाने, यंत्रसामग्री, शेती करीता पाणी पुरवठयाची साधने, व शेती पुरक व्यवसाय करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री आणि साधने उपलब्ध करून देत असतात ते जी भांडवलाची गुंतवणूक करीत असतात त्याची जोखीम स्विकारीत असतात. उदा. जैन उद्योग समूहाने शेतकऱ्यासाठी नवीन तंत्र विकसित केल्याने त्यांच्या बाबतीत आज बघण्याचा द्दष्टीकोन वेगळाच आहे कारण त्यांना शेती साठी ठिबकचे तंत्र विकसित केलेले आहे. आता भांडवलशाही पध्दतीने शेती करण्यासाठी संयुक्त भांडवनी संस्थांची स्थापना केली जाते. या प्रकारच्या उद्योजकाची इतर क्षेत्र म्हणजे फळबागा, डेअरी, फुलांचीशेती, कुकूट पालन, रासायनिक खते व नवीन सुधारित बियाणे इत्यादी उत्पादने व शेतीसाठी लागणारे यंत्र व उपकरणांची निर्मिती इत्यादी.

८) व्यवसायिक उद्योजक (Professional Entrepreneurs)

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत प्रत्येक देशात व्यावसायिका उद्योजक हा एक नवीन वर्ग अस्तित्वात आलेला आहे अशा प्रकारचे देशात उद्योजक एखादी संधी शोधतात, योजना तयार करतात, उद्योगाची स्थापना करतात व संघटनेची उभारणी करतात व नंतर हे उद्योग दुसऱ्यास विकतात व आपल्या जबाबदारीतून मुक्त होतात अशा प्रकारच्या उद्योजकाना व्यावसायिक उद्योजक असे म्हणतात. व्यावसायिक उद्योजक हे नफा कमविण्यासाठी उद्योगाची उभारणी करीत असतात.

९) वास्तविक उद्योजक आणि प्रेरित उद्योजक (Real Entrepreneurs and Induced Entrepreneurs)

उद्योजके एखाद्या व्यक्तीला तिचे कार्य अत्यंत प्रभावीपणे करण्यासाठी प्रोत्साहीत करणारी व यश मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करण्यासाठी प्रवृत्त करणारी प्रबळ भावना म्हणजे सिध्दी प्रेरणा होय काही व्यक्तींमध्ये ही भावना जन्म जात असते. असे व्यक्ती उद्योगाची स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतात. आणि व्यवसायातील जोखीम स्विकारतात, कठोर परिश्रम करतात व सर्व अव्हानांना समर्थपणे तोंड देतात असे उद्योजक बनणे स्वाभाविक प्रक्रिया आहे. या पध्दतीने तयार होणाऱ्या उद्योजकास वास्तविक उद्योजक असे म्हणतात.

कारखानदारीचा विकास होण्यासाठी सरकारने सोयी सवलती उपलब्ध करून दिलेल्या आहेत व विविध योजना कार्यान्वित केलेल्या आहेत त्या आधारे जे नवीन उद्योगाची स्थापना करतात त्यांना नवीन उद्योजक असे म्हणतात.

१०) पुरूष उद्योजक आणि स्त्री उद्योजक (Male Entrepreneurs

and Women Entrepreneur)

आजच्या आधुनिककाळात पुरूषांबरोबर स्त्रिया सर्व जबाबदारी सांभळण्यास समर्थ आहेत. म्हणून महीला उद्योजकाची भूमिकाही वेगळयाच प्रकारची दिसून येते परंतू पुरूष आणि स्त्रिया हे दोन प्रार उद्योजकतेच्या दृष्टीने करता येतील हे पुढील स्पष्टीकरणा वरून दिसून येईल.

१. उद्योजकाच्या क्षेत्रात उद्योजकीय प्रेरणांना विशेष महत्व आहे. पुरूष उद्योजकांपेक्षा स्त्री उद्योजकांच्या प्रेरणा वेगळया आहेत.

२. पुरूष उद्योजकांच्या तुलनेत स्त्री उद्योजकांच्या वेगळया समस्या आहेत.

३. स्त्री उद्योजक हया शेवटी स्त्रियाच आहेत. काही गंभीर स्वरूपाच्या मर्यादा आहेत.

४. उद्योजकांना एका मर्यादीत वर्तुळातच काम करावे लागते. त्यांची क्षमता अधिक असून सुध्दा त्यांना कार्य करण्यासबंधी घालवण्यात आलेली आहे.

५. समाजात काही वर्ग दुर्बळ असतात. त्या प्रमाणे स्त्रीयांना दुर्बळ मानले जाते .

वरील स्पष्टीकरणावरून स्त्री उद्योजकांचा एक वेगळा वर्ग आहे सांगता येते. स्त्रीया हया पुर्वी पासून उद्योजकीय कार्य करतात असे म्हणता येईल कारण हॅरेज विल्सन यांनी असे स्पष्ट केले आहे की स्त्रीया जन्मजात उद्योजक आहेत. त्यांच्यात पुरूष उद्योजकांच्या तुलनेत काही विशेष गुण आहेत म्हणून स्त्री उद्योजक यशस्वी होऊ शकतात आज आपण पाहतो लिज्जत पापड व्यवसायात स्त्री उद्योतकाने केलेले कार्य दिसून येते. स्त्री उद्योजकाच्या काही समस्या असतात व त्यांना प्रेरणा देण्याची गरज आवश्यकता आहे अलीकडे सरकारने स्त्री उद्योजकानी उद्योग करावेत म्हणून विविध सोयी सवलती देण्यात आलेल्या आहेत.

**२.३ परिभाषिक शब्द**

**२.४ स्वयं अध्ययन प्रश्न**

प्रश्न १ : उद्योजकांना सहाय्य करणाऱ्या संस्था थोडक्यात स्पष्ट करा ?

--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

प्रश्न २ : उद्योजकता प्रशिक्षणाच्या पध्दती स्पष्ट करा ?

--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

प्रश्न ३ : उद्योजकता प्रशिक्षण संस्था विशद करा ?

--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

प्रश्न ४ : व्यवस्थापन विकास संस्था स्पष्ट करा ?

--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------
--------------------------------------------------

## २.५ सारांश

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १ : उद्योजकता विकासातील संस्थेची भुमिका सविस्तर वर्णन करा ?

प्रश्न २ : उद्योजकता विकास ही संकल्पना स्पष्ट करा ?

प्रश्न ३ : व्यवस्थापन विकास संस्थेने केलेले कार्य स्पष्ट करा ?

प्रश्न ४ : विविध उद्योजकता विकास संस्था विशद करा ?

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१.येवले, अरून;सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरिंवद २०१० उद्योजकता विकास, जळगांवः प्रशांत पब्लिकेशन.

२. कडवेकर,व्ही.;रावळ, सी एन.आणि कोठावदे, आर.२००५व्यवसायिक उद्योजकता, पुणेः डायमंड बुक डपो

३. देशमुख, प्रभाकर २००२ उद्योजकता विकास,नागपुरः पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स

४. Khan, M.A,1992 Entrepreneurial Development in Indhi, New Delhi:Kanishka Publishing House

5. Khanka, S.S.2001Entrepreneurial Development,New Delhi:S.Chand& Co.

## घटक ३

## उद्योजकाची भुमिका

# Role of Entrepreneurs

**अनुक्रमणिका**


३.० उदिष्टे

३.१ प्रास्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ आर्थिक वृध्दीत उद्योजकाची भुमिका
- ३.२.२ आर्थिक विकासात उद्योजकाची भुमिका
- ३.२.३ विकसीत, अविकसीत आणि विकसनशील देशांच्या अर्थशास्त्रात उद्योजकाची भुमिका
- ३.२.४ उद्योजकतेवर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा प्रभाव
- ३.२.५ नाविन्याचा शोध घेणाऱ्या उद्योजकांची यशोगाथा
  - ३.२.५.१ शंतनुराव किर्लोसकर
  - ३.२.५.२ आबासाहेब गरवारे
  - ३.२.५.३ राहुल बजाज
  - ३.२.५.४ बी. जी.शिर्के

३.३ परिभाषिक शब्द

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न

३.५ सारंश

३.६ सरावासाठी स्वाध्याय


## ३.० उदिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला ............

❖आर्थिक वृध्दीत उद्योजकाची भुमिका स्पष्ट करता येईल.

❖आर्थिक विकासात उद्योजकाची भुमिका वर्णन करता येईल.

❖विकसीत, अविकसीत आणि देशांच्या अर्थशास्त्रात उद्योजकाची भुमिका नमुद करता येईल.

❖उद्योजकतेवर जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा प्रभाव विशद करता. येईल.

❖नाविन्याचा शोध घेणाऱ्या काही उद्योजकांची यशोगाथा वर्णन करता येईल.

## ३.१ प्रस्तावना

अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेचा विचार करणारे शास्त्र आहे.अर्थव्यवस्था म्हणजे अशी पध्दती की, जिच्या साहाय्याने समाज आर्थिक वस्तूंचे उत्पादन व वितरण करतो. उत्पादन वितरण, उपभोग आणि विनिमय यांचेशी निगडीत असे निर्णय घेणे व त्यांची अंमलबजावणी करणे यासाठी समाजाकडून या पध्दतीचा वापर केला जातो. साधनसामग्री, (जमिन, श्रम, भांडवल, संघटन, कौशल्य इत्यादी.) सहभागीदार, ( कुटूबं, व्यवसाय संस्था, शासन) बाजारपेठा,माहिती, बँका, सामाजिक संघटना इत्यादी घटक अर्थव्यवस्थेत समाविष्ठ होतात.

अर्थव्यवस्था एकूण समाजरचनेचा एक हिस्साच आहे. समाजाचे आर्थिक जीवन सामाजीक रचनेच्या चौकटीत सामावलेले असते. कायदा परंपरा आणि संस्था यांचा प्रभाव समाजाच्या आर्थिक जीवनावर घडून येत असतो.

अर्थशास्त्राज्ञांनी अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टांसंबंधी आणि भूमिकेसंबंधी वेळोवेळी विविध मते मांडलेली आहेत. राजकीय, धार्मिक व कायदेशीर गोष्टींचा प्रभाव विचारात घेवून या तज्ञ विचारवंतांनी विविध विचार मांडले. १८ व्या शतकाच्या मध्यापासून ते आजपर्यन्त पुरातनवादी ते आधुनिक विचारवंतापर्यन्त सर्वांनी त्या त्या परिस्थितीत आपले विचार मांडले. अर्थव्यवस्थाची नियंत्रित अर्थव्यवस्था, साम्यवादी अर्थव्यवस्था, समाजवादी अर्थव्यवस्था, मिश्र अर्थव्यवस्था आणि मुक्त अर्थव्यवस्था अशी विविध रूप मांडली आहेत.

**उद्योजक हा अर्थव्यवस्थेतील आर्थिक निर्णय घेण्यातील एक महत्त्वाचा घटक (अभिकर्ता) असतो**. कोणताही देशाची अर्थव्यस्था ही काही उद्दिष्टेसमोर ठेवते. यातून आर्थिक विकास ही कल्पना पुढे आली. आर्थिक स्थैर्य, पूर्ण रोजगार राष्ट्रीय उत्पादन वाढ अशा विविध उद्दिष्ट्यांच्या दृष्टीने उद्योजक ही संकल्पना वेगवेगळी रूपे घेत गेली.

**देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये किंवा समाजाच्या आर्थिक जीवनात विशिष्ट प्रकारचे बदल घडवून आणणाऱ्या प्रकियेला 'आर्थिक विकास'असे म्हणतात**. आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की,ज्यामुळे दिर्घकाळात एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वास्तविक राष्ट्रय उत्पन्नात वाढ होते.आर्थिक विकास ही विभिन्न प्रकाराच्या बदलांची निष्पती म्हणून घडून येणारी एक प्रक्रिया असून ती सातत्याने सुरू असते. याबदलांमुळे देशात वस्तू व सेवांच्या उत्पादनाची पातळी वाढते. वस्तू व सेवांचे उत्पादन वाढल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नतही

वाढ होते. प्रत्येक दशाचे राष्ट्रीय उत्पन्न हे एकूण **(Gross) व शुध्द (Net)** असे दोन प्रकारे सांगितले जाते. एकून राष्ट्रीय उत्पन्नात किती वाढ झाली ऐवढेच पाहून त्या देशाच्या आर्थिक विकासाद्दल नेमकी कल्पना येऊ शकत नाही. त्यामुळेच एक वर्षाच्या मुदतीत वास्तविक किंवा राष्ट्रीय उत्पन्नात किती वाढ झाली.या निकषांचा उपयोग करून मगच देशाचा
आर्थिक विकास किती झाला ते ठरविले जाते.

एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाबद्दल निष्कर्ष काढतांना नागरिकांना आवश्यक असलेल्या वस्तू व सेवा पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणावर उपलब्ध होऊ लागल्या काय ? समाजामधील आर्थिक विषमतेत उत्तरोत्तर घट होत आहे काय ? नागरिकांचे जीवन सुखी संपन्न होण्यासाठी आवश्यक असलेल्या सोयी, सवलती व संघी उपलब्ध आहेत काय ? या बाबींचाही पुरेसा विचार केला जाणे आवश्यक असते.

थोडक्यात **आर्थिक विकास म्हणजे अशी प्रक्रीया की, ज्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न**
**व दरडोई उत्पन्नात सातत्याने वाढ घडून येते, आर्थिक विषमतेत घट होते.** आर्थिक कल्याणात ठरणाऱ्या सोयी व सवलती अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध होऊ लागतात.

## ३.२ विषय विवेचण

### ३.२.१ आर्थिक वृध्दी उद्योजकाची भूमिका
### (Role of Entrepreneur in Econamic Growth)

आर्थिकवृध्दीच्या प्रक्रियेत उद्योजक अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावतो. आर्थिकवृध्दीची गती वाढविण्यासाठी तो पुढाकार घेतो व चालना देतो. **आर्थिक विकास व आर्थिकवृध्दी यांचा उद्योजकतेशी जवळचा संबंध आहे.** मुलत: व्यवसाय संस्था सुरू
करणे हे उद्योजकांचे प्रमुख कर्तव्य आहे. उद्योजक कल्पक असल्यास त्याला उच्च दर्जाची महत्वाकवांक्षा असते. तो बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेतील एक गतिमान घटक असतो. उद्योजक हा संपत्ती निर्माण करतो. त्याला नवीन काहीतरी करण्याची इच्छा असते. सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेत तो महत्वाची भूमिका बजावतो. नव्या संधी शोधणे, उत्पादनाची नवी पध्दती, नवे तंत्रज्ञान, नवे वस्तू यांचा सातत्याने पाठपुरावा करणे. यासाठी उद्योजक नेहमी प्रयत्नशील असतो. संशोधक
वृत्तीच्या जोरावर तो व्यवसाय संस्थेत बदल घडवून अणतो.

आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी उद्योजक सातत्याने प्रयत्न करतो. विकासनक्षील देशातील लोकांनाही उद्‌योजकतेच्या विकास शिवाय देशाचा आर्थिक विकास शक्य नाही याची जाणीव झाली पाहीजे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीत उद्‌योजक बदल घडवून आणतात. अविकसित देशाना कल्पक उद्‌योजकतेची आवश्यकता आहे. असे उद्‌योजक देशाचा चेहरा मोहरा बदलू शकतात. अविकसित देशात उद्‌योजक विकसित अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणणारा महत्वाचा अभिमानी अशी भूमिका पार पडतो. त्यासाठी तो कल्पक असने गरजेचे आहे.तसेच त्याच्याकडे चागंल्या गोष्टींची नक्कल करण्याची क्षमता असावी लागते. या ठिकाणी उद्‌योजकाची भूमिका तीन स्वरूपात अभ्यास करता येईल.

## १) बदल घडवून आणणारा अभिकर्ता
## (Entrepreneur as an agent of change)

आर्थिक क्षेत्रात विविध बदल घडवून आणल्याशिवाय आर्थिक वृध्दी घडविता येत नाही. विकासासाठी विविध क्षेत्रात बदल घडणे आवश्यक असते. आर्थिक क्रियांमध्ये भांडवल, भूमी, कामगार यांचा परस्परांशी असलेल्या संबंधात आणि प्रमाणात बदल घडत असतात असे बदल होणे विकासाच्या दृष्टीने हितकारक असते. उद्योजक असे बदल घडवून आणतो.

**प्रा. पिटर ड्रकर या विचारवंताच्या मते** 'उद्योजक हा बदल घडवून आणण्याच्या संधीचा शोध घेतो. बदलांना समोरे जातो आणि सभोवताली घडणाऱ्या बदलांचा संधी म्हणून उपयोग करतो असे म्हटले आहे.'

उद्योजक आणि बदल परस्परांपासून वेगळे शकत नाहीत असे म्हटले जाते. बदल घडवून आणणारा एक अभिकर्ता या नात्याने उद्योजकास सातत्याने बदलांच्या संधीचा शोध घ्यावा लागतो. **नाविन्याचा आविस्कार करणारे उद्योजक स्वत: नवीन गोष्टी घडवून आणतात.** ते नव्या कल्पना,पध्दती, विविध घटकांचे नविन मिश्रण, नवे उत्पादन, नवे तंत्रज्ञान, नवी बाजारपेठ इत्यादी बाबतीत नाविन्याचा वेध घेत असतात. या माध्यामातून बदल घडवून आणत आर्थिक विकास साध्या करणे हे बदल घडवून आणणाऱ्या उद्योजकांचे ध्येय असते.

अविकसित अर्थव्यवस्थेत आर्थिक घडामोडींच्या अनेक मर्यादा ओलांडून हे उद्योजक विविध संसाधनांचा पुरेपुर वापर करतात आणि राष्ट्राचा आर्थिक विकासात आपला सहभाग देतात. **बदल घडवून आणणारा अभिकर्ता म्हणून पुढील कार्य स्विकारतात .**

१) आर्थिक व सामाजिक वातावरणातील संभाव्य बदलांसंबंधी अनुमान करणे आणि त्याच्याबरोबर स्वत: असे घडवून आणणे.

२) व्यापारी आणि अव्यापारी क्षेत्रात नव्या कार्यांना सुरूवात करणे, नाविन्याचा अविस्कार करणे, वापरात नसलेल्या नव्या संसाधनांचा, पध्दतीचा वापर करण्यात पुढाकार घेणे. अज्ञात असलेल्या क्रिया व प्रक्रिया शोधून त्यांचा व्यापारी उपयोग करणे आणि त्याद्वारे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत चालना देणे.

३) तांत्रिक बदल घडवून आणणे, असे बदल घडवून आणस्यासाठी प्रात्साहन देणे, नवीन संशोधन आणि तांत्रिक शोध यांचा वापर करणे.

४) समाजाच्या प्रवृत्तीत सवयीत बदल घडवून आणणे यासाठी समाजातील चालीरिती, परंपरा, धर्म इत्यादींच्या अभ्यासावरून नवीन विकासाला पूरक आणि साहाय्याभूत ठरणाऱ्या

प्रवृत्तींचा प्रचार व प्रसार करणे. याद्वारा विवेकी, गतीमान व प्रगतीशील समाजव्यवस्था निर्माण करणे.

५) नवीन उपक्रम सुरू करणे. ज्याद्वारे विविध बदल प्रत्यक्षात अंमलात येतील आणि असे बदल समाजात रूजतील.

६) नवीन व्यवस्थापकीय तंत्राचा शोध घेणे आणि तांत्रिक प्रगतीसाठी प्रयत्न करणे.

अविकसित राष्ट्रातील पारंपारीक उद्योजकांचा विचार केलास असे दिसून येते की, हे उद्योजक नवीन काही घडवून आणतील अशी शक्यता नसते म्हणून अविकसित राष्ट्रात नक्कल करणारे व नाविन्याचा शोध घेणारे उद्योजक तयार करणे आवश्यक आहे.

**२) नाविन्याचा आविष्कार आणि अंगिकार करणारा उद्योजक**

**(Innovative Entrepeneur)**

उद्योजक हा मुळात कल्पक आणि नाविन्याचा अविष्कार व अंगीकार करणारा असावा लागतो. तो नाविन्याचा आधारे आपले हित जोपासत असतो. नफ्याचे महत्तमीकरण हे ध्येय समोर ठेवून उद्योजक औद्योगिक क्रिया पार पाडत असतो. **आर्थिक वृध्दी साध्य करतांना नव्या कल्पना आणि बदल यांचा वापर उद्योजकाला करावाच लागतो.**

**श्री. पीटर ड्रकर यांच्या मते** ‘कल्पकता हे उद्योजकाकडे असलेले एक मौल्यवान साधन आहे. या माध्यमातून उद्योजक संपत्ती निर्माण करण्यासाठी नवीन तंत्राचा वापर करून उपलब्ध संसाधनांची कार्यक्षमता वाढवितो. कल्पकतेच्या माध्यामातून नवीन संसाधणे निर्माण होतात. कल्पकता ही आर्थिक आणि सामाजिक संकल्पना आहे. कल्पकता किंवा नावीन्य अंगीकारणे म्हणजे उपभोक्त्यास वस्तूच्या उपभागापासून मिळणाऱ्या लाभात वृध्दि घडवून आणणे होय किंवा संसाधनांच्या उत्पादकतेत बदल घडवून आणणे होय.’

नाविन्याचा आविष्कार म्हणजे जाणिवपूर्वक व संघटीतरीत्या बदलांचा शोध घेणे होय अशा पध्दतशीर शोधांच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक बदल घडून येतात. उद्योजक हा नवीन वस्तू किंवा नवीन वस्तूमिश्र उत्पादन करण्यासाठी पुढाकार घेतो. नाविन्य पुढील पाच प्रकारे आणता येते.

१) पूर्वी अस्तित्वात नसलेली वस्तू उत्पादीत करणे किंवा जुन्या वस्तूची सुधारित प्रत उत्पादीत करणे.

२) नवीन उत्पादन पध्दतीचा अवलंब करणे.

३) नवीन बाजारपेठ शोधणे.

४) नवीन कच्चामाल किंवा कच्चामालाचे नवीन मार्ग हाताळणे.

५) नवीन संघटना अस्तित्वात आणणे.

**आर्थिक विकासात उद्योजकाची नाविन्याचा अंगीकार करण्याची भूमिका अत्यंत मोलाची आहे.** या कृतिमुळेच उद्योजकाचे हे नवनिर्मितीचे कार्य म्हणून ओळखले जाते.

**अविकसीत राष्ट्रात अशा नवनिर्मिती घडविणाऱ्या उद्योजकांची गरज अधिक असते.** यांच्या मुळेच अविकसीत राष्ट्रात आर्थिक घडामोडींचा स्तर उंचावला जातो.

### ३) अनुकरणप्रिय उद्योजक (Imitating Entiepreneur)

सर्वच उद्योजक हे कल्पक आणि नाविन्याचा अंगीकार करणारे असू शकत नाही. काही उद्योजक अनुकरण प्रिय असतात. **राष्ट्राच्या आर्थिक विकासात अनुकरणप्रिय उद्योजकाची भूमिका मालोची मानली जाते.** अविकसीत राष्ट्रात तांत्रिक प्रगती मंदगतीने होत असते. सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण उद्योजकतेच्या विकासास फारसे पोषक नसते. अशा परिस्थितीत अनुकरणशील उद्योजकांची आर्थिक विकासातील भुमिका अधिक महत्वाची असते.

विकासाच्या सुरूवातीच्या काळात विकसित देशांनी अंगीकारलेले तंत्रज्ञान जसेच्या तसे वापरले जाते. या काळात क्रांतीकारी किंवा नाविन्यपुर्ण अशा क्रिया अंगीकारणे शक्य नसल्यामुळे अविकवित राष्ट्रात अनुकरणप्रिय उद्योजकांची संख्या अधिक असते. अनुकरणाला पर्याय नसतो. **आर्थिक विकासाच्या विविध टप्प्यांबरोबरच अनुकरणशिलता कमी होते आणि कल्पकता वाढीस लागते.**

थोडक्यात विकसनशिल राष्ट्रांना बदल घडवून आणणाऱ्या उद्योजकांची गरज असते. या माध्यमातून राष्ट्राचां विकास साधने शक्य होते. **म्हणूनच आर्थिक विकासात उद्योजकांची भूमिका महत्वाची मानली जाते.**

## ३.२.२ आर्थिक विकासात उद्योजकांची भूमिका
## (Role Of Entrepreneur Economic Develoment)

आजच्या उद्योजकाला दररोज नवनवीन समस्यांना तोंड द्यावे लागते. उद्योगातील तीव्र स्पर्धा, बदलती बाजारपेठ, बदलते तंत्रज्ञान, ग्रहकांच्या वाढत्या अपेक्षा, बदलती फॅशन, ग्राहकांचा समाधान, अशा अनेक गोष्टींचा उद्योजकाला विचार करावा लागतो. यासाठी धाडसी लोकच उद्योजक म्हणून पुढे येवू शकतात. अशा **धाडसी उद्योजकांच्या देशात आर्थिक विकासात मालाचा वाटा असतो.** त्यासाठी उद्योजकाला विविध कार्य पार पाडावी लागतात. ती कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

### (१) अर्थचक्र गतिमान करणारा प्रेरक

उद्योजक आपल्या कार्यातून, व्यक्तीमत्वातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात समाजाला बरेच काही देत असतो. त्याचे हे दृश्य आणि ठोस कार्य आर्थिक स्वरूपाचे असते.

तो संपत्ती निर्माण करतो. ती संपत्ती म्हणजे मानवी जीवन समृध्द करणारी आणि उन्नत करणारी प्रत्येक गोष्ट होय. **उद्योजकाचे कार्य अर्थचक्र गतिमान करण्यात मोलाची कामगीरी बजावणारी असते.** अर्थचक्र म्हणजे ते काही एक चाक नव्हेतर असंख्य छोटीमोठी दातेरी चक्रे एकमेकांशी जोडलेली असतात. त्यातल्या एका चक्राने जरी काही हालचाल केली तरी सर्व चक्रांचे हालचाल सुरू होते. असा परिणाम उद्योजकांमुळे अर्थचक्रावर होत असतो.

विकसनशिल देशाच्या संदर्भात अर्थचक्र गतिमान होणे फार आवश्यक आहे. कारण देशाची भौतिक प्रगती त्यावर अवलंबून आहे. आणि देशाचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व ही आर्थिक बळावर अवलंबून असते. हे आर्थिक बळा निर्माण करण्यासाठी लोक सहभाग महत्वाचा असतो.

आर्थिक चक्र गतिमान करण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा अधिकाधिक वापर केला पाहिजे.तो वापर करण्याची बुध्दी आणि कौशल्य दोन्ही उद्योजकाकडे असते.त्यासाठी आवश्यक ती धडाडी आणि जोखीम घेण्याची त्याची तयारी असते. अशी माणसे समाज जीवन विविध प्रकारे समृध्द करतात.

**भारतात जी राज्ये तुलनेने अधिक विकसीत आहे. ती त्या प्रांताच्या लोकातील उद्योजकीय वृत्तीमुळे आणि ते प्रांत अन्य प्रांतापेक्षा पुढे गेले असे लक्षात येईल. साधनसंपत्तीचा महत्तम वापर करण्यासाठी उद्योजकच हवे असतात.**

(२) रोजगार संधीचा निर्माता

**देशाच्या आर्थिक विकासात उद्योजकाची आणखी एक महत्वाची भूमिका म्हणजे तो रोजगारांच्या संधी निर्माण करीत असतो.** रोजगारांच्या संधी निर्माण होणे ही मनुष्यबळ आणि इतर साधनसामग्रीच्या उत्पादन वापरासाठीची मुलभूत बाब आहे भारतासारख्या विकसनशील देशात रोजगार संधी निर्माण होणे फारच गरजेचे आहे. भारतात बेकारीचा प्रश्य फार मोठा आहे. बेकारी दुर करण्यासाठी सरकार नेहमीच प्रयत्न करीत असते. पण ही केवळ सरकारची जबाबदारी आहे असे म्हणता येणार नाही. सरकार आपल्यापरीने त्यासाठी प्रयत्नशील आहे. बेकारी दुर करण्यासाठी सरकारने अनेक योजन राबविल्या आहेत. सुशिक्षित बेकारांमध्ये ग्रामीण भागातील बेकारांचे प्रमाण खुप मोठे आहे. शेती हा खेडयातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. एकूण लोकसंखेचा फार मोठा हिस्सा हा शेती व्यवसायावर अवलंबून आहे.पण अनेक कारणांमुळे शेती व्यवसायाची मोठी दुर्दशा झालेली आहे. त्याचा परिणाम म्हणजे ग्रामीण भागात बेकारी फार मोठ्या प्रमाणावर आढळते. बेकारीची ही समस्या इतर अनेक सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक समस्यांना जन्म देते. या समस्या खालील प्रमाणे सांगता येतील.

### १) स्थलांतर

ग्रामीण भागातून तसेच मागास व अप्रगत भागातु लोक मोठ्या प्रमाणावर शहराकडे धाव घेतात. म्हणजेच स्थलांतराची प्रक्रिया मोठया प्रमाणावर दिसून येते.

### २) शहरावर वाढता ताण

स्थलांतरीत होवून आलेल्या लोकांमुळे शहरातील नागरी सेवा सुविधांवर मोठा ताण पडतो. उदा. पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, शाळा प्रवेश, राहण्याच्या सोयी इत्यादी

### ३) झोपडपट्ट्या आणि गलिच्छ वस्त्या

स्थलांतरीत लोकांना शहरात पुरेशी आणि पक्के घरे उपलब्ध होऊ शकत नाहीत. कारण मुळात घरांची संख्या कमी आणि त्यात स्थलांतरीत लोकांची आर्थिक दुर्बलता असते.त्यामुळे शहरातून झोपडपट्ट्या आणि गलिच्छ वस्त्या वाढतात. याचे चांगले उदाहरण म्हणजे जगातले श्रीमंत लोक ज्या मुंबई शहरात आहेत आणि त्याच शहरात आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी नावाने ओळखली जाते.ती ही याच शहरात आहे. याच झोपडपट्टीतील समस्यांवर आधारित गाजलेला स्लॅमडॉग मिलेनियम या चित्रपटाने ऑस्कर पुरस्कार पटकाविला आहे.

### ४) गुंडगिरी/सामाजिक तणाव

अशा प्रकारातून गुंडगिरी,सामाजिक ताणतणाव वाढतात, जीवन असुक्षित बनते, मानुसकीचा लोप होतो, लोक मानुसकी शुन्य ह्रदयाने वागतात.

### ५) अवैध धंदे

बेकार तरूण अवैध धंदे, गुंन्हेगारीकडे वळतो कारण जगण्यासाठी पैसे मिळविणे आवश्यक आहे. पण ते वैधरितीने मिळण्याची संधी नाही. मग असा वर्ग मोठ्या प्रमाणावर गुंन्हेगारीकडे वळतो. अंमली पदार्थाची ने-आण करणे, स्मॅगलिंग, दारू, जुगार, दादागिरी, अपहरण, भेसळ, नकली वस्तू बनविणे, वेश्यव्यवसाय, खून, दरोडे, चोऱ्या ,खिसे कापणे अशा असंख्य प्रकाराच्या अवैध धंद्याचा सुळसुळाट होतो. हे धंदे करणाऱ्यांच्या टोळ्या तयार होतात. पुढे टोळी युध्दे होतात.

### ६) सांस्कृतिक परिणाम

बेकरीमुळे तरूणांमध्ये नैराश्य येते.तो आत्मविश्वास हरवून बसतो.व्यसनांच्या आहारी जातो. चांगुलपणा, कष्ट, प्रामाणिकपणा, सचोटी यावरचा त्याचा विश्वास नष्ट होतो. ही गोष्ट दिर्घकाळ परिणाम टिकविणारी आहे. त्यामुळे जीवनातल्या चांगल्या मूल्यांची पिछेहाट होते. समाजाची अधोगती होते.

### ७) देशाच्या स्वातंत्र्याला धोका

समाजातील पोखरलेला आत्मविश्वास, हरविलेला आणि मूल्यशून्य तरूणवर्ग ज्या देशात कोट्यावधीच्या संख्येने आहे आणि त्यात आणखी भर पडत आहे. त्या देशाचे भविष्य निश्चितच चिंताजनक असते. इतकेच नव्हे तर त्या देशांचे स्वातंत्र्य, त्याचे सार्वभौमत्व यांनाही मुळापासून धोका असतो.

विविध समस्याबाबत सामाजिक संशोधन संस्था समाजशास्त्रज्ञ, लेखक, अर्थतज्ञ यांनी वेळोवळी अभ्यास केलेला आहे. त्या सर्वानी सुचविलेल्या उपायांमधून एक सर्वमान्य आणि महत्वाचा उपाय म्हणजे उद्योजकास उत्तेजन देणे, तरूणांना स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे होय.

उद्योजक हा स्वत:चे बेरोजगारीचे प्रश्न आपली कल्पकता, धडाडी, सरकारी अर्थसाहाय्य वगैरेतून सोडवितोच पण त्याचबरोबर अनेक बेकार तरूणांच्या रोजगार उपलब्ध करून देतो. बेरोजगारांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करतो. अशा प्रकारे रोजगार संधीचा निर्माता या नात्याने उद्योजक फार मोठे योगदान देत असतो.

### ३) प्रादेशिक विकासाचा साहाय्य

एखाद्या राज्याचा समतोल विकास झालेला आहे. असे क्वचितच आढळते त्याची अनेक कारणे आहेत. ज्या भागात शिक्षणाथच्या सोयी पोहचल्या त्या भागातील लोक लवकरच शिकले. अधिक शिकले त्यातून विकासाची जाण निर्माण झाली. शिक्षणाने अज्ञान दूर केले. महत्वाकांक्षा जागी केली., पुरूषार्थ जागा केला. देशाच्या आणि परदेशातल्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीचा परिचय त्यांना अगोदर झाला. समाजाची स्थितीशीलता, नाकर्तेपणा, अल्पसंतुष्टी यांना शिक्षणामुळे हद्दपार व्हावे लागले. या उलट महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाल्यास मराठवाडा मागासलेला राहील. कारण तिथे शिक्षणाची सुरूवात उशीरा झाली. त्याच बरोबर रेल्वे, रस्ते यासारख्या दळणवळणाच्या सोयी विकसीत नव्हत्या. या कारण बरोबरच मराठवाड्यातील माणसाचाच्यावृत्तीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्याच्यात महत्वाकांक्षीपणा, नेतृत्वगुण, जोखीम घण्याची वृत्ती नाही. तो असंघटीत आणि त्याचबरोबर आळसीही आहे. त्यामुळे एक प्रकाराची स्थितीशीलता आणि अल्पसंतुष्ट वृत्ती त्याच्यात दिसून येते.

अशा अनेक कारणांमुळे प्रादेशिक विकासात असमतोल वाढत गेला आहे . हा असमतोल दुर व्हावा यासाठी सरकारने जिल्हा हा घटक धरून सर्व जिल्ह्यांचे वर्गीकरण अ, ब, क, ड गटात करून त्यानुसार विशेष सोयी सवलती जाहीर केले आहे. मागास जिल्ह्यासाठी अधिक आकर्षक सोयी सवलती जाहीर केल्यामुळे अशा जिल्ह्यातून अनेक उद्योग सुरू.

झाले परंतू बहूतेक उद्योगांचा हेतू हा मागास भागासाठी दिले जाणारे फायदे उकळणे ऐवढाच होता. त्यामुळे हे उद्योग कालांतराने बंद पडले. असे करण्यात प्रगत भागातील उद्योगधंदे, कंपन्या आघाडीवर होत्या. सर्वच कंपन्याचा असा उद्देश नसला तरी अनेक कंपन्याचा उद्देश मागास भागात जायचे, तिथे कारखाने सुरू करायचे, सर्व लाभ पदरात पाडून घ्यायचे, नंतर कारखान बंदे करायचे. असे चित्र सर्रास दिसत होते. याचा परिणाम म्हणजे खऱ्या अर्थाने ना मागास भागाचा विकास झाला आणि ना त्याच्या औद्योगिककरणास वेग आला. मागास भागातील तरूणांचा ही कल स्वत: उद्योगधंदे सुरू करण्याऐवजी दुसऱ्यांनी सुरू केलेल्या उद्योगधंद्यांतून, कारखान्यातून, नोकरी मिळविणे याकडेच होता. त्यामुळे हे तरूण पुन्हा एकदा बेकार झाले आणि त्यांना इतर पर्याय शोधावे लागले. औरंगाबाद आणि परिसराचा अभ्यास केल्यास तिथे असलेल्या कारखान्यापैकी स्थानिक लोकांचे किती कारखाने आहेत. ऐवढे अभ्यासले तरी ही मुद्दा स्पष्ट होतो.

**मागास भागांचा समतोल विकास व्हावा यासाठी स्थानिक होतकरू युवक युवतींनी मोठ्या प्रमाणावर उद्योजक होणे गरजेचे आहे.** त्यांच्या मनात सामाजिक बांधीलकीची भावना निर्माण झाल्यास त्यांना आपआपले उद्योग चालविण्यास व यशस्वी करण्यात आवश्यक ती प्रेरणा व बळ देऊ शकेल. आपल्या उद्योजकतेतून आपण आपल्या भागास विकासाला हातभार लावू शकतो. असा विश्वास निर्माण होईल .

अशा प्रकारे उद्याजक हे प्रादेशिक विकासाबाबत आपला वाटा उचलू शकतात. या संदर्भात स्थानिक नेतृत्व, पुढारी, लोक प्रतिनिधी आणि एकूण समाज जागृत असणे, त्यांनी पाठिंबा देणे हेही हितावह ठरले.

**(४) आयात पर्यायी उत्पादने**

आयात पर्यायी उत्पादनांचा विकास आणि निर्मिती करणे या बाबत उद्योजक मोलाची कामगिरी बजावतात. आपल्या देशाला जवळपास सर्वच क्षेत्रात परदेशात विविध प्रकारची उत्पादने आणि वस्तू आयात कराव्या लागतात. यासाठी मौल्यवान परकीय चलन खर्ची पडते. ते वाचविणे आणि आयात होणाऱ्या उत्पादनांना अधिक चांगला, स्वस्त आणि गुणवत्तापूर्ण पर्याय आपली कल्पकता, संशोधन यातून उभा करणे हे देशाच्या हिताचे असते. उद्योजकांनी  या बाबतीत आपली बुध्दी, कल्पकता, प्रयोगशिलता वापरली पाहीजे. अशा आयात पर्यायी उत्पादनाच्या विकासासाठी उत्तेजन देण्याचे शासनाचेही धोरण आहे. यासाठी आवश्याक ती संशोधन प्रयोगशाळा उभारणे, प्रशिक्षण देणे वगैरे बाबतीतही शासन वित्तसाहाय्य करीत असते. त्याचा डोळस फायदा उद्योजकांनी घेतला पाहीजे. आंतराष्ट्रीय व्यापारी मेळावे, प्रर्दशने, तांत्रिक परिसंवाद, भेट देणे, देशातील आणि परदेशातील संशोधन शाळातून काय

चालू आहे त्याची जागरूकतेने माहिती घेणे, विविध तांत्रिक आणि संशोधनपर नियतकालिके नियमित पाहणे, वाचणे, प्रयोग करीत राहणे या गोष्टी आवश्यक असतात.

आपल्या देशातील पदार्थ विज्ञानाची 'नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी' अहमदाबाद, रसायनशास्त्रची 'नॅशनल केमिकल लॅबोरेटरी' पुणे, 'इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स' बंगळूर, 'इंडियन इस्टिटट्यूट ऑफ टेकनॉलॉजी' (आयआयटी) पवई इत्यादी अग्रगण्य संस्थांतून भरपूर संशोधन चालू असते. त्याचे रूपांतर औद्योगिक उत्पादनात करणे उद्योजकांना शक्य असते. अनेक खाजगी कंपन्यांच्या प्रयोगशाळेतूनही नवनवी उत्पादने, उपलब्ध उत्पदनात सुधारणा वगैरेची कार्ये चालू असतात. **बुध्दीमान, प्रज्ञावान, मनुष्यबळ भारतात आहे. त्यातून आयात पर्यायी उत्पादने उद्योजकांनी तयार केलीत हेही खरे आहे.**

**(५) निर्यातवृध्दी योगदान देणारा**

**उद्योजकाचे निर्यातवृध्दीतील योगदानही महत्वाचे आहे.** एकीकडे आयात पर्यायी उत्पादनांचा विकास जसा उद्योजक करू शकतो, करीत असतो, तसेच दुसरीकडे आपल्या उत्पादनास परदेशी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. **देशाला निर्यातीचे अनेक फायदे मिळत असतात. ते खालील प्रमाणे आहेत.**

१) मालाला/उत्पादनाला/वस्तूला/चांगली किंमत मिळते.

२) बहूमूल्य परकीय चलन मिळते.

३) आत्मविश्वास वाढतो.

४) निर्यात संदर्भातील विविध सरकारी उत्तेजने, फायदे,पुरस्कार मिळविता येतात.

५) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत देशाची पत सुधारते.

६) परदेशी बाजारपेठ ग्राहकांच्या अपेक्षा समजून घेता येतात.

७) नव्या बाजारपेठा, नवी उत्पादने, संशोधन यासाठी दिशा मिळते.

८) उद्योगधंद्याचा विस्तार करता येतो.

९) जगाशी संपर्क वाढतो.

१०) नवे तंत्रज्ञान, नवी यंत्रसामग्री यांची माहिती मिळते.

११) देशांतर्गत प्रतिमा सुधारते, प्रतिष्ठा प्राप्त होते.

१२) उत्पादनाची आणि कंपनीची विश्वासार्हता वाढते.

१३) कर्मचारी, कामगार यांचा आत्मविश्वास आणि संस्थेवरील निष्ठा वाढते.

१४) जगात आपले स्थान कोठे आहोत हे कळते.

१५) जागतिक स्पर्धेत आपले स्थान निर्माण करता येते.

१६) जागतिक स्पर्धेत टिकून राहू शकतो असा आत्मविश्वास निर्माण होतो.

१७) नवीन तंत्रज्ञान आणि नवीन कौशल्य आत्मसात करून त्याचा उपयोग उद्योग वाढीसाठी करून घेण्यासाठी प्रेरणा मिळते.

१८) आपल्या उद्योग समूहात असलेले कामगार, कर्मचारी यांना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यास प्रवृत्त करता येते.

१९) निर्यात वाढीमुळे संस्थेच्या नफ्यात वाढ होते.

२०) संगणकीकरण, स्वयंचलनीकरण याला उत्तेजन मिळते.

प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मिळणाऱ्या वरील विविध फायद्यामुळे उद्योजन निर्यातीसाठी नेहमीच प्रयत्नशीलश असतात. परदेशी बाजारपेठेतील आपला प्रवेश सुलभ व्हावा कंपनीची पत व विश्वासार्हता वाढावी यासाठी त्या कंपनीकडे गुणवत्तेबाबतचे 'आयएसओ' (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅण्यर्डडस्) प्रमाणापत्र असणे खुप उपयोगी ठरते. एखाद्या उद्द्योगाकडे/ कंपनीकडे आयएसओ प्रमाणपत्र असणे म्हणजे त्याची उत्पादन पध्दती आणि उत्पादीन मालाचा दर्जा उच्च प्रतीचा, आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे असे मानले जाते. म्हणून बहूतांशी उद्योजक हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. या प्रमाणपत्राचे दर तीन वर्षानंतर नुतनीकरण करावे लागते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी त्या त्या क्षेत्रासाठी ठरवून दिलेली गुणवत्ता, निर्मितीपध्दती, एकूण कार्यपध्दती अंमलात आणावी लागते. त्याची तपासणी अधिकृत संस्थेकडून केली जाते. त्या आधारे शिफारस केल्या नंतर हे प्रमाणपत्र मिळते. असे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते कंपनीच्या लेटरहेडवर, सर्व पत्रातून, जाहीरातीतून ते चपलेले असते.

निर्यातवृध्दी व्हावी यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन आणि उत्तेजन देण्यासाठी सरकरने स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे. त्याला 'ईसीजीसी' (एक्सपोर्ट प्रमोशन गॅरंटी कौन्सिल) असे म्हणतात. **भारताची निर्यात फारच कमी आहे. ती वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र उद्योजकांची या बाबत धडाडी दाखविणे, आपल्या मालाची गुणवत्ता उंचावणे आणि इतर आवश्याक त्या सुधारणा करणे गरजेचे आहे.**

### (६) स्थानिक गरजांची परिपूर्ती

आज भारतात आयात निर्याती प्रमाणे **स्थानिक गरजांची परिपूर्ती करणे स्थानिक बाजारपेठेत माल पुरवठा करणे हे कार्य ही उद्योजक करीत असतात.** भारताला स्वतंत्र मिळाल. तेव्हा छोट्या छोट्या वस्तू देखील आपल्या देशात तयार होत नव्हत्या आज टाचणीपासून मोठमाठ्या यंत्रसामग्री पर्यन्त आणि रसायनापासून संगनकापर्यन्त असंख्य वस्तू आपल्या देशात तयार होतात. याचे कारण म्हणजे उद्योजकांचे अथक परिश्रम आणि

धडाडी होय. आज आपल्या हाती पडलेली कोणतीही वस्तू तपासून पाहिली तर 'मेड इन इंडिया' ही अक्षरे दिसतात. ही बाब आपला अभिमान वाढवणारी आहे. अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण झालेलो आहोत. दुचाकी वाहणे, मोटरी, टी.व्ही.संच, रसायने, संगणक, कापड,लोखंड,पोलाद,सिमेंट, साखर अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात आपल्या देशाने मोठी झेप घेतली आहे.

भारतीय बाजारपेठेचा मोठा आकार असल्याने स्थानिक गरजा, स्थानिक बाजारपेठेत माल पुरविण्यासाठी उद्योजकांना मोठा वाव आहे. स्थानिक मागणीच्या पूर्ततेतून उद्योजकाला पुढील **फायदे** मिळतात.

१) ग्राहकाच्या अपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे माहिती असतात.त्यामुळे चांगले उत्पादन देता येते.

अ २) अपयशाची आणि उत्पादन नाकारले जाण्याची शक्यता कमी असते.

३) वाहतूक विक्री सदेशवहन इत्यादीसाठीचा खर्च तुलनेने कमी असतो.

४) ग्राहकाची प्रतिक्रया, प्रतिसाद त्वरीत कळतो. त्यामुळे आवश्याक ते बदल सुधारणा तत्परतेने करता येतात.

५) नाशवंत माल स्थानिक उद्योजक अधिक तत्परतेने पुरवू शकतात.

६) स्थानिक राजगार निर्माण होतो.

७) स्थानिक बेकारी दूर होण्यास हातभार लागतो.

**८)स्थानिक अर्थचक्र गतिमान करण्यार हातभार लागतो.**

९) स्थानिक विकासात सहभाग वाढतो.

१०) स्थानिक बाजारपेठेतील विविध ग्राहकांचा अभ्यास करून नवनवीन उत्पादन देता येतात.

११) स्थानिक बाजारपेठेत आपला नावलौकीक निर्माण होऊन प्रतिष्ठा वाढते.

भारतीय बाजारपेठेचा अफाट आकार बहुराष्ट्रीय कंपन्याना आकर्षित करीत आहे. त्याच आपल्या स्थानिक बाजारपेठेची गरज पूर्ण करीत आहे असे चित्र दिसते. दैनदिन गरजा भागविण्यासाठी ज्या वस्तू आवश्यक आहे त्यामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या वरचढ आहे.त्यांची प्रचंड भांडवल शक्ती यामुळे विविध माध्यमाद्वारे आक्रमक जाहिरातीही त्याच अग्रेसर आहेत. स्थानिक बाजारपेठ बहुराष्ट्री कंपन्यांनी कबीज केली आहे ही गोष्ट चिंताजनक आहे. भारतीय उद्योगधंद्यांना मारक आहे असे अनेक विचारवंतांचे म्हणणे आहे. ही वाटचाल अशीच चालू राहीली तर भारत आर्थिक पारतंत्रात नक्कीच जाईल. अशा इशाराही विचारवंतानी आणि अर्थतंत्रज्ञानी दिलेला आहे. तेव्हा स्थानिक बाजारपेठ तरी किमान स्थानिक उद्योजकांसाठी असावी असा उद्योजकांचा सूर आहे. **भारतीय उद्योजकांनी बहुराष्ट्रीय कंपन्याचा बऊन**

**करता आपली गुणवत्ता, कार्यपध्दती, विक्रीतंत्र सुधारूण या आव्हानांचा मुकाबला केला पाहिजे.**

**(७) नव्यापिढीचा पथदर्शक**

**यशस्वी उद्योजक हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे नव्या पिढीचा पथदर्शक म्हणून काम करीत असतो.** स्वातंत्र्यानंतर आर्थिक व औद्योगिकरणावर प्रगती करण्यासाठी नव्या पिढीत उद्योजक मार्गदर्श करीत आहेत.

आदर्श म्हणजे केवळ राजकारण, समाजकारण,क्रिडा किंवा चित्रपट सृष्टितील व्यक्ती नव्हेतर ज्यांनी ज्यांनी आपल्या धडाडीद्वारे परिश्रम आणि कल्पकतेतून मानवी समाजास उपकारक असे कार्य उभे केले ते सर्व व्यक्ती समाजासाठी आदर्श असतात. यात उद्योजकांचाही समावेश आहे. अशांची चरित्रे, त्यांचा संघर्ष, त्यांची वाटचाल हे सगळे नवीन पिढीसमोर समर्थपणे मांडणे आवश्यक आहे. याद्वारे उद्योजक नव्या पिढीसमोर पथउर्शक म्हणून राहू शकतो.

**(८) नाविन्याचा पुरस्कर्ता**

**उद्योजक हा नेहमीच नाविन्याचा पुरस्कर्ता असतो.** मात्र याचा अर्थ असा नाही की जे जुने आहे ते वाईट आहे. पण त्यापेक्षाही अधिक चांगले, सुंदर होऊ शकते असा आशावाद नाविन्याचा पुरस्कर्ता करीत असतो. त्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्याची ही वृत्तीच बदलास, परिवर्तनास कारणीभूत ठरत असते.

बरेच उद्योजक अनुकरण करीत असतात. हे अनुकरण कालासुसंगत, उपयुक्त, हिताचे आहे त्याचे तो अनुकरण करतो. आपण करीत असलेली अयोग्य आहे असे जर कोणी लक्षात आणून दिले तर तो त्यात सुधारणा करतो. तेवढी लवचिकता, तत्परता त्याच्या अंगी असते.

चांगल्या गोष्टीचे अनुकरण करण्याची आणि नाविन्याबाबतची त्याची वृतीच अनेक शोधांना, उपक्रमांना, कार्यांना जन्म देत असते. याप्रक्रियेत अपयशाचे खाचखळगेही असतात. पण तो त्याने ना उमेद होत नाही. दु:खी कष्टी आणि खिन्नही होत नाही.

**(९) परिवर्तनाचा दूत**

उद्योजक हा परिवर्तनाचा दूत म्हणून कार्य करीत असतो. परिवर्तनाची प्रक्रिया नेहमीच संथ असते. ती झपाट्याने किंवा अमूलाग्रपणे होत नाही. कारण ती तशी झाली तर आपण तिला क्रांती म्हणतो. सामाजिक संदर्भात क्रांतीपेक्षा उत्क्रांतीची प्रक्रिया महत्वाची असते. या

उत्क्रांतीचा, **परिवर्तनाचा एक महत्वाचा दूत म्हणजे उद्योतक होय.**तो आपल्या जीवन कार्यातून नवे उदाहरण नवी वाट घालून देतो.

थोडक्यात **उद्योतक म्हणजे केवळ आर्थिक आणि औद्योगिक संदर्भात काम करणारा माणूस नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर संर्दभातही तो मोल ाची कामगिरी बजावित असतो** हे त्याच्या वरील विविध कार्यावरून दिसून येते.

## ३.२.३ विकसीत, अविकसीत आणि विकसनशील देशांच्या अर्थशास्त्रात उद्योजकाची भुमिका (Entrepeurship in Develped-Underbevelopeb &Developing Economies)

कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा आणि उद्योजकतेचा जवळचा संबंध आहे.विकसित राष्ट्रातून नवनिर्मिती करणारा आणि अनुकरणशिल उद्योजकचा वर्ग मोठ्या प्रमाणावर आढळतो. तर अविकसीत व विकसनशील राष्ट्रातून सावध व निष्क्रीय उद्योजकाचे प्रमाण अधिक असल्य ाचे आढळते. याची कारणे त्या त्या देशातील एकूणच परिस्थिती व झालेला विकास यावर अवलंबून असतो. **प्रत्येक देशात विकसीत होणारी उद्योजकता ही त्या देशाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परिणाम असतो.** म्हणून च अमेरिका, जपान या देशात उद्योजक हे नवनिर्मिती करणारे असतात. तर भारतासारख्या विकसनशील देशात उद्योजक हे प्रमुख्यानु अनूकरणशील असतात.या उलट अफ्रिकेसारख्या मागास देशातील उद्दोजक हे निष्क्रीय असतात.

नवनिर्मिती करण्यासाठी मुलभूत विज्ञानाच्या प्रगतीला फार महत्व आहे. त्यातून तंत्र ज्ञान प्रगत होते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंणतवण्याची आवश्यकता असते. विकसीत देशच अशा प्रकारे प्रचंड भांडवल गुंतवणूक करू शकतात.**विकसीत देशात सामाजिक व आर्थिक पर्यावरण कारखानदारीला पोषक असते.**यामुळे प्रगत देशातील उद्योजक नवनिर्मिती करणारे असतात. प्रगत देशात व्यावसायीक व्यवस्थ ापन तंत्र असते. माणसे निवडतांना नाते संबंध न बघता कार्यक्षमता व कौशल्ये पाहिले जाते. सर्वच निर्णय बुध्दिनिष्ठा असतात.

विकसीत देशातील उद्योजक हे नवनिर्मिती करणारे असल्यामुळे त्या देशांचा विकास अधिक वेगाने होतो. उद्योगाच्या विकासाबरोबरच देशाच्या प्रगतीला हातभार लावणारा हा उद्योजक आपली भूमिका सक्रीयपणे पार पाडत असतो. हा उद्योजक कोणतेही आव्हान सहजपणे स्विकारण्यास तत्पर असतो. त्यामुळे देशाच्या विकासात त्याचे योगदान अतिशय महत्वाचे मानले जाते. त्यामुळे विकसीत देशातील उद्योजकाच्या अभ्यासापेक्षा अविकसीत व विकसनशील देशाच्या उद्याजकाच्या अभ्यास करणे अधिक महत्वाचे आहे. हा अभ्यास

करण्याआधी अविकसीत अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. अविकसीत अर्थ व्यवस्थेची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

**अ) आर्थिक वैशिष्टे**

अविकसीत व विकसनशील देशाच्या अर्थ व्यवस्थेची कमी दरडोई उत्पन्न,दरिद्रय , विषमता , भांडवलाची कमतरता, शेतीवर असणारी लोकसंख्या, बेकारी, अर्थ व्यवस्था, लोकसंख्येचे दडपण, आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयींचा अभाव, विज्ञान व तंत्रज्ञान प्रगतीचा अभाव, जूने उत्पादन तंत्र, इत्यादी आर्थिक वैशिष्टे असतात.

**ब) आर्थिकेतर वैशिष्टे**

अविकसीत व विकसनशील देशाच्या अर्थ व्यवस्थेची निरक्षरता, अकायक्षमता, कनिष्ठ उत्पादकता, पारंपारीक विचार प्रणाली, धर्माचा, अंधश्रध्देचा प्रभाव, अधिकारवादी कुटूंबप्रणाली, स्वतंत्र विचार व बुध्दीवादाचा अभाव, जूनी मूल्यरचना, लोकशाहीचा अभाव, राजकीय अस्थिरता इत्यादी आर्थिकतेवर वैशिष्टे सांगता येतील.

वरील वैशिष्टांचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, आर्थिक व सामाजिक पर्यावरणाचा परिणाम म्हणून अविकसीत देशात एकतर उद्योजक उद्योजकतेच्या क्षेत्राकडे तरूणवर्ग आकर्षित होत नाही. आणि जी माणसे उद्योजकतेच्या क्षेत्रात येतात. ती माणसे परिणाम कारक पध्दतीने काम करतांना दिसत नाही. विकसनशील देशात कारखादारीपेक्षा व्यापाराकडे माणसे जास्त आकर्षित होतात, कारण व्यापारात तुलनात्मक धोका कमी असतो. आणि नफा जास्त मिळतो. व्यापाराचे कार्य पारंपारिक पध्दतीने करता येते. कारखानदारीमध्ये येणारे उद्योजक अनूकरणशील असतात. त्यामुळे नवनिर्मिती करतांना स्विकारावा लागणारा धोका स्विकारण्याची गरज भासत नाही.

नवनिर्मिती करण्यासाठी मुलभूत विज्ञानाच्या प्रगतीला फार महत्व आहे. त्यातून तंत्रज्ञान प्रगत होते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल गुतंवण्याची आवश्यकता असते. प्रगत देशच अशा प्रकारे प्रचंड भांडवल गुतंवणूक करू शकतात. प्रगत देशात सामाजिक व आर्थिक पर्यावरण कारखानदारीला पोषक असते. यामुळे प्रगत देशातील उद्योजक नवनिर्मिती करणारे असतात. परंतू अविकसीत देशात व काही प्रमाणात विकसनशील देशात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात फार गुतंवणूक करणे समाजाला परवडत नाही. त्यामुळे त्या देशातील उद्योजकांचा अनुकरणावर जास्त भर असतो. याच कारणामुळे भारतीय उद्योजक जपान, अमेरिका या देशांशी उद्योगांच्या क्षेत्रात सहकाराचे करार करतात व तंत्रज्ञान आयात करतात. विकसीत व अविकसीत देशातील उद्योजकतेच्या या गुणात्मक व संख्यात्मक फरकालाच उद्योजकतेची दरी असे म्हणतात .

अविकसीत देशात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या अभावामुळे, निरक्षरता, धर्म, अंधश्रध्दा, परंपरा यांच्या अभावामुळे शास्त्रीय व्यवस्थापनाचा अभाव असतो. व्यवसायातले निर्णय अशास्त्रीय पध्दतीने घेतले जातात. व्यवसायात माणसे, जात,धर्म, भाषा या निष्कर्षावर निवडली जातात. त्यांना कामे सांगतांना मोघमपणा असतो. या सर्वांचा परिणाम म्हणून एकतर अविकसीत देशात उद्योजकतेचा अभाव असतो आणि उद्योजक हे गुणात्मकदृष्ट्या निकृष्ट प्रतिचे असतात. परंपरोच्या प्रभावामुळे उद्योजकाचे व्यवस्थापन तंत्र कुटूंबप्रधान व अधिकारवादी असते. व्यवस्थापन तंत्राचे व्यावसायिकीकरण झालेले नसते. या उलट प्रगत देशात व्यावसायीक व्यवस्थापन तंत्र असते. माणसे निवडतांना नाते संबंध न बघता कार्यक्षमता व कौशल्ये पाहिले जाते. सर्वच निर्णय बुध्दिनिष्ठ असतात.प्रगत देशातील शास्त्रीय व्यवस्थापन तंत्र व अविकसीत देशातील व्यवस्थापन कौशल्याचा अभाव ही सुध्दा उद्योजकतेतील मोठी दरी असते.अविकसीत, विकसनशील देशात उद्योजकतेतच्या अभावामुळे सरकार स्वत: उद्योजक म्हणून पुढे येतात. आर्थिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करतात.

दुसरा पर्याय म्हणजे परदेशी उद्योजकांना (बहूराष्ट्रीय कंपन्याना) देशात आकर्षित केले. जाते. परंतू **परदेशी उद्योजकांच्या देशातील प्रभावामुळे देशाचे आर्थिक व राजकीय स्वातंत्र धोक्यात येते. असा जागतिक अनुभव आहे.** त्यामुळे परदेशी उद्योतकांनसा अविकसीत व विकसानशील देशात बोलाविणे हा पर्याय योग्य नाही. **म्हणून देशातच उद्योजकतेचा विकास करणे हा पर्याय जास्त योग्य वाटतो.** अविकसीत व विकसीनशील देशात उद्योजकतेच्या विकासाला खालील कारणांमुळे महत्व आहे.

१) बहूतेक अविकसीत व विकसनशील देशात नैसर्गिक साधन–सामग्रीचा विपूल प्रमाणात असते.व प्रत्यक्षात या साधन–सामग्रीचा अपूरा वापर होतो असे दिसते. म्हणून देेशातील नैसर्गिक साधन–सामग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी देशात उद्योजकतेच्या विकासाची गरज आहे.

२) मोठ्या कारखानदारीत व भांडवल प्रधान उद्योग तंत्रनी जास्त रोजगार निर्माण करता येत नाही. त्यामुळे त्या देशात बेकारीचा प्रश्न गंभीर होत असतो. म्हणून देशात रोजगारीची संधी निर्माण करून देण्यासाठी उद्योजकता विकासाची गरज आहे.

३) अविकसीत व विकसनशील देशात विषमतेमुळे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. उद्योजकता विकासामुळे आर्थिक प्रगतीची संधी सर्वांना मिळते. समतेचे उदिष्ट साध्य होते.

४) देशात आर्थिक विषमतेबरोबरच प्रादेशिक असमतोलाचा प्रश्नसुध्दा गंभीर असतो. म्हणून प्रादेशिक असमतोल दुर करण्यासाठी ग्रामीण उद्योगीकरणाला चालना देण्यासाठी उद्योजकतेचा विकास आवश्यक आहे.

५) देशातील उद्योजकतेच्या विकासामुळे आर्थिक वृध्दीचा दर वाढत असतो. देश सर्व बाबतीत स्वावलंबी होतो समाज उपक्रमशील होतो, समाजाचे जीवनमान व राहणीमान वाढते.

या सर्व कारणामुळे देशात उद्योजकतेचा संख्यात्मक व गुणात्मक विकास होतो. उद्योजकतेचा बदल किंवा विकास म्हणजे उद्योजकांची कार्यक्षमता वाढविणे धोका स्विकारणे नवनिर्मिती करणे तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य उद्योजकांमध्ये निर्माण करणे होय म्हणून उद्योजकतेच्या बदलाचा प्रश्न हा मानवी साधनसामग्रीच्या विकासाशी निगडीत आहे म्हणून यासाठी शिक्षण संस्थांची भूमिका महत्वाची ठरते. भारतात उद्योजकतेचा पाया विस्तृत होत आहे.

**लिबेन्स्टेन यांच्यामते** अविकसीत देशात अद्योजकावर फार मोठी जबाबदारी असते. त्याला खालील विविध कार्य पार पाडावे लागतात.

१) नवीन आर्थिक माहितीचा शोध घेणे.

२) मिळालेल्या माहितीचा नवीन बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि अंतीम उत्पादन यांच्या विकास करण्याच्या दृय्टीने अर्थ लावणे.

३) आर्थिक संधी शोधणे.

४) आर्थिक संधीची किंमत ठरविणे.

५) आर्थिक संधीचे मूल्यामापन करणे.

६) उद्योगासाठी आवश्यक असणारी आर्थिक संसाधने प्राप्त करून घेणे.

७) व्यवस्थापनाची जबाबदारी घेणे.

८) उद्यागसंस्थेमध्ये प्रेरणा देणे.

९) कर्मचाऱ्यांच्या गटाचे नेतृत्व करणे.

१०) उद्योगामधील अंतिम जोखीम स्विकारणे.

अविकसीत राष्ट्रातील उद्योजक या कार्यापैकी किती प्रमाणात कार्य करतात हे तेथील परिस्थितीवर अवलंबून असते.

**अविकसीत व अविकसनशील देशाच्या प्रगतीच्यादृष्टीने उद्योजकाने नवनिर्मितीचा व धोक्याचा स्विकार करून उद्योग स्थापन करण्यात पुढाकार घेणे आवश्यक आहे.** त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावून ती बलवान होण्यास मदत होईल. त्यामुळे देशाला पुढील फायदे होतील.

१) उद्योगवाढी बरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

२) देश स्वंयपूर्ण होईल.

३) जीवनावश्यक वस्तूंसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही.
४) बेराजगारीचा प्रश्न सुटेल.
५) नवीन तंत्रज्ञान व संशोधन देशातच उपलब्ध होईल.
६) देशाला सुरक्षितता प्रात्प होईल.
७) मालाची आयात करावी लागणार नाही.
८) निर्यातीसाठी माल उपलब्ध होईल.
९) परकीय चलनाची बचत होईल.
१०) जागतिक बाजारपेठेच्या स्पर्धेत टिकून राहता येईल.

या दृष्टीने अविकसीत व विकसनशील देशात उद्योजकाची भूमिका महत्वाची आहे.

### ३.२.४ उद्योजकतेवर जागतिकीकरण, उदारीकरणआणि खाजगीकरणाचा प्रभाव (Impact of Globalisation, Liberalsation & Privatisation on Entrepreurship)

जागतिकीकरण, उदारीकरण, आणि खाजगीकरण यांचा विचार केला तार उद्योजकांना सर्जनशिल व गतिशील भुमिका पार पाडावी लागते. बदजल्या वातावरणात अनेक आव्हाने पेलत अनेक अडचणी व संकटांना तोंड देत उद्योजक भारताला विकसीत राष्ट्राच्या रांगेत बसवू शकतो. मोठी आव्हाने पेलत भविष्याचा वेध घेणे दुरदृष्टीचा वापर करणे संधी शोधून धाडसाने त्या संधीचा फायदा करून घ्यायचा हे उद्योजकाचे महत्वाचे वैशिष्टे असते. **जागतिकीकरणमुळे आपला देश अर्थव्यवस्थेशी सलग्न झाला आहे.** काही क्षेत्रात उदाहरणार्थ सेवा उद्योगाच्या बाबतीत भारताला अधिक फायदे आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रात भारत अग्रसेर आहे.

**भारतीय उद्योजक स्वकर्तृत्वाने सुपरिचीत आहे.** भारताला उद्योजकांची परंपरा आहे. प्रतिकूल परिस्थितीतसुध्दा या उद्योजकांनी तग धरून देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावला आहे. त्यांच्यातील उद्योजकीय प्रवृत्तीची दखल घेऊन त्याच्या साहाय्याने हे उद्योजक भारताला भविष्यात बलशाली देश म्हणून नावलौकीक मिळवून देतील. याच्या जोडीला भरपूर नैसर्गिक साधन संपत्ती आहेच. या साधनसंपदेचा शोध नेमका उपयोग उद्योजकांनी करून घेतला. तर ती भारताची फार मोठी ताकद किंवा बल स्थान ठरेल. भारतीय उद्योजकांनी आता पर्यंत वापरल्या न गेलेल्या साधनसंपदेचा शोध लावला.त्याच्या फायदा करून घ्यायला. हवा.

सेवा उद्योगात भारतीय उद्योजकांना भरपूर प्रगती करता येण्यासारखी आहे. तंत्रज्ञानासारखे क्षेत्रातील क्रांतीकारक उपयोग करून घेऊन भारताची सामाजिक आणि आर्थिक

परिस्थिती सुधारता येईल. **कृषि क्षेत्रातसुध्दा अशा पध्दतीने उद्योजक महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.** आवश्यक सुधारणा करून जर कृषिक्षेत्रात योगदान अधिक चांगल्या प्रकारे मिळाले तर भारताची मान उंचावेल. एक दबदबा असलेले राष्ट्र अशी भारताची कृषिक्षेत्रात ख्याती मिळू शकेल. **कृषिधिष्ठित उद्योग क्षेत्रात भारतीय उद्योजक फार मोठी क्रांती करू शकेल.**

उद्योजकांमध्ये धाडस, पुढाकार घेण्याची प्रवृत्ती आणि संघटन कौशल्य असते. ते जोखीम पत्कारायला तयार असतात. ते संकटाना न घाबरता आव्हानांना समोरे जातात आणि यशस्वी होतात. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात उद्योजकांना निर्णायक भूमिका बजवावी लागते. त्यांच्या भूमिकेमुळेच व कर्तृत्वामुळेच देशाच्या अर्थव्यवस्थेला वेगळी भूमिका लाभणार आहे. यासाठी उद्योजकांनी नवनिर्मिती करणे अपेक्षित आहे. तसेच गरज भासले तिथे अनुकरणही करावे लागले.

'वैश्विक खेडे' ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. त्या दिशेन विचार करून जागतिक अर्थव्यवस्थेत कोणकोणत्या संधी आहेत याचा शोध घेऊन उद्योजकाचे निर्णय घेणे आवश्यक आहे. स्वॉट विश्लेषण उद्योजकाने केले पाहिजे. (SWOT- Strengths - बलस्थाने, Weaknesses - कमतरता, उणिवा, Opportunities -संधी, Threats - धोके) स्पर्धेच्या युगात प्रवेश केलेला असल्याने उद्योजकाला सतत सुधारणा करण्याच्या दृष्टिने संशोधन व विकास करावा लागेल. कारण जागतिक बाजारपेठेत अनेक जागतिक स्पर्धक असणार आहेत. या स्पर्धेत टिकायचे असेल तर वस्तूच्या किंमती किफायतशीर ठेवाव्या लागतील. त्याचबरोबर संवेष्टन, जाहिरात, विक्रयवृध्दी, विपणन याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. देशांर्तगत उपलब्ध साधनांचा विचार करून अद्वितीय असे कोणते उत्पादन आपण देऊ शकतो याचा विचार उद्योजकाने करावा. सध्या अस्तित्वात असलेल्या बाजारपेठेवर समाधानी न राहता. आणखी मोठ्या व विस्तृत बाजारपेठेचा विचार उद्योजकाला करावा लागेल. उद्योजक म्हणून भूमिका पार पाडत असतांना उद्योजकाला प्रत्येक बाबतीत नाविन्यता अथवा नवनिर्मिती आणण्याच्या विचार करावा लागेल. उद्योजकांनी अधिकाधिक उत्पादन करून विकासाचा दर वाढवाव लागेल. **उदारीकण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात उद्योजकाला आपली भूमिका पार पाडत असतांना सावधगिरीने आणि जबाबदारीने पाऊल उचलणे आवश्यक आहे.**

औद्योगिकरण आणि व्यापार, वाहतूक आणि दळणवळण, माहिती आणि तंत्रज्ञान इत्यादींच्या माध्यामातून जगातील सर्व देश एकमेकांच्या अत्यंत जवळ येत आहेत. जगाचे जागतिक खेड्यात (Global Village) रूपातंर झाले आहे. एखाद्या देशात उत्पादित

होणारी वस्तू वाहतूक साधनांद्वारे दुसऱ्या देशात सहज पाठविता येते उत्पादित वस्तूची माहिती, यांत्रिक व तांत्रिक विकासाची माहिती, शोध आणि संशोधनाची माहिती प्रसार माध्यमाद्वारे एका देशातून दुसऱ्या देशात सहजपणे पाहोचते. प्रत्येक देश जागतिक पातळीवर होणाऱ्या घडामोडींचा आढावा घेऊन आपल्या देशात अपेक्षित बदल घडूवन आणतो. विकासासाठी आपआपसातील मतभेद,वाद-विवाद, विसरून एकमेकांच्या जवळ येतात. विकसनशील देश आपला आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्नकरतात तर विकसित देश आर्थिक वृध्दीदर उंचावण्याचा प्रयत्न करतात.

**भारतीय अर्थव्यवस्था आज जागतिक अर्थव्यवस्थेचा एक भाग बनलेली आहे.** गेल्या अडीच दशकापासून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. १९९१ पासून भारतात आर्थिक सुधारणांचा कायर्क्रम हाती घण्यात आला. जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण (New Economic Policy - NEP) जाहिर करण्यात आले. नवीन आर्थिक धोरणाचे जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण आणि बाजारीकरण असे प्रमुख चार पैलू आहेत. या पैलूंचा उद्योजकतेवर कसा प्रभाव दिसून येतो हे ते बघू या. पण त्याआधी जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण म्हणजे काय हे समजवून घेणे आवश्यक आहे.

### जागतिकीकरण (Globalisation)

भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात जागतिकीकरणाचा अर्थ माहिती आणि तंत्रज्ञानाचे व बहूराष्ट्रीय कंपन्यांचे मुक्त आगमन होय. प्रत्येक आर्थिक, राजकीय, सामाजिक धोरणात जागतिकीकरण करण्यात येत आहे.

### व्याख्या (Meaning)

**१) जागतिक बँकेच्या मते** 'जागतिकीकरण ही जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. यातून श्रम आणि जागतिक बाजारांचे आंतरराष्ट्रीय विभाजन होते. याबरोबर मोठ्या प्रमाणावर उत्पादन, भांडवल आणि तंत्रज्ञान, वस्तू व सेवा आणि श्रमाचा दीर्घकालीन प्रवाह देशाच्या सीमा ओलांडून बाहेर पडतो.'

**२) प्रा.दिपक नय्यर यांच्यामते** 'देशाच्या राजकीय आणि भौगोक सीमा रेषा ओलांडून केले जाणारे आर्थिक व्यवहार म्हणजे जागतिकीकरण होय.' प्रा. दिपक नय्यर यांच्यामते जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक व्यवहारांचे सखोल एकात्मिकीकरण होते, आर्थिक खुलेपणा वाढतो, अर्थव्यवस्थांचे परस्परावलंबन वाढते. जागतिकीकरणात आर्थिक व्यवहारांबरोबर आर्थिक संघटनचेही जागतिकीकरण होते.

जागतिकीकरण ही एकरूपता आणि समरूपता अशी प्रक्रिया आहे की, ज्यात संपूर्ण जग आकूंचित होते. भांडवलशाही आणि समाजवादी अर्थव्यवस्थांचे एकमेकांमध्ये रूपांतरण होते. वस्तू, सेव, भांडवल, तंत्रज्ञान, कामगार, इत्यादी देशाच्या सीमारेषा ओलांडून दुसऱ्या देशात जातात. यावर सरकारचे कोणतेही नियंत्रण नसते.सर्व प्रवाह मुक्त असतात.

**जागतिकीकरणाची वैशिष्ट्ये (Objectives Globalisation)**

१) जागतिकीकरणामुळे आतंरराष्ट्रीय वित्तीय व्यवहारांमध्ये जलद वृध्दी होते.
२) व्यापारात जलद वृध्दी होते. विशेषता बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहारात मोठ्याप्रमाणावर वाढ होते.
३) बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर थेट विदेशी गुंतवणूक करतात.
४) जागतिक बाजाराच्या कक्षा विस्तारतात.
५) वाहतूक आणि दळणवळण साधनांद्वारे यांत्रिक आणि तांत्रिक कल्पनांचा जलद विकास आणि विस्तार होतो.

जागतिकीकरणाची तंत्रज्ञान, माहितीचे प्रसारण, बहुराष्ट्रीय कंपन्या हे अतिशय महत्वाची आणि शक्तीशाली साधने आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उद्योगसंस्थेला देशान्र्तगत बाजार सुरक्षित राहत नाही. सर्वांना जागतिक स्पर्धा करावी लागते. ही स्पर्धा वस्तूंची वस्तूंशी, साधनांची साधनांशी नसून तंत्रज्ञानाची तंत्रज्ञानांशी असते. यात जे तंत्रज्ञान उच्च असते. तेच टिकाव धरते. तंत्रज्ञनाच्या बळावर लहानात लहान देशही मोठ्या देशांशी स्पर्धा करू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे आज भारताने कॉम्प्युटर सॉफ्टवेअरतंत्रज्ञानामध्ये स्वत:ची वेगळी प्रतिमा तयारकेली आहे उत्तुंग भरारी घेतली आहे. आज भारताकडे जलद गतीने विकास पावणारी अर्थव्यवस्था म्हणून पाहीले जाते. आज भारतीय सॉफ्टवेअर अमेरिका, कॅनडा, जपान, जर्मनी, ऑस्ट्रेलिया या सर्व विकसित देशांना मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जात आहेत.

माहिती प्रसारणाची प्रमुख साधने म्हणजे कॉम्प्युटर, इंटरनेट, सॅटेलाईट, लेसर, टेलीफोन, मोबाईल फोन ही सर्व साधने तंत्रज्ञानाच्या शाखेत मोडतात.यात कॉम्प्युटर वर्तमान काळात प्रमुख संचालक आहे. तो ज्ञानाचा प्रसार करतो. माहिती प्रसारणाच्या साधनाद्वारे एका देशातील शोध आणि विकास **(Research & Development)** ताबडतोब दुसऱ्या देशात हस्तांतरीत होतात. नवे उत्पादन, नवे तंत्रज्ञान, नवे यंत्रसामग्री, नवे व्यवस्थापन, नवे विक्रयकला इत्यादी माहितीची ताबडतोब देवाण घेवाण शक्य होते.

**जागतिकीकरणाने भारतात बलाढ्य बहूराष्ट्रीय कंपन्या आणि कमकूवत, आकाराने लहान असलेल्या देशी कंपन्या अशा दोन पक्षांमध्ये असमान स्पर्धा निर्माण**

**झाली.** भारतातील मोठ्या आकारमानाच्या कंपन्याही बहूराष्ट्रीय कंपन्यांच्या मानाने लहानच आहे. त्यामुळे या बहूराष्ट्रीय कंपन्यानी बऱ्याच भारतीय कंपन्यांना गिळंकूत केल्या आहे. काही कंपन्या या स्पर्धेत नामशेष झाल्या. काही कशा तरी तग धरून आहे. भारतातील असामान स्पर्धेची खालील कारणे आहेत.

१) भारतीय उद्योग संस्थांचा आकार आणि उत्पादन बहूराष्ट्रीय कंपन्याच्या मानाने बराच लहान आहे.

२) १९९१ पूर्वी भारतात आयातीवर नियंत्रण असल्याने देशी उद्योगांना संरक्षण होते. त्यामुळे त्यांना विदेशी स्पर्धेची फारशी भिती नव्हती. १९९१ च्या औद्योगिक धोरणात परवाना धोरण शिथिल करण्यात आले त्यातून बहूराष्ट्रीय कंपन्याचा प्रवेश झाल्यने स्पर्धा वाढली. भारतीय कंपन्याचा अशा स्पर्धेचा अनूभव नव्हता.

३) बहूराष्ट्रीय कंपन्याना तुलनेत भारतीय कंपन्याचा भांडवली खर्च जास्त होता. कारण की, इतर देशाच्या तुलनेत भारतातील व्याज दर जास्त होते.

४) बहूराष्ट्रीय कंपन्यांचीश किमान नफा किंवा बराच काळ तोटा सहन करण्याची क्षमता असते. ते सहेतू किंमती कती ठेवतात. भारतीतय कंपन्याना ही गोष्ट शक्य नाही. सुरूवातीला बहूराष्ट्रीय कंपन्यानी भारतीय कंपन्यांबरोबर सहयोग करार केले. भागीदारी केली. पण कालंतराने भारतीय कंपन्या ताब्यात घेतल्या.

५) बहूराष्ट्रीय उद्योग भांडवल प्रधान तंत्रावर उभारलेले असतात. तेथे श्रमिकांची संख्याही कमी असते.

६) भारतीय वस्तूंवर अनेक प्रत्यक्ष अप्रत्यक्षकर आकाराले जातात. हा कराचा दरही जास्त असतो. त्यामुळे वस्तूच्या किंमती वाढतात. या उलट विदेशात आयात होणाऱ्या वस्तूंवर उत्पादन शुल्कासारखे कर आकारलेले नसतात. त्यामुळे वस्तूंच्या किंमती कमी राहतात. त्यामुळे भारतीय वस्तू स्पर्धेत टिकाव धरत नाही. तसेच भारत सरकारने आरक्षित लघू उद्योगक्षेषत्रात बहूराष्ट्रीय कंपन्याना प्रवेश दिला आहे.मात्र आरक्षित उद्योगात भारतीय मोठया कंपन्याना प्रवेश नाही. पण बहूराष्ट्रीय कंपन्याना प्रवेश आहे. या स्पर्धेत लघू उद्योग टिकाव धरणे शक्य नाही.

७) भारत सरकारने विदेशी भांडवल आणि विदेशी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी अनेक सवलती दिल्या त्या सवलती देशी उद्योगांना नाही. उदा. वीज निर्मिती प्रकल्पासाठी वीज खरेदीची हमी बहूराष्ट्रीय कंपन्याना आहे. भारतीय कंपन्याना नाही.विदेशी कंपन्या १००टक्के सहयोग कंपन्या उभारू शकतात. भारतीय कंपन्याना कंपनी ताब्यात घेण्यावर अनेक नियंत्रणे आहेत. ती बहूराष्ट्रीय कंपन्यावर नाही.

वरील विविध कारणांमुळे **भारतीय उद्योजक (भारतीय कंपन्या) जागति कीकरणाच्या स्पर्धेत टिकाव धरून ठेवण्यात असमर्थ ठरत आहेत.** या उलट भारतीय कंपन्या विदेशी कंपन्यांसमोर नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक कंपन्या विदेशी कंपन्यानी गिळंकृत केल्याची उदाहरणे आहेत. सुरूवातीच्या काळात बहूराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय कंपन्यांमध्ये भागीदारी केली आणि नंतर त्याच कंपन्या ताब्यात घेतल्या उदा. कोकाकोलाने पारले कंपनीचे थम्य अप, लिम्का हे ब्रँड ताब्यात घेतले. हिंदुस्तान लिव्हर, या कंपनीने कोठारी फुडस् डालॉप आईस्क्रीम, किसान फूड, मॉर्डर्न फूड, मिल्क फूड, लॅक्मे, पाँडस्, टॉमको, ब्रूकबॉन्ड ऑफ इंडिया, लिप्टन इंडिया इत्यादी कंपन या ताब्यात घेऊन त्याच्या समूहात विलीनीकरण केले. ऑटोमोबाईल उद्योगात डेऊड मोटर्सने डिसीयम या भारतीय कंपनीत भागीदारी केली. होडा कंपनीने श्रीराम कंपनीशी, फोर्ड कंपनीने महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्राशी, जनरल मोटर्सने हिंदुस्तान मोटार्सशी नंतरच्या काळात त्यात बदल झाला. नंतरच्या काळात या सर्व कंपन्या संबंधी त बहूराष्ट्रीय कंपन्याची ताब्यात घेतल्या.

जागतिकीकरणामुळे एक चांगली गोष्ट अशी घडली की, भारतीय उद्योगांवर आलेल्या मरगळचे संकट टळले. बऱ्याच उद्योगांनी स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उद्योगांच्या अंतर्गत व बाह्य रचनेत बदल केले, उत्पादनात नाविन्या आणि विविधकरण केले, ठारविक उत्पादनाकडे विशेष लक्ष केंद्रीत केले. उदा. टाटा उद्योग समूहाने टॉमको हा विभाग विक्री करून लोह पोलाद व वाहन उद्योगावर लक्ष केंद्रीत केले. लार्सन अँड टर्बो या उद्योगाने बिर्ला समूहाला सिमेंट विभाग विकून अभियांत्रिकीवर लक्ष केंद्रीत केल.विशेष म्हणजे या धोरणात हे समूह यशस्वी ठरले. आज भारतात अनेक उदाहरणे अशी आहेत की, ज्यांनी जागतिकीकरणाला अनुसरून यांत्रिक आणि तांत्रिक विकासाची गती वाढवि ली. २००२ ते २००४ या काळात औद्योगिक विकासाचा वेग वाढला याचाच अर्थ असा की, **जागतिकीकरण उद्योजकतेला पोषक ठरले आहे.**

## उदारीकरण (Liberalization)

जागातिल कोणताही देश वस्तू, सेवा, भांडवल आणि मानवी संसाधन या बाबत स्वयंपुर्ण नाही. या सर्वाची देशातल्या देशात देवाण-घेवाण होत असते. परंतू अनेक देशाचे सरकारआपल्या देशातील उद्योगाला व मालाला विदेशी उद्योग व माला पासून संरक्षण देण्याच्या हेतूने आयात शुल्क संख्यात्मक बंधने आणि टॅरिफ कोटा अशी बंधने लावतात. आयात शुल्क लावल्याने आयात होणाऱ्या वस्तूची देशात वस्तू येतांना किंमत वाढते. कारण खरेदी किंमत अधिक आयात कर अशी किंमत ठर ते. कराचा दर जितका जास्त

तितकी किंमत वाढत जाते आणि मग आयात केलेली वस्तू देशांर्तगत मालाशी स्पर्धा करू शकत नाही. संख्यात्मक बंधनच्या बाबतीत एखाद्या वस्तूच्या आयात मात्रेवर लावलेल्या बंधनास कोटा म्हणतात. उदाहारणार्थ किती नग, क्विंटल, टन, लिटर इत्यादी, आयातीस परवाना आवश्यक असणे. आयात करावयाच्या वस्तूंची मुक्त आयात, मर्यादित आयात, प्रतिबंधीत आयात अशी वर्गवारी करणे यामुळेही आयातीवर संख्यात्मक मर्यादा आणल्या जातात. टॅरिफ कोटा यात आयात शुल्क आणि संख्यात्मक निर्बंध यांचे मिश्रअसते.विशिष्ट प्रमाणातील आयातीस विशिष्ट आयात शुल्काचा दर आकारला जातो. आयातीच्या वाढत्या संख्येसाठी आयात शुल्काचा दर वाढता असतो. याचा परिणाम म्हणजे अधिक आयात करणे फायद्याचे ठरत नाही. या बंधनाशिवाय देशांर्तगत साहाय्य आणि निर्यात अनुदा ने अशा दोन सवलतीमुळेसुध्दा आंतराष्ट्रीय व्यापार मुक्त राहत नाही. देशांर्तगत साहाय्य (Domwstic Subsidy) दिलेल्या मालाची किंमत कमी होते व त्या मालाची निर्यात कमी किंमतीला करणे शक्य होते. तसेच निर्यात अनुदानांमुळे निर्यात वाढते व तेथील स्थानिक उद्योगांना स्पर्धेला तोंड द्यावे लागते. याकरिता मुक्त व्यापारचे धोरण स्विकारणे आवश्यक आहे. या **मुक्त व्यापार धोरणालाच 'उदारीकरण' असे म्हणतात.**

**व्याख्या (Meaning)**

'उदारीकण म्हणजे बंदीस्त किंवा नियंत्रित अर्थव्यवस्थेचे मुक्त (Free) आणि खुल्या (Open) अर्थव्यवस्थेत रूपांतरण करणे होय.'

उदारीकरणाचा अर्थ वेगवेगळया पातळयांवर असलेली नियंत्रणे कमी करणे किंवा काढून टाकणे, आर्थिक व्यवहारातील सरकारी हस्तक्षेप कमी करणे, आर्थिक सहाय्यता कमी करणे आणि हळूहळू समाप्त करणे असा घेतला जातो. देशातील साधनसामग्री पर्याप्त वापर होण्यासाठी अर्थव्यवस्था खूली करणे असा संकूचित अर्थ अपेक्षित नाही.

**उदारीकरणाची वैशिष्ट्ये (Objectives of Liberalzation)**

उदारीकरण या संकल्पनेत पुढिल वैशिष्ट्यांचा समावेश केला जातो.

१) औद्योगिक परवाना पध्दती समाप्त करणे.

२) विदेशी चलन विनिमयावरील नियंत्रणे हटवून विनिमय दर मुक्तपणे ठरू देणे.

३) वैयक्तिक आणि कंपन्यांवरील करांचे दर कमी करणे.

४) सार्वजनिक क्षेत्रासाठी राखुन ठेवलेले उद्योग खाजगी क्षेत्रासाठीमोकळे करणे. विशेषत: वाहतूक, दळणवळण, ऊर्जा,बँकींग, व्यापार इत्यादी.

५) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग संस्थांचे अशत: किंवा पूर्णत: खाजगीकरण करणे.

६) आयातींवरील निर्बंध कमी करणे, हटविणे किंवा आयात शुल्कांच्य दरात कपात करणे.
७) वित्तीय प्रणालीत सुधारणा करणे.
८) औद्योगिक आतारपण धोरणात बदल करणे.
९) मक्तेदारी आणि प्रतिबंधनात्मक व्यापार व्यवहार कायदा रद्द करणे किंवा त्यात सुधारणा करणे.
१०) विदेश चलन विनिमय व्यवस्थापन कायदा रद्द करणे किंवा त्यात सुधारणा करणे.

अर्थव्यवस्थेतील ताठरता (Rigidity) किंवा अलवचिकता कमी करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे उदारीकरण होय.

**उदारीकरणाचे फायदे (Advanteges of Liberalization)**

१) आयात निर्यातीवर कोणतेही बंधन नसते तसेच कोणत्याही सवलती नसतात.
२) कोणत्याही देशातील वस्तू व सेवा इतर कोणत्याही देशात मुक्तपणे विकल्या जाऊ शकतात.
३) उदारीकरणामुळे उत्तम दर्जाच्या वस्तू व सेवांचा मुबलक पुरवठा वाजवी दराने जागातील सर्व बाजारपेठात हाऊ शकतो. ऐवढेच नाही तर ज्या देशाच्या बाजारपेठा मुक्त असतील अशा सर्व बाजारपेठा मिळून एकच बाजारपेठ निर्माण होते.
४) सर्व उत्पादक व वितरकांना स्पर्धाशील राहिल्याशिवाय उद्योग व्यापार करताच येत नाही. त्यामुळे उद्योजक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रयत्नशिल असतात.
५) उद्योजकांना नाविन्याचा व सुधारणांचा पाठपुरावा करावा लागतो. तसेच खर्च कमी करून किमान किंमतीला माल बाजारपेठेत माल आणावा लागतो. याचा फायदा ग्राहक उपभोक्ते यांना भरपूर होतो.
६) नवीन तंत्रज्ञान उत्पादन पध्दती उत्पादनाचा दर्जा या सर्व बाबतीत सतत सुधारणा करणे आवश्यक असते. तसे न केल्यास दुसऱ्या स्पर्धक बाजारपेठ काबीज करतो. त्यामुळे उद्योजक जागरूक असतात.

**उदारीकरणाचे तोटे (Disadvanteges of Liberalization)**

१) सर्व देशांना आपल्या बाजारपेठा सर्व वस्तूंसाठी कायमच्या खुल्या करणे व्यवहारिकदृष्ट्या शक्य नसते.
२) प्रगत देश आपल्या आर्थिक ताकतीने व प्रगत तंत्रज्ञानाने उत्तम दर्जाची उत्पादने कमी किंमतीला विकून विकसनशिल व अविकसीत देशांच्या बाजारपेठा काबीज करू शकतात असे झाले तर स्थानिक उद्योग उभे राहू शकत नाही.
३) औद्योगिक विकास व पर्यायाने अर्थ व्यवस्थेचा विकास होऊ शकत नाही. म्हणून अनेक देश आयातीवर निर्बंध लावतात व निर्यातीसाठी प्रोत्साहन देतात.

उदारीकरणाचे काही फायदे आणि काहि तोटे पाहिल्यावर असे लक्षात येते की, उदारीकरण हवे. बाजारपेठा मुक्त हव्यात. पण त्या सर्वच वस्तू व सेवासाठीव मुक्त करता येणे शक्य नाही. प्रत्येक देशाला काही वस्तू व सेवांच्या बाबतीत इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. प्रत्येक देशाला काही वस्तू व सेवांच्या बाबतीत इतर देशांपेक्षा तुलनात्मक लाभ असतो तर काही वस्तू व सेवांची आवश्यकता असते.

**मुक्त व्यापार करार (Free Trade Agreemrnt) साधारण दोन देशात केला जातो. त्याला 'द्विपक्षीय करार' म्हणतात.** काहीवेळा असा करार एक देश दुसऱ्या काही देशांच्या समुहांबरोबर करतो. उदा. युरोपियन युनियन (EU), अग्नेय आशियातील देशांचे मंडळ (ASESN) इत्यादी. तर अनेक देश मिळून एकच करार करतात त्याला बहूपक्षीय करार म्हणतात. उदा. जगातील १५४ राष्ट्रांनी एकत्र येऊन जागतिक व्यापार संघटनेचा (WTO) केलेला करार हा बहुपक्षीय करारआहे.जगात सध्या सुमारे २०० मुक्त व्यापार करार अस्तित्वात आहे. भारताने काही देशांबरोबर मुक्त व्यापार करार केलेले आहेत. या करारांचा फायदा उद्योग व उद्योजकता वाढीसाठी होतो. भारताने श्रीलंका मुक्त व्यापार करार (२८ डिसेंबर १९९८), थायलंड मुक्त व्यापार करार (९ऑक्टोंबर २००३), सिंगापुर सर्वकष आर्थिक सहयोग करार (८एप्रिल २००३), भारत आशिया व्यापार करार (१३ ऑगस्ट २००९) हा करार १ जानेवारी २०१० पासून अंमलात येणार आहे. हे भारताचे मुक्त व्यापार करारातील काही महत्वाचे करार आहेत.

## खाजगीकरण (Privatization)

**खाजगीकरण हा जागतीकीकरण आणि उदारीकरणाचाच एक आविभाज्य भाग आहे.** जागातील भांडवलशाही आणि संमिश्र अर्थव्यवस्थांचा अंगिकार करणाऱ्या बहुतांश देशांनी जलद औद्योगिक विकासासाठी पायाभूत उद्योग आणि सेवाक्षेत्राची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी मुलभूत आणि अवघड उद्योग व वाहतूक आणि दळणवळण, ऊर्जा,बँक व विमा व्यवसाय इत्यादी सेवा सार्वजनिक क्षेत्रात सुरू करण्यात आल्या. या क्षेत्रामध्ये सरकारणे स्वत:चे भांडवल टाकले. काळाच्या ओघात सार्वजनिक क्षेत्राचे अपयश लक्षात घेऊन १९७० व १९८० च्या दशकात जगातील बहुतांश देशांनी सार्वजनिक उद्यागांचे खाजगीकरण करण्यास सुरूवात केली. **भारतात १९९० च्या दशकात खाजगीकरणास सुरूवात झाली.**

**व्याख्या:**

खाजगीकरणाचा मर्यादित अर्थाने विचार केल्यास 'सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये खाजगी मालकी असलेल्या उद्योगांचा सहभाग वाढविणे होय.' तर व्यापक

अर्थाने विचार केल्यास 'सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे नियंत्रण आणि व्यवस्थापन खाजगी क्षेत्रातील उद्योगांकडे हस्तांतरित करणे होय. यातून **सार्वजनिक क्षेत्रातील सरकारची मालकी अंशत: किंवा पूर्णत: कमी केली जाते.'**

भारतीय अर्थव्यस्थेच्या संदर्भात खाजगीकरणाची संकल्पना खालीलप्रमाणे विचारात घेतली जाते.

१) देशातील जे उद्योगक्षेत्र १९९१ पर्यंत सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले होते. ते खाजगी क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीवरील निर्बंध काढूण टाकणे.

२) सार्वजनिक क्षेत्रात असलेल्या सरकारी उद्योगांची मालकी खाजगीक्षेत्राकडे हस्तांतरीत करणे किंवा राष्ट्रीयकरणाचे अराष्ट्रीयकरणात रूपांतर करणे याद्वारे सरकारी उद्योग अंशत: किंवा पूर्णत: खाजगी क्षेत्रांना विकणे होय.

भांडवली अर्थव्यवस्थेत खाजगीक्षेत्र गुंणवत्ता आणि सतर्कतेचे प्रतिक मानले जाते. खाजगीक्षेत्रात अकार्यक्षमता आणि भष्ट्राचार यांना वाव नसतो. साधनसामग्रीची कार्यक्षम वापराची हमी असते. म्हणून सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करण्याचा निर्णय गेल्या पाच दशकांपासून प्रभावी ठरत आहे. **उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे खाजगीकरण होऊन त्याचे पारेषण, निर्मिती, वितरण असे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले**. या कंपन्या खालील नावाने कार्यरत आहे.

१) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड.

२) राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड.

३) राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड.

या तीन कंपन्या आपआपल्या ठरवून दिलेल्या कार्यक्षेत्रात काम करीत आहे.

### ३.२.५ नाविन्याचा शोध घेणाऱ्या उद्योजकांची यशोगाथा (A Success Story of Innovative Entrepreneurs)

भारतात उद्योगांची आणि उद्योजकतेची परंपरा प्राचीन आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्रांती झाली व उद्योगांचा कायापालट झाला. मराठ्यांचा सत्ता काळ संपला आणि इंग्रजी राजवट भारतात प्रस्थापित झाली. १९ व्या शतकाच्या मध्यास भारतात कापड व ताग गिरण्या सुरू झाल्या व आधूनिक उद्योगांचा पाया घातला गेला. १८६० ते १८८० या काळात कोळसा खाण उद्योगाने बरीच प्रगती केली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये उद्योगाची परंपरा ही काही थोड्या पारशी व्यापारी कटूंब, हिंदुमधील काही विशिष्ट जाती, राजस्थान व गुजरातमधील जैन, मारवाडी आणि

तमिलनाडूमधील चेट्टियार यांच्या पुरतीच मर्यादित होती. **स्वातंत्र प्राप्तीनंतर उद्योजकता कोणत्याही एका जातीची, वर्गाची मक्तेदारी राहिली नाही**. ज्या कुटूंबात व्यापार- उद्योगाची परंपरा होती. त्या कुटूंबातील पुढच्या पिढींना त्याचा फायदा मिळाला .ही गोष्ट खरी असली तरी इतर अनेक कुटूंबांमधूनही चांगले कर्तबगार उद्योजकनिर्माण झाले. **अनेक उद्योजकांच्या कतृत्वावर देशाचा आर्थिक आणि औद्योगिक पाया उभा आहे. त्यांच्यामुळे देशाला अभिमानाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मान ताठ ठेवता येते**. देशाची प्रतिष्ठा अशा कर्तृत्वान उद्योजकांच्या कष्टावर, जिद्दीवर उभी आहे.

ब्रिटीश राजवटीत भारतात देशी उद्योगधंद्याच्या वाढीबाबत सरकार उदासीन होते. सार्वभौम सत्तेचा असा विरोध असतांनाही औंध, इचलकरंजी, कोल्हापूर, फलटन, म्हैसूर येथील संस्थानिकांनी आपल्या संस्थानात काखाने काढण्याबाबत उदार धोरण ठेवले आणि तेथे अनुकूल वातावरण कारखानदारी रूजली. कच्चामालाखी उपलब्धता, पक्कामालासाठी बाजारपेठ, वीज, वित्तसंस्था, कुशल कामगार, वाहतूकीची सोय अशा पायाभूत सोयी-सुविधा नसतांनाही तिथे कारखानरी जापासली आणि फुलविली. स्वातंत्रपूर्व काळात देशी कारखानदार स्वदेशीसाठी, स्वराज्यासाठी झटणाऱ्या मंडळीबरोबर होते. आणि ते मोठे देश कार्य करीत होते असे मानले जात होते. **भारतीय उद्योजक जगभर पसरलेले असून ते अनेक वर्षापासून व्यापार-उद्योग करीत आहेत**. विचारांचा पक्केपणा आणि धोका,जोखिम पत्करण्याची तयारी, भारती उद्योजकांच्या रक्तांत भिनली आहे. ब्रिटन, अमेरिका, हॉगकॉग, सिंगापूर, तैवान, केनिया, युगांडा यासारख्या अफ्रिकेतील निरनिराळ्या भागात भारतीय उद्योजक कारखानदारांनी महत्वपूर्ण भूमिका बजावल्या आहेत.

टाटा, बिर्ला, किर्लोस्कर, बजार, मफतलाल, वालचंद, गरवारे ही कुटूंबाची नावे आहेत. पण त्यांची जगाला ओळख आहे ती त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील कर्तृत्वामुळेच आणि त्यांनी निर्माण केलेल्या व्यावसायिक परंपरामुळे ही गोष्ट लक्षातील घेतली पाहिजे. **कोणत्याही उद्योगाची सुरूवात करतांना ती उद्योजकापासून होत असते**. तो स्वत:ची बुध्दी, शक्ती, भांडवल खर्ची घालून अत्यंत काळजीपूर्वक आणि काटकसरीने उद्योग सुरू करतो. त्यासाठी त्याला मोठा त्यागही करावा लागतो. भारतात असे अनेक उद्योग पिढ्यान पिढ्या यशस्वीपणे चालत आहे.

**भारतात समृध्दीच्या मार्गावर नेणाऱ्या अशा कर्तृत्ववान उद्योजक घराण्यात टाटा, बिर्ला,बजाज, किर्लोस्कर, मफतलाल, गरवारे श्रीराम, महेद्रा, अंबानी आदींचा समावेश आहे.**

घटक ४

# उद्योजकता विकास कार्यक्रम
# Enterpreneurship Deveiopment Programme

अनुक्रमणिका

४.० उदिष्टे
४.१ प्रास्तावना
४.२ विषय विवेचन
    ४.२.१ उद्योजकता विकास कार्यक्रम–संकल्पना
    ४.२.२ उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था
    ४.२.३ उद्योजकता विकास कार्यक्रमाचे महत्व
    ४.२.४ उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे
    ४.२.५ भारतातील उद्योजकता विकास
४.३ परिभाषिक शब्द
४.४ स्वयं अध्ययन प्रश्न
४.५ सारंश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उदिष्टे

या घटकाच्या अध्ययनांनतर तुम्हाला...........

- ❖उद्योजकता विकास कार्यक्रम स्पष्ट करता येईल.
- ❖उद्योजकता विकास कार्यक्रमाचे महत्व वर्णन करता येईल.
- ❖उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे नमुद करता येईल.
- ❖उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था विशद करता येईल.
- ❖भारताती उद्योजकता विकास नमुद करता येईल.

### ४.१ प्रस्तावना

देशाच्या आर्थिक विकासाकरिता विभिन्न संसाधनांची उपलब्धता आवश्यक असते, हे खरे आहे. पण संसाधनांची उपलब्धता असली म्हणजे देशाचा आर्थिक विकास घडून येतोच असे नाही. असे असते तर संसाधनांच्या बाबतीत श्रीमंत असलेल्या भारत ह्या खंडाप्राय देशामधील जनता गरीब कां राहिली असती?

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा प्रामुख्याने त्या देशात असलेल्या उद्योतकांच्या संख्येवर, त्यांच्या प्रकारावर,दर्जावर, कार्यप्रवणतेवर आणि उद्याजकांनी केलेल्या प्रयत्नांच्या परिणाम कारकतेवर अवलंबून असतो. आर्थिक विकासाकरिता आवश्यक असलेल्या इतर सर्व गोष्टी विदेशातून आयात करता येतात. उद्योजकीय गुणवत्ता व क्षमतेकरिता मात्र आपल्याला आपल्या समाजावरच अवलंबून राहावे लागते.

'यशस्वी उद्योजक जन्मतात' ह्या कालपरवार्यंत आपल्या मानसिकतेवर अधिराज्य गाजविलेल्या संकल्पनेला चिकटून राहिल्यामुळे, आपल्या समाजाचे अतोनात नुकसान झाले आहे, ह्या विशिष्ट संकल्पनेला मान्यता दिल्यामुळे, आपल्या देशात उद्योजकीय कर्तृत्वाचे स्त्रोत हे समाजातील विशिष्ट जमाती, जाती व कुटूंबांपर्यतच सीमित राहिले. 'यशस्वी उद्योजक जन्मतात' ही संकल्पना अशास्त्रीय तर आहेतच, पण शिवाय ही संकल्पना भांडवलाशाही व्यवस्थेच्या मुळांना बळकटी आणणारी, बूर्झ्वा संकल्पना आहे. ह्या संकल्पनेला मान्यता दिली गेल्यामुळे व ह्या संकल्पनेची यथर्थाता व व्यावहारिकता तपासून पाहण्यात न आल्यामुळे, आपल्या समाजाचे पुढील दोन प्रक्रीयांच्या माध्यामातून फार नुकसान झाले.

(१) वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे दीर्घकाळपर्यंत भारतात उद्योतकीय कर्तृत्वाचे स्त्रोत विशिष्ट जमाती, जाती व कुटूंबांपर्यंतच मर्यादित राहिले. ह्या देशाचा प्रचंड आकार, संसाधनांची उपलब्धता, विकासाची निकड, इ. बाबी लक्षात घेतल्यास उद्योजकांचा पुरवठा निरंतर वाढत जायला हवा होता. पण उद्योजकीय कर्तृत्वाचे स्त्रोत काही विशिष्ट वर्तृळामंध्ये बंदिस्त करण्यात आल्यामुळे, एका बाजूला समाजाच्या दृष्टीने उद्योजकांची मागणी वाढत गेली, पण उद्योजकांचा पुरवठा फार

यशस्वी उद्योजकांची विशिष्ट मानसिकता असते. त्यांच्या व्यक्तिमत्वाची व कार्यपध्दचचीही कांही वेगळी वैशिष्टयें असतात. ही मानसिकता व वैशिष्ट्यें असलेल्या महत्वाकांक्षी व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करून त्यांना व्यवस्थितपणे प्रशिक्षण देण्यात आल्यास, तसेच त्यांना आवश्यक असलेले साहय्य करण्यात आल्यास, नव्याने उद्योजक निर्माण केले जाऊ शकतात. नव्याने उद्योजक निर्माण करण्याच्या प्रक्रियेला उद्योजकता विकास (Entrepreneurial Development) असे म्हणतात. उद्योजकता विकासाचे प्रयत्न सातत्याने व निरंतरपणे करावे लागतात. उद्योजकता विकस ही एक व्यापक स्वरूपाची शैक्षणिक प्रक्रिया (Educational Process) असून देशाचा सर्वांगीण विकास दृष्टीसमोर ठेवून मानवी संसाधानांचा विकास करणे, हे ह्या प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट आहे.

उद्योजकता विकासाची प्रक्रिया प्रभावी ठरण्यासाठी समाजात अनुकूल वातावरण असणे आवश्यक आहे. हे वातावरण असे असावे की ज्यामुळे उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना ज्ञान संपादन करता येईल, विभिन्न कौशल्यें अर्जित करता येतील,आपली कार्ये पार पाडता येजील. नवनवीन आवाहनें स्वीकारता येतील आणि आपला संकल्प सिध्द करता येईल. उद्योजक बनण्याची आकांक्षा व प्रवृत्ती असलेल्या सुयोग्य व्यक्तींचे उद्योजकांमध्ये आणि यशस्वी उद्योजकांमध्ये रूपांतर करण्यासाठी कारणीभूत ठरणारी प्रक्रिया म्हणजेच उद्योजकता विकास होय.

### ४.२ विषय विवेचन -४.२.१. उद्योजकता विकास कार्यक्रम संकल्पना

अभिप्रेरण आणि प्रशिक्षणाच्या माध्यामातून पहिल्या पिढीचे उद्योजक बनविले जाऊ शकतात, हे खरे आहे. पण कोणतीही व्यक्ती उद्योजक बनू शकत नाही हे पण तेवढेच खरे आहे. उद्योजकता विकासाकरिता बुध्दिमत्ता,अभिप्रेरण,ज्ञान व संधी ह्या आवश्यक बाबी आहेत.(१) उच्च शिक्षण नसलेल्या तसेच पुरेसे भांडवल किंवा आर्थिक पाठबळ नसलेल्या व्यक्ती सुध्दा ह्या चार बाबींची अनुकूलता असल्यास, समाजात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू शकतात. उच्च दर्जाची बुध्दिमत्ता असलेल्या व्यक्तींना एरवी फार अवघड असलेल्या गोष्टींचेही नीट आकलन होते, गुंतागुंतीच्या समस्यांची मीमांसा करता येते, विभिन्न पर्याय विकासित करता येतात, संभाव्य बदलांबद्दल अचूकपणे अदांज घेता येतो व प्रत्येक वेळेस योग्य निर्माण घेता. उद्योजकांचे जीवण समस्या, अडचणी,संकटे व तणावांनी व्यापलेले असते. उच्च सिध्द-प्रेरणा असलेल्या अभिप्रेरित व्यक्तीच आपला मार्ग काढू शकतात. शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकांना ज्ञान मिळविता येते. ज्ञान असल्याशिवाय उद्योजकांना त्याच्या प्राथमिक जबाबदाऱ्यासुध्दा पार पाडता येत नाहीत, नवनिर्मितीचे कार्य तर दूर राहिले. समाजात सर्वत्र संधी (Opportunities) उपलब्ध असतात.उद्योजक जेथे काम करतात, तेथेही ह्या ना त्या स्वरूपात संधी उपलब्ध असतात.उद्योजकांचे कार्य संधी शाधणे व ह्या संधीचा चागंल्या रीतीने उपयोग करून घेणे हे असते. कालंतराने उद्योजक संधी निर्माणही करू शकतात.

## ४.२.४ उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे
## (Objectives of Entreprneurial Development *Programmes*)

व्योग्य व्यक्तींना शोधून त्यांचा उद्योजकीय क्षेत्रात प्रवेश व्हावा आणि त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या नीटपणे पार पाडता याव्यात ह्याकरिता त्यानां तयार करणे, हा उद्योजकता विकास कार्यक्रमाचा मूळ हेतू होय.ह्या दृष्टीने उद्योजकता विकास कार्यक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असलेली मानसिकता, योग्यता व गुणवैशिष्टे असलेल्या आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात प्रवेश करण्याची आकांक्षा असलेल्या व्यक्तींचा शोध घेणे.

२.ह्या व्यक्तींना पध्दतशीर प्रशिक्षण देणे.

३. इच्छुक व्यक्तींना उद्योजकांना असलेले ज्ञान मिळविण्यासाठी,कौशल्यें अर्जित करण्यासाठी व योग्यता विकासित करण्यासाठी सर्वतोपरि साहाय्य करणे.

४. उद्योगांचे संचालन व व्यवस्थापन करण्यासाठी उद्योजकांमध्ये आवश्यक योग्यता विकसित करणे.

५. प्रशिक्षण संपल्यानंतर उद्योजकांना विविध प्रकारे साहाय्य करणे.

६. उद्योजकांमध्ये त्यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता निर्माण करणे.

उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या माध्यमातू उद्योजक बनण्याची आकांक्षा व योग्यता

असलेल्या व्यक्तींना प्रशिक्षण दिले जाते हे खरे आहे, पण त्याचबरोर उद्योजकता विकास कार्यक्रम हा निव्वळ प्रशिक्षण कार्यक्रम नाही हे सुध्दा लक्षात ठेवायला हवे. उद्दिष्टें, आशय, क्षेत्र व व्याप्ती–ह्या सर्व दृष्टींनी उद्योजकता विकास कार्यक्रमाचे स्वरूप व्यापक आहे व भिन्न पण आहे. उद्योजकता विकास कार्यक्रम हा संभाव्य उद्योजकांना ज्ञान देऊ व प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी समर्थ करतो, त्यांच्या अभिप्रेरणाची धार वाढवितो, त्यांची वागणूक व व्यवहारांमध्ये सुधारणा घडवून आणतो, स्वतःचा उद्योग स्थापन करण्यासाठी त्यांना सर्वतोपरि साहाय्य करतो आणि त्यांना अडचणी सोडविण्याकरिता तयार करतो.

उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टें अल्पकालीन व दीर्घकालीन अशी दोन्ही प्रकारची असतात.उद्योजकता विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर जी उद्दिष्टें गाठली जावू शकतात अशा उद्दिष्टांना अल्पकालीन उद्दिष्टे म्हणता येईल.उद्योजक होवू इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या अभिप्रेरणाची पातळी वाढविणे, ह्या व्यक्तींच्या वागणुकीमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे, ही उद्योजकता विकास कार्यक्रमांची अल्पकालीन उद्दिष्टें आशा रीतीने संस्कारित झालेल्या उद्योजकांनी स्वतंत्रपणे आपले उद्योग स्थापन करणे व ह्या उद्योगांचे यशस्वीपणे संचालन करणे, ही उद्योजकता विकास कार्यक्रमांची दीर्घकालीन उद्दिष्टे मानावी लागतील.

उद्योजकता विकास कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी एखाद दुसऱ्या व्यक्तीसाठी, व्यक्तींच्या विशिष्ट समुदायासाठी किंवा विशिष्ट वर्गासाठी केली जात नाही.उद्योजकता विकास कार्यक्रमांचा संबंध विशिष्ट व्यक्तींशी नसतो, तर समष्टीशी व संपूर्ण समाजाशी असतो.ह्या दृष्टकोणातून विचार केल्यास उद्योजकता विकास कार्यक्रमांची पुढील उद्दिष्ट नमूद करता येतील.

१. उद्योजकीय कर्तृत्वाचे अपारंपारिक स्त्रोत विकसित करून उद्योजकतेचा सामाजिक आधार विस्तृत करणे.

२. देशाचे जलद गतीने औद्योगीकरण करण्यासाठी व आर्थिक विकासाची गति वाढविण्यासाठी उद्योजकांचा पुरवठा वाढविणे.

३. रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर निर्माण व्हाव्यात व त्याचबरोबर उद्योगांवरील मालकीचे, आर्थिक सत्तेचे आणि संपत्तीचे केंद्रीकरण टाळता यावे,ह्याकरीता देशात लघु उद्योगांची व मध्यम उद्योगांची स्थापना करून औद्योगिक क्षेत्राचा विस्तार घडवूनआणणे.

४. मागास प्रदेशांचा विकास घडवून आणून भौगोलिक विषमता व प्रादेशिक असमतोल कमी करणे.

५. शिकलेल्या, पण नोकरी न मिळाल्यामुळे बेकरी व विवशतेच्या यातना भोगणाऱ्या स्त्री पुरूषांना स्वयंरोजगार मिळवून देणे. स्वयंरोगारामुळे ह्या तरूणांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध होतात, मेंदू व हातांना काम मिळते व शिवाय त्यांचा सन्मान कायम राहतो.

६. लघु उद्योग व मध्यम आकारच्या उद्योगाच्या कारभारात सुधारणा घडवून ह्या उद्योगांची उत्पादकता आणि पर्यायाने नफा मिळविण्याची क्षमता वाढविणे.

## ४.२.२ उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था
## (Phases of Entrepreneurial Development Programme)

उद्योजकता विकास कार्यक्रमांची व्यापक उद्दिष्टें साध्य करून घेण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी स्वीकारलेल्या यंत्रणेला सातत्याने व बरेच प्रयत्न करावे लागतात. उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या ठळक अवस्था व प्रत्येक अवस्थेमध्ये संबंधित यंत्रणेला करावे लागणरे प्रयत्न, ह्याबद्दल पुढे थोडक्यात स्पष्टीकरण केले आहे.

**(१) आंखणीची अवस्था :**

उद्योजकता विकास कार्यक्रम हा एक प्रशिक्षण कार्यक्रम आहे. ह्या कार्यक्रमाची आखणी काळाजीपूर्वक व्हायला हवी. पहिल्या अवस्थेमध्ये उद्योजकता विकास कार्यक्रमाची आखणी करण्याचे कार्य केले जात असल्यामुळे, ह्या अवस्थेला 'आखणीची अवस्था' असे म्हणतात. ह्या अवस्थेमध्ये पुढील कार्ये केली जातात

१. प्रशिक्षणाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्व भौतिक स्वरूपाच्या सोयींची जुळवाजुळव करणे.


२. संभाव्य उद्योजकांचा प्रकार किंवा प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्दिष्ट गट लक्षात घेऊन प्रशिक्षणाचा तपशीलवार अभ्यास कार्यक्रम तयार करणे. दुसऱ्या शब्दात, संभाव्य उद्योजकांना कोणत्या बाबतीत ज्ञान द्यावयाचे, ह्या बाबतीत विस्तृत रूपरेषा तयार करणे.

३. अभ्यासक्रम शिकविण्यासाठी व्याख्याते व प्रशिक्षकांची योजना करणे.

४. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यासाठी साधनें तसेच कार्यपध्दतीबद्दल निर्णय घेणे.

५. प्रशिक्षणार्थ्यांची रीतसर निवड करण्यासाठी निवड समिती तयार करणे.

६. उद्योजकता विकास कार्यक्रमाबद्दलची माहिती उद्दिष्ट गटामधील जास्तीतजास्त सुयोग्य व इच्छूक व्यक्तींपर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने सर्वंकष प्रसिध्दी मोहीम राबविणे.




**आकृती क्रमांक १५.२: उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था**

**(२) प्रशिक्षणाची अवस्थाः**

उद्योजकता विकास कार्यक्रमांची आखणी शास्त्रशुध्द रीतीने होणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच ह्या कार्यक्रमांची अंमलबजाावणी प्रभावी रीतीने करणे, हेही महत्वाचे आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या दुसऱ्या अवस्थेमध्ये हा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला जातो. उद्योजक होण्यासाठी व्यक्तींना अभिप्रेरित करणे, विशिष्ट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी त्यांना आवश्यक ते ज्ञान देणे, ह्या व्यक्तींमध्ये उद्योजकतेकरिता आवश्यक असलेली कौशल्यें व क्षमता निर्माण करणे, इ. व्यापक हेतू दृष्टीसमोर ठेवून पहिल्या पिढीचे उद्योजक निर्माण केले जातात.प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तींच्या मानसिकतेमध्ये,वागणुकीमध्ये व्यवहारांमध्ये अपेक्षित बदल घडून येत आहेत किंवा नाही ह्याबद्दल प्रशिक्षक लक्ष ठेवून असतात. विशिष्ट प्रकल्प राबविण्यासाठी उत्सुक असलेल्या उद्योकांमध्ये, प्रशिक्षण कार्यक्रमचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आवश्यक ती क्षमता निर्माण झाली असेल, तर उद्योजकता विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावी रीतीने करण्यात आली, असे मानले जाईल.

**(३) मूल्यांकनाची अवस्थाः**

उद्योजकता विकास कार्यक्रमांची ही तिसरी व शेवटची अवस्था असते.ह्या विशिष्ट अवस्थेमध्ये उद्योजकता विकास कार्यक्रमांचे मूल्यांकन केले जाते.कार्यक्रमांचे मूल्यांकनकुणी व कसे करावयाचे हा ह्या संदर्भात महत्वाचा प्रश्न आहे.उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करणारी यंत्रणा स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या व तज्ज्ञांच्या साहाय्याने मूल्यमापनाचे कार्य करू शकते किंवा ही जबाबदारी एखाद्या स्वतंत्र यंत्रणेकडे सोपविली जावू शकते.

उद्योजकता विकास कार्यक्रमांचे मूल्योंन करण्याचे कार्य तटस्थपणे व कठोरपणे करण्यात यावे. मूल्यांकनाचे कार्य व्यवस्थितपणे करण्यात, आल्यास उद्योजकता विकास कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणीशी संबंधित अनेक त्रुटी व दोष उघड होतात. पुढे ह्या त्रुटी व दोष दुर करण्यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक ती उपाययोजना करता येते.

### ४.२.३ उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व

**(Importance of Entrepreneurial Development Programmes)**

भारतामधील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व पुढे थोडक्यात स्पष्ट केले आहे.


**(१) अपारंपारिक स्त्रोतांमधून उद्योजकीय प्रतिभेचा अविष्कारः**

डेव्हीड मॅक्लेलँड यांचे उद्योजकतेच्या क्षेत्रामधील मौलिक स्वरूपाचे वैचारिक योगदान आणि काकीनाड प्रयोगाची निष्पत्ती सिध्द झाल्यानंतर योग्य मानसिकता, प्रवृत्ती व योग्यता असलेल्या व्यक्तींना प्रशिक्षण दिल्यास,अशा व्यक्ती उद्योजक बनू शकतात हे स्पष्ट झाले. पूर्वी उद्योजकतेची उत्पत्ती कुटूंबांच्या व्यावसायिक पार्श्वभूमीशी निगडित होती. त्यामुळे उद्योजकतेचे स्त्रोत हे अशी पार्श्वभूमी, आर्थिक सुबत्ता, अनुभव व योग्य संपर्क लाभलेल्या निवडक जाती, जमाती व कुटूंबांपुरते मर्यादित होते. हे स्त्रोत मर्यादित असल्यामुळे, देशात महत्वाकांक्षी उद्योजकांचा

पुरवठा फार सीमित होता. भारतासारख्या देशाचा प्रचंड भौगोलिक आकार,विभिन्न संसाधनांची उपजब्धता, अत्यंत वेगाने वाढणारी लोकसंख्या,देशामधील विस्तृत बाजारपेठा, सर्व प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्याची निकड, इ. कारणांमुळे उद्योजकांची गरज व उद्योजकांची मागणी मोठी होती. त्यामानाने परंपरागत स्त्रोतांमधून घडून येणारा उद्योजकांचा पुरचठा अत्यंत कमी असल्यामुळे, आपल्या देशाचे जलद गतीने औद्योगीकरण घडून आले नाही.

व्यक्तींमध्ये विशिष्ट प्रवृत्ती व योग्यता असल्यास, ह्या व्यक्तींना योग्य प्रशिक्षण देण्यात आल्यास,व त्यांना आवश्यक ती मदत मिळाल्यास, अशा व्यक्ती स्वतंत्रपणे उद्योगांची स्थापना करू शकतात. हे कार्य तसे फार अवघड आहे. पण विभिन्न पातळ्यांवर उद्योजकता विकास कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आल्यास,उद्योजकांचा पुरवठा वाढविता येतो.

अपल्या देशात उद्योजकता विकास कार्यक्रमांमुळे आर्थिक व सामाजिक क्रांतीच्या प्रकियेला मोठी चालना मिळाली आहे.उद्योजकता विकास कार्यक्रमांळेच समाजव्यवस्थेच्या खालच्या पातळ्यांवर असलेल्या मागास जाती व जमातींमधील महत्वाकांक्षी तरूण उद्योजक बनू लागले आहेत. मागास जाती व जमातींमधून पहिल्या पिढीचे उद्योजक निर्माण होण्याची प्रक्रिया आर्थिक दृष्टीने महत्वाची आहेच, पण ह्या प्रक्रियेचे सामाजिक परिमाण हे अतिशय महत्वाचे आहेत. उद्योजकता विकास कार्यक्रमांमुळे भारतात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेग वाढला आहे यात शंका नाही.




**आकृती क्रमांक १५.४:** उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व

**(२) रोजगार निर्मितीः**

बेकारीची समस्या ही देशाला भेडसावणारी गंभीर समस्या आहे. ही बेकारीची समस्या व्यापक व सर्वकष आहे. अशिक्षितांप्रमाणेच उच्चविद्याविभूषित, अप्रशिक्षितांप्रमाणेच वैज्ञानिक व तंत्रज्ञ अशा लक्षावधी व्यक्तींच्या हातांना व मेंदूना काम नाही. देशाचा आर्थिक विकास मंद वेगाने होत असल्यामळे आणि दुसऱ्या बाजूने लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे, बेकारीच्या समस्येसची भीषणता वाढली आहे.

विभिन्न कारणांमुळे संघटित व मोठया उद्योगांच्या क्षेत्रात उत्पन्न होणाऱ्या रोजगारसंधींचे क्षेत्र अतिशय मर्यादित आहे हे उघड आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमुळे समाजातील सर्व स्तरांमधील व्यक्तींना स्वतःच्या मालकीचे उद्योग सुरू करणे शक्य झाले आहे. त्यामुळे उद्योजकतेच्या क्षेत्रामध्ये प्रवेश करणाऱ्या ह्या महत्वाकांक्षी तरूणांना काम तर मिळतेच पण शिवाय ह्या तरूणांनी स्थापन केलेल्या उद्योगांमध्ये अनेक बेकार व्यक्तींना रोजगार प्राप्त होतो. उद्योजकता विकास कार्यक्रम हा राष्ट्रीय अर्थवव्यस्थेमधील अनौपचारिक व असंघटित क्षेत्राला सुदृढ करीत असल्यामुळे, हा कार्यक्रम बेकारीचा प्रश्न कांही प्रमाणात सोडविण्यासाठी निश्चितपणे साहाय्यक ठरेल.(३)

**(३)मागास प्रदेशांमध्ये उपलब्ध असलेल्या संसाधनांचा उपयोग होण्याची शक्यताः**

आपल्या देशातील बहुतेक राज्यांमध्ये व प्रदेशांमध्ये विविध प्रकारच्या नैसर्गिक संसाधनांची विपुलता आहे. आर्थिक नियोजनाचे तंत्र उपयोगात आणून विकास साधण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यालाही आता ५१ वर्षे झालीत, पण बहुतेक राज्यांमधील नैसर्गिक साधनसंपत्तीचा हवा तसा उपयोग घडून न आल्यामुळे, ही राज्ये व प्रदेश अजूनही विकासाच्या मार्गावर रेंगाळत आहेत. बाहेरच्या राज्यांतील उद्योगपतींना मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवणक करून कांही मोठे प्रकल्न स्थापन केले तर 'मॉडेल'म्हणून ते ठीक आहे.स्थानीय उद्योजकांचा मोठया प्रमाणावर सहभाग असल्याशिवाय, मागास भागांमध्ये सुदृढ आधारावर औद्योगीकरण घडून येणे व त्याचा वेग वाढणे संभवत नाही.

उद्योजकता विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी केल्यामुळे, मागास राज्यांमध्ये व मागास प्रदेशांमध्ये नव्याने उद्योजक तयार होतात.ह्या उद्योजकांजवळ मर्यादित वित्तीय संसधने असल्यामुळे, स्वाभाविकपणे ते ज्या उद्योगांमध्ये त्या भागात आढळणारा कच्च माल व सामग्रीचा उपयोग करणे शक्य आहे, अशा लघु उद्योगांची स्थापना करतात. अशा रीतीने उद्योजकता विकास कार्यक्रम हे विभिन्न राज्यांमध्ये व प्रदेशांमध्ये स्थानिक उद्योजकांची पहिली पिढी तयार करतात आणि त्याबरोबरच ह्या भागांमध्ये असलेला कच्चा माल व इतर सामग्रीचा उपयोग घडून येण्यासाठी साहाय्य ठरतात.

**(४) संतुलित प्रादेशिक विकास :**

आपल्या देशात आजवर संघटित क्षेत्रामध्ये स्थापन झालेले मोठे उद्योग हे प्राधान्याने पुढारलेल्या राज्यांमध्ये, तेही कांही ठराविक प्रदेशांमध्ये,स्थापन झाले आहेत. त्यामुळे जो आर्थिक

विकास घडून आला,तो असंतुलित स्वरूपाचा आहे. दिवसेंदिवस प्रादेशिक असमतोल वाढतच आहे.

मोठया उद्योगांची स्थापना करण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करावी लगते. देशामधील निवडक व बडया औद्योगिक घराण्यांमधील उद्योगपतींजवळच असे सामर्थ्य असते. जास्तीतजास्त नफा कमाविण्याचे उद्दिष्ट असल्यामुळे मोठया उद्योगांची स्थापना सर्व दृष्टींनी प्रगत असलेल्या राज्यांमध्ये व प्रदेशांमध्ये केली जाते. अशा उद्योगांच्या स्थापनेमुळे त्या प्रदेशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळत असली तरी प्रादेशिक असमतोल व आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण घडून येते.

लघु उद्योगांची स्थापना करण्यासाठी मर्यादित भांडवल लागते. उद्योजकांना पूर्वीचा अनुभव नसला तरी ते त्यांच्या उद्योगांचे नीट संचालन करू शकतात. मागास प्रदेशांमधील उद्योजक त्यांच्याच प्रदेशांमध्ये लघु उद्योगांची स्थापना करतात. उद्योजकता विकास कार्यक्रम प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आल्यास ग्रामीन औद्योगीकरणाची गती वाढते,संतुलित प्रादेशिक विकास साधता येतो आणि मूठभर व्यक्तींच्या हातात घडून येणारे आर्थिक सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरणही कांही प्रमाणात टाळता येते.

**(५) समाजातील असंतोष व समाजिक तणावांचे निराकरणः**

समाजातील असंतोष व सामाजिक तणावांची कारणे वेगवगळी आहेत.पुढे नमूद केलेल्या कांही कारणांमुळे ही परिस्थिती उद्रेकाच्या स्थितीकडे वेगाने सरकत आहे.

१. सरकरने राबविल्या उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे आपल्या देशात भांडवलशाही अर्थव्यस्थेचा आधार विस्तृत झाला असून,ह्या व्यवस्थेची पाळेमुळें फार खोलवर गेली आहेत.

२. आर्थिक सत्ता व सेपत्तीचे केंद्रीकरण घडूनआले आहे. आर्थिक विषमता वाढली आहे.

३. बेकारीची समस्या अत्यंत उग्र स्वरूपात आहे.

४. प्रादेशिक असमतोल वाढत आहे.

५. प्रचलित शिक्षणव्यवस्थेची निरर्थकता सर्वाच्या प्रत्ययाला आली आहे.

६. समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी राजकीय नेतृत्व अपयशी ठरले आहे.

७. सामाजिक परिवर्तनांची गति फार धीमी आहे.

उद्योजकता विकास कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आल्यास पुढे नमूद केलेले परिणाम संभवतात.

१. अपारंपारिक स्त्रोतांमधून उद्योजकीय प्रतिभेचा अविष्कार घडून येईल.

२. रोजगार मागणाऱ्या व्यक्तींचे *(Job-seekers)* इतरांना रोजगार देवू शकणाऱ्या व्यक्तींमध्ये *(Job -givers)* परिवर्तन घडून येईल.

३. उद्योजकांची पहिली पिढी ही समाजातील दबलेल्या वर्गामधून निर्माण होईल. परिणाममः

अनेक व्यक्तींची क्रयशक्ती वाढेल, त्यांचा जीवनस्तर उंचावेल व सामाजिक परिवर्तनांना वेग येईल.


उद्योजकता विकास कार्यक्रमांची निष्पत्ती आर्थिक व सामाजिक अशी दोन्ही प्रकारची आहे. त्यामुळे उद्योजकता विकास कार्यक्रम सामाजिक तणावांचे निराकरण करण्यात, सामजिक असंतोषाचा निचरा करण्यात आणि क्षमतेवर आधारित समाज निर्माण करण्यामध्ये साहाय्यक ठरतील.

**(६) लघु-उद्योग क्षेत्रामध्ये नवनिर्मितीला चालनाः**

सध्या बाजारपेठेत गळेकापू स्पर्धा अस्तित्वात आली आहे.ह्या स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता आणि त्याचबरोबर प्रतिस्पर्ध्यावर मात कण्याकरिता उद्योजकांनी विविध मार्गांनी नवनिर्मीती घडवून आणणे आवश्यक आहे. नवनिर्मितीचे वेगवेगळे मार्ग आहेत. लघु उद्योजक ह्या मार्गाचा अवलंब करून नवनिर्मिचे कार्य सहजपणे घडवून आणू शकतात.

भारतात राबविण्यात येणाऱ्या उद्योजकता विकास कार्यक्रमांचा लघु उद्योगांशी थेट संबध आहे. उद्योजकता विकास कार्यक्रमांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्यात आल्यास देशात लघु उद्योगांचा झपाटयाने विकास घडून येईल व त्यामुळेदेशात विविध मार्गानी तसेच मोठया प्रमाणावर नवनिर्मितीचे कार्य घडून येईल.नवनिर्मितीच्या निष्पत्तीमुळे लघु उद्योगांची स्पर्धा करण्याची क्षमता निश्चितपणे वाढेल.

वर व्यक्त केलेले विचार पुढे एका आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट केला आहे




आकृती क्र. १५.५ःउद्योजकता विकास कार्यक्रम, नवनिर्मिती व लघु उद्योगांचे यश

## ४.२.५ भारतातील उद्योजकता विकास

**(Entrepreneurial Development in India)**

कोणतीही व्यक्ती यशस्वी उद्योजक बनू शकत नाही. यशस्वी उद्योजक बनण्याकरीता संबंधित व्यक्तीमध्ये उद्योजकतेची मानसिकता व विशिष्ट बैध्दिक क्षमता असणे आवश्यक आहे. उद्योजकतेची मानसिकता व बौध्दिक क्षमता लाभलेल्या महत्वाकांक्षी युवकांना शोधून, उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना पध्दतशीरपणे प्रशिक्षण देऊन, नंतर संकल्पित उद्योगांच्या

उभारणीसाठी त्यांना आवश्यक ते साहय्य केले जाते. उद्योजकतेच्या विकासाची ही प्रक्रिया आपल्या देशात सुरू झाली आहे. हे प्रयत्न सर्व राज्यांमध्ये, वेगवेगळ्या पातळ्यांवर व संघटितपणे केले जात आहेत. एका दृष्टीकोणातून विचार केल्यास, देशाचा जलद औद्योगिक विकास साधण्यासाठी व समाजातील दुर्लक्षित तसेच दुर्बल वर्गांमधून पहिल्या पिढीचे उद्योजक निर्माण करण्यासाठी सुरू झालेली ही एक राष्ट्राच्या पुर्नरचनेची महत्वाकांक्षी चळवळ आहे. उद्योजकता विकास कार्यक्रम हे ह्या चळवळीचे माध्यम आहे.भारतामधील उद्योजकता चळचळीचे कांही ठळक टप्पे पुढे नमूद केले आहेत.(4)

**(१) १९६०-१९६६**ःसप्रसिध्द मानसस्त्रज्ञ व उद्योजकता विशेषज्ञ डॉ.डेव्हीड मॅक्लेलँड यांनी डॉ. मनोहर नाडकर्णी यांच्या सहकार्याने आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे प्रयोग केले.ह्या प्रयोगाची निष्पत्ती अनूकूल होती. ही निष्पत्ती प्रत्यक्ष व्यवहारात कर्यान्वित करता यावी ह्याकरिता हेद्राबाद येथे राष्ट्रीय लघु उद्योग विस्तार प्रशिक्षणसंस्थेची(*National Institute of Small Industry Extention Training*) स्थापना करण्यात आली.

**(२) १९६६-६८**ःडॉ. मनोहर नाडकर्णी यांच्या राष्ट्रीय अभिप्रेरण व संस्थात्मक विकास संस्थेची *(National Institute for Motivation and Institutional Development)* स्थापना करण्यात आली. अभिप्रेरणाच्या क्षेत्रात संशोधन व विकासाचा हेतू समोर ठेऊन देशात स्थापन करण्यात आलेले ही पहिली व्यावसायिक संस्था होय.

**(३) १९६८-७२**ः डॉ. मॅक्लेलँड व डॉ.नाडकर्णी यांनी केलेल्या संशोधन व विकास कार्याच्या आधारावर राष्ट्रीय अभिप्रेरण व संस्थात्मक विकास संस्था *(NIMID)* व महाराष्ट्र लघु विकास महामंडळाने महाराष्ट्रात उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करण्यास सुरूवात केली.

**(४) १९७२-७८**ः गुजराथ राज्यामध्ये उद्योजकतेच्या विकासाला साहाय्य कारण्यासाठी डॉ.व्ही.जी.पटेल यांच्या नेतृत्वाखाली उद्योजकता विकास केंद्र *(Centre for Entreoreneurship Development)* ह्या स्वतंत्र संस्थेची स्थापना करण्यात आली.गुजरात औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ व इतर कांही संघटनांनी उद्योतकता विकास केंद्राच्या माध्येमातून उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करण्यात सुरूवात केली.

**(५) १९७२-८९**ः इच्छुक उद्योजकांना विभिन्न बाबतीत तांत्रिक सल्ला व साहाय्याची गरज तीव्रतेने जाणवत होती. केंद्रीय वित्तीय संस्था,राज्य महामंडळें व बँकांच्या संयुक्त विद्यमाने, अठरा राज्यांमध्ये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार संघटनांची स्थापना करण्यात आली.ह्या तांत्रिक सल्लागार संघटनांच्या माध्यमातून उद्योजकता विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली.

**(६) व त्यानंतर** ः नवीन औद्योगिक धोरणाचा एक भाग म्हणून १९७६ साली राज्यांमध्ये, जिल्ह औद्योगिक केंद्रांची *(District Industries Centres)* स्थापना करण्यातआली. ह्या औद्योगिक केंद्रांनी उद्योजकता प्रशिक्षण व माहिती कार्यक्रमांचे आयोजन करण्यास प्रारंभ केला.इच्छुक उद्योजकांना देणे व त्यांनी निवडलेल्या प्रकल्पांशी संबंधित माहिती त्यांना

पुरविणे,असा ह्या कार्यक्रमांच्या आयोजनामागे दुहेरी हेतू होता. हे कार्यक्रम एक आठवडा मुदतीचे असत. सुशिक्षित बेकार व ग्रामीण परिसरातील तरूणांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला.

(७) १९८१: मध्यवर्ती सरकारने नवी दिल्ली येथे उद्योजकता आणि व्यवसाय विकास राष्ट्रीय संस्थेची (NIESBUD) स्थापना केली.


(८) १९८२: स्टेट बँकेने उद्योजकता विकास कार्यक्रमांचे आयोजन करण्यास प्रारंभ केला. ह्या कार्यक्रमांचा अवधी एक महिन्याचा होता.

(९) १९८३: प्रशिक्षणाची कार्यक्षमता हा उद्योजकता विकास कार्यक्रमांची परिणामकारकता निश्चित करणारा एक महत्वाचा घटक होय.ह्या दृष्टीने उद्योजकता विकास कार्यक्रमांमध्ये संभाव्य उद्योजकांना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांना (Trainers) व्यवस्थित प्रशिक्षण देणे आवश्यक होते. ही विशिष्ट गरज भागविण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील भारतीय आद्योगिक विकास बँक (IDBI), भारतीय आद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ (ICICI) व भारतीय वित्तीय महामंळ (IFC) ह्या वित्तीय संस्था आणि स्टेट बँक ऑफ इंडियाने भारतीय उद्योजकता विकास संस्थेची (Entrepreneurship Development Institute of India) स्थापना केली.

(१०) १९८५:मध्येवर्ती सरकाच्या विज्ञान व तंत्रविद्या विभागाने राष्ट्रीय विज्ञान व तंत्रविद्या उद्योजकता विकास (National Science and Technology Entrepreneurship Development Board) ह्या संस्थेची स्थापना केली.

(११) १९८७ व नंतरः गुजराथ राज्यातील उद्योजकता विकास कार्यक्रमांना यश मिळाले, हे लक्षत आल्यानंतर देशातील इतर सर्व राज्य सरकरांनी आपल्या राज्यांमध्ये उद्योजकता विकास केंद्राची (Centre for Entrepreneurship Development) स्थापना केली.

उद्योजकतेचा विकास करण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न हे विभिन्न संस्थांच्या माध्यमातून किंवा संस्थाच्या पातळीवरून करायाचे असतात. ह्या दृष्टीकोणातून मध्येवर्ती सरकार, राज्य सरकारें तसेच विशष वित्तीय संस्था व स्टेट बँकेने पुढाकार घेऊन, वर स्पष्ट




आकृती क्र. १५.६: उद्योजकतेची संस्थात्मक चौकट आणि उद्योजकतेची चळवळ

केल्याप्रमाणे, आपल्या देशात एक संस्थात्मक चौकट उभी केली. उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या विविध पैलूंना बळकटी आणण्याचे प्रयत्न पुढे ह्या संस्थांच्या माध्यमातून करण्यात आले. त्यामुळे उद्योजकतेच्या चळवळीला आवश्यक असलेली जागरूकता समाजात उत्पन्न झाली,उद्योजकता विकास कार्यक्रमांच्या विभिन्न पैलूंना शक्ती मिळाली, उद्योजकता विकास चळावळीला नेतृत्व मिळाले आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांची परिणामकारकता वाढली.

## उद्योजकता चळवळीमध्ये भाग घेणाऱ्या संस्था

एका अंदाजानुसार आपल्या देशात ६८६ संघटना उद्योजकता विकासाच्या क्षेत्रात कार्य करीत आहेत.स्थूलमानाने ह्या संस्थाचे वर्गीकरणे पुढीलप्रमाणे करता येईल–

**(अ) राष्ट्रीय स्तरावल संघटनाः**

१.भारतीय उद्योजकता विकास संस्था (EDII) अहमदाबाद.
(प्रशिक्षकांना प्रशिक्षण देणे)
२. राष्ट्रीय उद्योजकता व लघु व्यवसाय विकास संस्था (NIESBUD),नवी दिल्ली.
(प्रशिक्षकांना प्रशिक्षण देणे)
३. स्टेट बँक ऑफ इंडिया
४.खादी आणि ग्रामोद्योग आयोग.
५. व्यवस्थापन विकास संस्था.
६. तांत्रिक शिक्षक प्रशिक्षण संस्था.

**(ब) राज्य पातळीवरील संघटनाः**

१. सर्व जिल्ह्यांतील जिल्हा उद्योग केंद्र.
२. लघु उद्योग सेवा संस्था.
३. तांत्रिक सल्ला संघटना.
४. उद्योजकता विकास केंद्रें
५. राज्य वित्तीय महामंडळे.
६. औद्योगिक विकास महामंळे.

**(क) अशासकीय किंवा ऐच्छिक संघटनाः**

१. राष्ट्रीय स्तरावरील अभिप्रेरण व संस्थात्मक विकास संस्था,मुबई (‘निमिड’)
२. अखिल भारतीय महिला उद्योजकांची परिषद.
(Indian Council of Women Entrepreneurs)
३.उद्योजकता व करियर विकासाचे आंतरराष्ट्रीय केंद्र.
४. तरूण उद्योजकांची राष्ट्रीय स्तरावरील संघटना.
(Natioanl Alliance of Young Entrepreneurs)
५. कर्नाटक राज्यातील स्त्री उद्योजकांची संघटना.

६. ग्रामीण उद्योजकता विकास केंद्र (रांची)

७. महाष्ट्रातील स्त्री उद्योगपती व उद्योजकांची संघटना.

८. युवक कल्याण भारतीय संस्था.

९. राष्ट्रीय उद्योजक केमिकल पार्क *(NECP)*,मुंबई.

**(ड) शैक्षणिक संस्थाः**

देशामध्ये सध्या अनेक नांमाकित शैक्षणिक संस्था विभिन्न स्तरांवर उद्योजकता विकास कार्यक्रमाचे आयोजन करीत आहेत. हे कार्यक्रम अल्पमुदतीचे असतात. तज्ज्ञ मनुष्यबळ असलेल्या शैक्षणिक संस्था सरकर, सरकरी संघटना किंवा वित्तीय संस्थांनी पुरविलेल्या आर्थिक बळाच्या साहाय्याने, विशिष्ट उद्दिष्ट गट दृष्टीसमोर ठेऊन, उद्योजकता विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करतात. असे केल्यामुळे सैध्दांतिक ज्ञान, नैपुण्य चतुरस्त्र विद्वत्ता, व्यावहारिक अनुभव व संशोधनवृत्ति असलेल्या विद्वांनाच्या ज्ञानाचा व सेवेचा पुरता उपयोग करून घेता येतो, आर्थिक संसाधनांची कमतरता जाणवत नाही,कार्यक्रमांच्या आखणीत लवचिकता राहते आणि प्रशिक्षणाचा कालावधी संपल्यानंतरही प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांशी निकटचा संपर्क ठेऊन त्यांच्या अडचणींची सोडवणूक करता येते.

## ४.३ परिभाषिक शब्द

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्न

प्रश्न १: उद्योजकता विकास कार्यक्रमाची संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा?

------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

प्रश्न २: उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे स्पष्ट करा?

------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

प्रश्न ३: उद्योजकता विकास कार्यक्रमांचे महत्व विशद करा?

------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

प्रश्न ४: उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था थोडक्यात स्पष्ट करा?

------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------
------------------------------------------

## ४.५ सारंश

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १ः उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या अवस्था स्पष्ट करा?

प्रश्न २ः उद्योजकता विकास कार्यक्रम म्हणजे काय? त्याचे महत्व विशद करा?

प्रश्न ३ः उद्योजकता विकास कार्यक्रमाची आवश्यकता स्पष्ट करा?

प्रश्न ४ः भारतातील उद्योजकता विकासाच्या पायऱ्या वर्णन करा?

प्रश्न ५ः उद्योजकता विकास कार्यक्रमांची उद्दिष्टे सविस्तर वर्णन करा?

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. येवले, अरूण; सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरिंवद (२०१०) उद्योतकता विकास, जळगांवः प्रशांत पब्लिकेशन.

२. कडवेकर, व्ही.;रावळ, सी.एन.आणि कोठावदे,आर.(२००५) व्यवसायिक उद्योजकता, पुणेः डायमंड बुक डेपो

३. कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर. (२००६) व्यवसायिक उद्योजकता-२, पुणेः डायमंड बुक डेपो

४. देशमुख, प्रभाकर (२००२) उद्योजकता विकास, नागपुरः पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स

5. Knan, M.A, (1992) Entrepreneurial Development in lndia, New Delhi: Kanishka Publishing House

6. Khanka, S.S.(2001) Entrepreneurship Development, New Delhi: S.Chand & Co.

7. Desai, Vasant (2001) Dynamics of Entrepreneur Development and Management, New Delhi: Himalaya Publishing House

8. Gupta, C.B.(1999) Entrepreneurship and Small Busiess Managment, New Delhi: S.Chand & Co.

# घटक ५
# उद्योजकता विकासावर परिणाम करणारे घटक
# Factors Affecting Entrepreneurship Development

अनुक्रमणिका

५.० उदिष्टे
५.१ प्रास्तावना
५.२ विषय विवेचन
    ५.२.१ उद्योजकता विकासात परिणामकारक घटक
    ५.२.२ अंर्तगत घटक
    ५.२.३ बहीर्गत घटक
५.३ परिभाषिक शब्द
५.४ स्वयं अध्ययन प्रश्न
५.५ सारंश
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ५.० उदिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला...........

- ❖उद्योजकता विकासात परिणामकारक घटक वर्णन करता येईल.
- ❖उद्योजकता विकासात परिणाम करणारे अंतर्गत घटक नमुद करता येईल.
- ❖उद्योजकता विकासात परिणाम करणारे बहीर्गत घटक नमुद करता येईल.


## ५.१ प्रस्तावना (Introduction)

उद्योजकता विकास ही एक संघटनात्मक व पध्दतशीर विकासाची प्रक्रिया आहे. वाढत्या औद्योगिकीकरणासाठी उद्योजकता विकास एक महत्वाचे साधन आहे. उद्योजकता विकासाचा महत्वाचा उद्देश हा उद्योजकीय गुण असणाऱ्या व्यत्तींना उद्योगाच्या कार्याकडे आर्कषित करणे हा असतो. उद्यो जकता विकास ही कोणत्याही देशाच्या विकासाची गुरू किल्ली आहे. आपल्या देशात उद्योजकता विकास मोठ्या प्रमाणावर झाल्यावर आपण जगापुढे एक शक्तीशाली म्हणून उभे राहू शकतो. उद्योजकता विकासासाठी देशात व्यासायिक पर्यावरण असणे गरजेचे असते. जागतिक विकासात विकसनशील आणि अविकसित अशा सर्व देशांमध्ये उद्योजकता विकासाला मोठ्या प्रमाणावर महत्व असते.

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ उद्योजकता विकासात परिणामकारण घटक (Factor influences on Entrepreneurship Development) :

उद्योजकता विकासाठी पोषक वातावरण निर्माण होणे आवश्यक असते. उद्योजकता विकास अनेक घटकांचा समावेश असतो. हे घटक व्यक्तींशी निगडीत असतात देशातील राजकीय, सामाजिक, आणि आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतात उद्योजक हा योग्य प्रशिक्षण विकास कार्यक्रमाद्वारे तयार होऊ शकतात. हे संशोधनावरून सिध्द झालेले आहे. उद्योजकता विकासात अंतर्गत आणि बहिर्गत घटक परिणाम करीत असतात. त्यांचे वर्णन पुढील आकृती क्र.५.१ च्या साहीय्याने स्पष्ट करता येईल.




**आकृती क्र. ६.१ उद्योजकता विकास परिणातकारक घटक**

### ४.२.२ अंतर्गत घटक (Internal Factor) :

उद्योजकास आवश्यक असणारे गुण, कौशल्य, ज्ञान, शिक्षण, कौटंबिक पार्श्वभूमि, वातावरण, संस्कृती, वय, संशोधकता, दृष्टीकोन, प्रशिक्षण या सारख्या महत्वपूर्ण घटकांचा समावेश अंतर्गत घटकात होतो. हे सर्व घटक व्यक्तींशी निगडीत असल्याने अंतर्गत घटकांना व्यक्तीगत घटक असे म्हणतात. उद्योजकतेच्या वाढीसा ठी या घटकांचे अगोदर अस्तित्व असणे आवश्यक असते. उद्योजकाची वाढ किंवा विकास किती प्रमाणात होऊ याचा अंदाज व्यक्तीगत घटकांच्या साहीय्याने घेणे शक्य होते. प्रत्येक उद्योजकाच्या अंगी काही व्यक्तीगत गुण वैशिष्टे असतात. हे गुण व कौशल्य व्यक्तीच्या अंगी असतील तर उद्योजकतेची

वाढ होण्याची शक्यता जास्त असते. त्याच प्रमाणे देशातील हवामान, पुर्वइतिहास, संस्कृती, धार्मिक रूढी व परंपरा यांचा वैयक्तीक गुण विशेषांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.

उद्योजकतेत वाढ नेमकी कशामुळे होते. हे स्पष्ट करणे कठीण आहे. परंतु मॅकलेलँड आणि त्यांच्या सहकारी यांनी अनेक देशाच्या अभ्यास पाहणी वरु न उद्योजकतेच्या विकासाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. विकसीत आणि अविकसीत देशांमध्ये वैयक्तीक किंवा अंतर्गत घटकांमुळे उद्योजकतेच्या विकासाला गती येत असल्याने त्यांना दिसून आले होते. अंतर्गत घटकात समाविष्ट असणाऱ्या विविध घटकांचे वर्णन पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. अभिप्रेरण (Motivation) :** विशिष्ट प्रेरणेनुसार वर्तन घडून येणे या क्रियेला अभिप्रेरण असे म्हणतात. बहूतेकवेळा आपल्या वर्तनास कारणीभूत असलेली विशिष्ट प्रेरणा व्यक्तीला स्पष्ट झालेली नसते. परंतू उद्योजक हे बदल घडवून आणण्याचे काम करीत असल्याचे त्यांच्या अभिप्रेरक प्रक्रियेचा अभ्यास भारतासारख्या विकसनशील देशात महतवाचा ठरतो. म्हणूनच अभिप्रेरण संशोधनास विशेष चालना मिळालेली आहे. नफा मिळविण्याच्या हेतून केले व्यवसासिक कार्याची इच्छा ही अभिप्रेणेतील एक शक्तीशाली घटक समजला जातो. मॅक्रोरी यांना भारतीय उद्योजकांचा अभ्यासात असे दिसून आले की श्रीमंत होण्यापेक्षा मोठे होण्यास अधिक महत्व होते. उद्योगाचा विस्तार करण्यासाठी पुरेसा नफा मिळविला जातो. वेगवेगळया देशात अभिरप्रेरणे मागील कारणे वेगवेगळी आहेत. असे त्यांना दिसून आले होते. इंडोनेशियातील उद्योजकांना संपत्ती मिळविणे, सामाजिक प्रतिष्ठा सर्जनशिलतेस वाव आणि आत्मीक समाधान या गोष्टी महत्वाच्या वाटतात. या उलट जपान मध्ये काही उद्योजक नफयाला महत्व देतात. तर काही राष्ट्रीय विकासाच्या हेतूने प्ररीत झालेल्याचे रेनिस यांना संशोधनात दिसून आले होते.

मॅक्लेलँड या शास्त्रज्ञाने यश सिध्दीची प्रेरणा आणि उद्योजकतेचा विकास यातील परस्पर सबंध महत्वाचा मानलेला आहे. ज्या व्यक्तींना यश सिध्दीची गरज तिव्रपणे जाणवते अशी व्यक्ती उत्तम उद्योजक तयार होऊ शकतात. असे मॅक्लेलँड यांना दिसून आले. भारतीय लोक सर्वसामान्यपणे समाधानी वृत्तीचे असतात. मुलभूत गरजा पुर्ण झाल्यावरच विशेष यश मिळविणविण्यासाठी जास्त धडपड करण्याची त्यांची तयारी नसते. भारतात उद्योजकतेची वाढ न होण्यास

यश सिध्दी बाबतचा दृष्टीकोन कारणीभूत असतो असे मॅक्लेलँडचे मत आहे.

**२. गुणविशेष व कौशल्य** (Special Mirits and skill) : व्यवसायात याशस्वी होण्यासाठी उद्योजकाच्या अंगी असलेल विशेष गुण आणि कौशल्य आत्मसात करावे लागते. उद्योजकास उपलब्ध संधीचा फाण घेण्यासाठी योजना कार्यांवित करण्याचे कौशल्य असणे आवश्यक असते. यासाठी उद्योजकाला भांडवल गोहा करणे, यंत्रसामुग्रीची मांडणी करणे, योग्य माल आणि मनुष्यबळ उपलब्ध करणे या साठी योग्य व्यवस्थापन कौशल्य उद्योजकाच्या अंगी असावे लागते. उद्योजक तांत्रिक कौशल्याचा उपयोग नवनिर्मिती करण्यासाठी करीत असतो. उद्योजकतेचा विकास व्हावा म्हणून निरनिराळ्या प्रकारचे कौशल्य प्राप्त करून घेण्यासाठी पुरेशी संधी मिळणे आवश्यक असते. यातूनच उद्योजकता वाढीस लागते.

**३. ज्ञान व माहिती** (Knowledge and Information) : व्यवसाय यशस्वी करण्यासाठी निर्णय प्रक्रियेस विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. उद्योजकाला आपल्या परिसरातील किंवा सभोवतालची सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक वातावणाची आधिक माहीती असली पाहीजे. त्याला व्यवसाय संबधित कायदेविषयक माहीती असली पाहीजे. आणि कायद्याची माहीती करू न घेतली पाहीजे. त्याच प्रमाणे बाजारपेठेतील घडामोडी,अद्यावत ज्ञान असणे गरजेचे असते. उद्योग सबंधी आवश्यक ज्ञान व माहीती असणे फायदेशीर असते.

**४. शैक्षणिक आणि कौटूंबिक पार्श्वभूमी** (Eduational and Family backround) : शिक्षण हा निर्णायक घटक नसला तरी उद्योजकाची कार्यक्षमता आणि त्याचे यश त्याचा परिणाम होत असतो. जोखीम पत्करणे आणि नवनिर्मिती करण्यासाठी तंत्रज्ञान आणि बहीर्गत जगाचा परिचय करू न घेणे आवश्यक असते. हे सर्व शिक्षणामुळे शक्य प्रमाणे उद्योजकतेत शिक्षणा बरोबर वैयक्तीक अनुभवाचा फायदा कार्यक्षमता वाढविण्यासाठी होत असतो. व्यवसायातील नफ्याची संधी ही शिक्षण व्यवसायिक अनुभव आणि माहिती सहज उपलब्ध होणे या गोष्टींवर अवलंबून असते.

उद्योजकता वाढीत कौटूंबिक पार्श्वभूमि हा घटक अत्यंत महत्वाची भूमिका बजावित असतो. एकत्र कुटूंब व्यवस्थेमुळे मालमत्तेतील गुतंवणूकीचा फायदा मिळविण्यासाठी व्यवसायाच्या वाढीसाठी पैसा उभारता येतो. असे गाडगीळ यांच्या संशोधनातून आढळून आले. कुटूंबाला व्यवसायाची पार्श्वभूमि लागली

असेल तर भांडवल व व्यवस्थापनात अधिक आत्मविश्वासाने निर्णय घेण्यात येतात आणि उद्योजक यशस्वी होत असतात.

मॅकोरी यांच्या मते श्रमाचे काम करणाऱ्या भूमिहीनांमधून खेड्यांमध्ये उद्योजकता वाढीय अनुकूल कौटूंबिक परिस्थिती साहाय्यभूत ठरत असते. व्यापारी कुटूंब आणि समाजातील व्यक्ती उद्योगात सहजपणे सहभागी होऊ न यशस्वी होतातञकारण त्यांच्यात उद्योजकीय गुणवत्ता लहानपणा पासून विकसीत झालेली असते. उदा. वाणी, मारवाडी, गुतराथी, सिंधी, पटेल समाज भारतात संयुक्त हिंदू कुटूंबातून चांगल्या परंपरा जोपासणे आणि कौशल्य विकसित करणे यामुळे उद्योजकता वाढीस वाव मिळतो. व्यक्त ी कोणत्या जातीत व धर्मात जन्मला आलीत याचाही उद्योजकतेवर परिणाम होत असतो.

**५. मानशास्त्रीय घटक (Psychological Factor) :** उद्योजकता आणि मानशास्त्र यांचा परस्परांशी जवळचा सबंध आहे. उद्योजकाला अंतर्गत प्रेरणास्तोत्र हे एक वरदान असते. उद्योजकतेचे मानाशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न काही जागतिक नामवंत मानसशास्त्रीय केलेला आहे. यात प्रामुख्याने मॅक्लेलँड, वेबर, हेगन, लेव्ही यांचा समावेश होतो. उद्योजकताला विविध आर्थिक स्वरूपाची कार्य करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी उद्योजकाला मानसशास्त्रीय प्रेरणेची आवश्यकता असते आणि या प्रेरणेमुळेच एक उद्योजक सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा वेगळा समजला जातो. उद्योजकात मानसशास्त्रीय प्रेरणा उपजतच असतात असे नाही तर या प्रशिक्षणाने व अनुभवाने निर्माण झालेल्या असतात. धीरूभाई अंबानी, बिल गेट्स, बी. जी. सिर्के, गरवारे, मुकेश अंबानी, अनिल अंबानी, अझीम प्रेमळजी, नारायणमुर्ती, भवरलाल जैन यासारख्ये जागतिक उद्योजक असामान्य गुणांमुळे झालेले आहेत.

**४.२.३ बहिर्गत घटक (External Factor) :** बाह्य घटकांना परिस्थिती सापेक्ष किंवा बहिर्गत घटक असे ही म्हटले जाते. उद्योजकतेच्या याशस्वीतेसाठी कितपत संधी मिळू शकेल हे बहिर्गत घटकांवर ठरविता येते. उद्योजकास ज्या पर्यावरणात काम करावे लागते त्याची अनुकूलता उद्योजकतेच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असते. उद्योजकाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक वातावरण आणि उद्योजकाचे कार्य यांचा परस्परांवर परिणाम होत असतो. उद्योजक स्वत: पुढाकार घेऊ न जबाबदारीने व्यवसायास प्रारंभ करीत असला तरी त्याला बहिर्गत घटकांमधून उत्तेजन मिळणे आवश्यक असते. व्यवसायाच्या सुरूवातीस तांत्रिक व आर्थिक मदत देण्यासाठी सरकार

व इतर विकास संस्थांचे सहकार्य असले पाहीजे. फॉक्स माईन्स व पापानेक यांच्या संशोधनामुळे आर्थिक संधीचे उद्योजकतेच्या विकासातील महत्व स्पष्ट झालेले आहे. तर शुम्पीटरच्या मते पोषक वातावरणाचा उद्योजकतेच्या वाढीसाठी नसेल तर केवळ व्यक्तीगत गुणविशेषांच्या आधारे उद्योजकाला यशस्वी होता येणार नाही म्हणून पुढील प्रमाणे बहिर्गत घटकांचे वर्णन करता येईन.

**१. सामाजिक घटक (Social Factor) :** उद्योजक हा समाजातील घटक असतो समाजातील आचार विचारांचा पगडा त्याच्या मनावर झालेला असतो. उद्योजकतेच्या विकासाला चालना देण्याची प्रक्रिया समसजातूनच सुरवात होते. शिक्षण आणि प्रशिक्षणाची माध्यमे सामाजिक गरजांची पूर्तता करतात व लोकांना रोजगार प्राप्त होतो. यावरू न उद्योजकता विकासात समाजाची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. औद्योगिकीकरण, तांत्रिक सुधारणा, संघटन रचनेतील बदल यांना समाजाची मान्यता मिळाल्यास उद्योजकाच्या व्यवसायाचा विकास होतो आणि आर्थिक विकासाला गती प्राप्त होते. जाती व्यवस्था, व्यवसायाची परंपरागत वाटणी व पध्दती नवीन स्विकारण्याची प्रवृत्ती, आधुनिकते बाबतचा द्दष्टीकोन, कुटूंब पध्दतीची रचना या गोष्टींचा सामाजिक पर्यावरणात समावेश होतो. उद्योतकता विकासासाठी पोषक सामाजिक असे सामाजिक वातावरणामुळे शेतकरी गरजेचे असते. नंदी यांच्या मते, पोषक सामाजिक वातावरणामुळे शेतकरी कुटूंबात उद्योजकतेचा विकास चांगल्या प्रकारे झालेला आहे.

सामाजिक बदल झाल्याशिवाय देशात इतर कोणताही बदल परिणामकारकरित्या करता येणार नाही. उद्योजकतेच्या विकासात प्रथम व्यक्त ी घडवली जाते. पण व्यक्त ीला समाजाचे पाठबळ मिळाले तर ती प्रगती करू शकते. यासाठी उद्योजकाला मान्यता व प्रेरणा मिळेल असे सामाजिक वातावरण निर्माण होणे महत्वाचे मानले जाते. फ्रॅक डब्ल्यू यंग, मॅक्स वेबर, बी. एफ हॉसलिज, कोहरन यांचे विचार हे समाजशास्त्रीय आहेत. या समाजशास्त्रज्ञांनाच्या मते उद्योजक ही एक व्यक्ती असते व समाजाची एक प्रतिनिधी असते किंवा विशिष्ट अशा सामाजिक संस्कृती मध्ये विकसित होत असते. त्यांच्या मते, उद्योजकांना असलेली भूमिका यांच्या आधारे उद्योजकाची निर्मिती होत असते. कोहरन यांच्या मते, उद्योजक समाजातील एक आदर्श व्यक्ती असते. त्याची स्वत:च्या व्यवसायाबाबतची भूमिका, सामाजिक समूहाकडून अपेक्षित भूमिका व समाजाच्या अपेक्षित गरजा यावर त्याची प्रगती व कामाचा दर्जा अवलंबून

असतो. त्याची मनोभूमिका आणि अपेक्षित भूमिका ठरविण्यामागे सामाजिक मुल्याचे योगदान असते.

हॉस्लीज यांच्या मते, उद्योजकतेचा विकास फक्त अशा समाजातच शक्य आहे की ज्या समाजात समाजिक प्रक्रिया स्थिर नसते. तसेच वेबर यांच्या मत उद्योजकाचे स्पर्धात्मक परिस्थतीतील यश हे त्यांच्या नवनिर्मितीवर अवलंबून असते. तसेच त्यांच्या संकल्पनेनुसार उद्योजकीय शक्ती ही धार्मिक श्रध्देतून निर्माण झालेली असते. अमेरिका सारख्या राष्ट्रात उद्योजक आणि उद्योजकीय वर्तन यांना फार महत्वाचे स्थान आहे. काही राष्ट्रांमध्ये राजकीय आणि आर्थिक आदर्श आणि कायद्याची रचना या उद्योजकीय उपक्रमांना प्रोत्साहन देणाऱ्या असतात. तसेच सामाजिक स्थलांतर या घटकांचा उद्योजकतेवर परिणाम होत असतो. शुम्पीटर आणि वेबर यांच्या सामाजिक सिध्दातांची व्याप्ती व अनुमान एकसारखेच आहे.

**२. आर्थिक घटक (Economical Factor) :** उद्योजकता ही आर्थिक वृध्दीस कारणीभूत ठरत असते. परंतू जिथे आर्थिक विकासाचा वेग अधिक असतो. तिथे उद्योजकतेला पोषक वातावरण असते. उद्योजकता विकासात आर्थिक लाभ हा घटक अत्यंत महत्वपूर्ण आहे. आर्थिक लाभ मिळविणे ही मानवी प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीमुळे इतर घटकांचा आर्थिक लाभ होत असतो. ही प्रवृत्ती आर्थिक विकासाला कारणीभूत ठरत असते. अनुकूल आर्थिक वातावरणात उद्योजकतेची वाढ चांगल्या प्रकारे होत असते. उद्योजकतेमुळे आर्थिक बदल होत असतात. त्यामुळे आर्थिक वाढ आणि विकास होत असतो. यामुळे उद्योजकता उदयास येते. ग्राहकांची आवड-निवड, वाहतूक व्यवस्था यासारखे महत्वपूर्ण घटक उद्योजकता उदयास येण्यास आणि विकासात कारणीभूत ठरतात आणि यातूनच उद्योजकतेची आर्थिक वाढ होत असते.

भांडवलाची चलनक्षमता वाढवून ते व्यवसायासाटी उपलब्ध होणे, कर्ज देण्याची पध्दती सुटसुटीत असणे आणि व्याजाचा दर व परतफेडीची पध्दत सोईस्कर असल्यास उद्योजकता वाढीस लागते. तसेच उद्योजकतेला कच्चमाल उपलब्ध होणे शाक्तिसाधने आणि वाहतूची साधने उपलब्ध करून देणे व सरकारी धोरण उद्योजकता वाढीस उपयुक्त असणे. हे सर्व घटक सरकार उपलब्ध करू न देऊ शकते. जलद संदेशवहन, वस्तू व सेवांना स्थिर मागणी, स्वस्त विजपुरवठा,

कमी दराने, श्रमिकांच्या पुरवठ्यात सातत्य, कुशल व अकुशल कामगारांची उपलब्धता अशा काही गाष्टींमुळे उद्योजकाला अनुकूल असे व्यावसायिक व आर्थिक वातावरण निर्माण होते. यामुळे उद्योजक अल्पकाळात प्रगती साध्ये करू न आर्थिक विकास वाढ होते. पापानेक आण हॅरिस या अर्थतज्ञांच्या मतेउद्योजकता आणि आर्थिक विकास अशाच परिस्थितीत असेल की जेथे विशिष्ट व पोषक असे आर्थिक वातावरण उपलब्ध आहे. विविध प्रकारच्या बाजारपेठेतील उणीवा आणि आपुऱ्या आर्थिक धोरणांमुळे उद्योजकता विकासाचा अभाव आढळून येतो.

**३. राजकीय घटक (Political factor) :** उद्योजकतेवर परिणाम करणाऱ्यर विविध घटकांवर वातावरणाचा प्रभाव पडतो. देशातील अर्थव्यवस्थेवर राजकीय वातरवरणाचा अधिक परिणाम होत असतो. राजकीय वातावरणात सरकारी धोरणांचा समावेश असतो. उद्योजकता वाढीसाठी राजकीय घटक हा एक विशेष घटक समजला जातो. करविषयक धोरणात किंमत निर्धारण व प्रादेशिक निर्बंध यांच्या माध्यमातून सरकार बाजापेठेवर नियंत्रण ठेवू शकते. त्यामुळे विशिष्ट व्यवसायिक क्षेत्रातील उद्योजकतेस उत्तेजन देता येते. सरकार उद्योजकांना प्रशिक्षण देण्याच्या विविध योजना राबवू शकते. प्रकल्प अहवाल, वित्तीय अंदाजपत्रक, हिशेब, जाहीरात  या बाबतच्या प्रशिक्षणाच्या उद्योजकांना अधिक फायदा होत असतो. तांत्रिक आर्थिक आणि कामगारविषयक समस्यांसाठी मार्गदर्शनाची व्यवस्था सरकार उपलब्ध करू न देत असते. या करीता सरकार धोरणाची आणखी करीत असते. तसेच विकास महामंडळे, माहीती सेवा, औद्योगिक वसाहती, प्रशिक्षण केंद्र लहान उद्योगांसाठी महीमंडळे, निर्यात वृध्दी अशा विविध प्रकारच्या यंत्रणाद्वारे सरकार उद्योजकतेच्या विकासासाठी हात भार लावून पोषक असे राजकीय वातावरण निर्माण केले जाते. अनुकूल औद्योगिक धोरणाद्वारे सरकार लहान उद्योगाना संरक्षण देत असते . मक्तेदारीवर नियंत्रण ठेवल्याने अर्थव्यवस्थेतील ताण कमी होतो. काही व्यवसाय क्षेत्र लहान उद्योगांसाठी राखून ठेवण्यात येतात. करविषयक धोरणाद्वारे भांडवल निर्मितीस उत्तेजन दिले जाते. त्याच प्रमाणे नफ्याची पुनर्गुंवणूक करण्यासाठी लहान व्यवसाय संस्थांना सवलती देण्यात येतात. भारत सरकारच्या अनुकूल धोरणांच्या आणि पोषक अशा व्यवसायसत यश प्राप्त करण्यासाठी औपचारीक आणि सामाजिक सबंध आणि राजकीय सहकार्य या आवश्यक गरजा झालेल्या आहेत. राजकीय सबंध सामाजिक सहभाग व इतर संपर्क उद्योजकतेच्या दृष्टीकोनातून फार महत्वाच

असते. पोषक सहकारी व सामाजिक मान्यता हे दोन घटक यशस्वी उद्योजक होण्यास महत्वाचे असतात. अशारितीने राजकीय स्थैर्य, सिध्दी प्रेरणा, आर्थिक स्थैर्य, साहाय्यभूत संस्थांचे अस्थित्व, पोषक असे सरकारी धोरण यासारखे महत्वपुर्ण घटक उद्योजकता विकासासाटी पोषक असतात.

**४. सांस्कृतीक घटक (Cultural Factor) :** एखाद्या देशाच्या लोकांची मानसिक जडणघडण बऱ्याच प्रमाणात तेथिल सांस्कृतीक घटकांवर अवलंबून असते. लोकांचे विचार बदल स्विकारण्याची तयारी, वागणूक व सवयी यावर संस्कृतीचा खोलवर ठसा उमठलेला असतो. लोकगीते, सण व धार्मिक भावना, अंधश्रध्दा यात संस्कृतीचे प्रतिबिंब दिसून येते. उद्योजकतेच्या अभ्यासात मॅकलेलँडने या गोष्टींवर अधिक भर दिलेला आहे. उद्योजकाला बाजपणातच त्याच्यावर जे संस्कार झालेल असतात त्या वरून त्याचे ध्येय, प्रेरणा व काम करण्याची क्षमता यांचे स्वरूप त्याच्या मानावर झालेले असते. म्हणून सांस्कृतीत वातावरणचा उद्योजकाच्या कार्यावर विविध प्रकारे प्रभाव पडत असतो. देशातील बचत आणि गुंतवणू ही संस्कृतील प्रभावर अवलंबून असते. हे उद्योजकास अवगत असेल तर भंडवल उभारणीस अडचण येत नाही. काही संस्कृतीत औद्योगिक काम हे कमी प्रतीचे समजले जाते. अशा प्रदेशातील लोक औद्योगिक वातावरणाशी तडजोड करीत नाहीत. ते स्वत:च्या सवयीनुसार वागणुकीनुसार ते अवलंब करीत असतात. म्हणून उद्योगाच्या विकासात अडथळे निर्माण होत असतात. विशिष्ट सांस्कृतीक विचार प्रवाहांमुळे काही प्रकारचे व्यवसाय यांना प्रतिष्ठा प्राप्त होत असते. अशा व्यवसायाचा विकास होत असतो. तसेच सांस्कृतीक वातावरणा प्रमाणे बदल होण्यास काही कालावधी निघून गेल्यानंतर औद्योगिक विकासात बदल होत असतो. तसेच शिक्षणाचा प्रसार, सरकारचे अनुकूल धोरण व अधूनिक युगातील औद्योगिक संस्कृती यामुळे वातावरणात बदल झाल्यास उद्योजकतेची संस्कृती वाढीस लागते. भारतीय व्यावसायिक वातावरणाचे एक अभ्यासक हेलन लॅब यांच्या मते, अर्थरचनेतील प्रचंड अदलामुळे सामाजिक मुल्यांमध्ये तर बदल झाल्यामुळे उद्योजकापुढील सांस्कृतीक समस्या सुटू शकतील भारतात विशेषत: ग्रामीण भागात विशिष्ट जातीच्या मुलांना कौटूंबिक सांस्कृतीचा असल्याने त्यांच्या जाती सबंध नसलेल्या क्षेत्रातील उद्योजकतेमध्ये प्रवेश करू दिला नाही.

## ५.३ परिभाषिक शब्द

## ५.४ स्वयं अध्ययन प्रश्न

प्रश्न १ : उद्योजकता विकासात परिणामकारक घटक थोडक्यात स्पष्ट करा?

प्रश्न २ : उद्योतकता विकासात परिणामकारणारे अंतर्गत घटक स्पष्ट करा?

प्रश्न ३ : उद्योतकता विकासात परिणामकारणारे बहीर्गत घटक स्पष्ट करा?

## ५.५ सारांश

## ५. ६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १ : उद्योजकता विकासात परिणामकारणारे घटक स्पष्ट करा ?

प्रश्न २ : उद्योजकता विकासात परिणामकारणारे अंतर्गत घटक सविस्तर वर्णन करा ?

प्रश्न ३ : उद्योजकता विकासात परिणामकारणारे बहिर्गत घटक सविस्तर वर्णन करा ?

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.येवले, अरून; सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरविंद (२०१०) उद्योजकता विकास, जळगांव: प्रशांत पब्लिकेशन.

२.कडवेकर, व्ही.; सी. ए. आणि कोठावदे, आर. (२००५) व्यवसायिक उद्योजकता, पुणे : डायमुड बुक डेपो

३.कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर, (२००६) व्यवसायिक उद्योजकता-२, पुणे : डायमंड बुक डेपो

४. कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर, (२००७) व्यवसायिक उद्योजकता-३, पुणे : डायमंड बुक डेपो

५.देशमुख, प्रभाकर (२००२) उद्योजकता विकास, नागपुर : पिंपळापुरे ॲण्ड कंपणी पब्लिशर्स

6. Khan] M.A, (1992) Entrepreneurial Development in India, New Delhi: Kanishka Publishing House

7.Khanka, S.S. (2001) Entrepreneueship Development, New Delhi: S.Chand & Co.

8.Desai, Vasant (2001) Dynamics of Entrepreneur Development and Management, New Delhi:

9.Gupa, C.B. (1999) Entrepreneurship and Small Business Management, New Delhi: S Chand & Co.

# घटक ६
# उद्योजकता विकासातील सिध्दांत
# Entrepreneurship Development Theories

अनुक्रमणिका


६.० उदिष्टे
६.१ प्रास्तावना
६.२ विषय विवेचन
    ६.२.१ आर्थिकशास्त्रीय सिध्दांत
    ६.२.२ समाजशास्त्रीय सिध्दांत
    ६.२.३ मानसशास्त्रीय सिध्दांत
    ६.२.४ एकत्रितेचा सिध्दांत
६.३ पारिभाषिक शब्द
६.४ स्वयं अध्ययन प्रश्न
६.५ सारांश
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


६.० उदिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला ............


- ❖ उद्योजकता विकासातील सिध्दांत स्पष्ट करता येईल.
- ❖ आर्थिकशास्त्रीय सिध्दांतची माहिती देता येईल.
- ❖ मानसशास्त्रीय सिध्दांत वर्णन करता येईल.
- ❖ समाजशास्त्रीय सिध्दांतची माहिती देता
- ❖ ग्रामीण युवकांना स्वयंरोजगार प्रशिक्षण नमुद करता येईल.

### ६.१ प्रस्तावना

मागील चार शतकांच्या दीर्घ कालखंडामध्ये उद्योजकतेच्या विविध पैलूंबाबत संशोधन, चितंन व निष्कर्षाचे प्रतिपादन ही सर्व प्रक्रिया सर्व समाजामध्ये, प्रामुख्याने समाजामध्ये, अव्याहतपणे सुरू आहे. प्रत्येक देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत उद्योजतेची भूमिका अधिक महत्वाची आहे ही गोष्ट अनेक विचारवतांनी प्रतिपादन केले आहे. उद्योजकतेची व्याप्ती, उद्योजकतेचा विकास, उद्योजकतेची भूमिका, उद्योजकाचया विकासाकरीता आवश्यक असलेले व्यावसायिक पर्यापरण, उद्योजकतेला प्रभावित करणारे विविध प्रकारचे घटक, समाजात होणारे बदल, उद्योजकाचे अभिप्रेरण, उद्योजकाचे प्रशिक्षण, सरकरी धोरण व उपाययोजना, अशा

अनेक बाबींविषयी संशोधन आणि चितंनातून अनेक चांगले विचार व्यत्त्क करण्यात आलेले आहेत. हे विचार अत्यंत उपयुत्क असे होत. या मुळ विचारांचे प्रतिपादन, त्यांच्यावर करण्यात आलेली टिका व त्यानंतर हया टोकाच्या विचारांमध्ये साधण्यावर आलेला समन्वय हया प्रक्रियेतून हेविचार प्रगल्भ झाले.उद्योजकतेच्या विविध पैलूंबाबत करण्यात आलेल्या हया शास्त्रशुध्द, मुलगामी व वैचारीक प्रतिपादनाला उद्योजकतेच्या सिध्दान्त असे म्हणता येईल.

उद्योजकतेच्या सिध्दान्ताचे प्रकार पुढील आकृतीच्या साहाय्यानेस्पष्ट करता येईल.




**आकृती १.३ उद्योजकतेच्या सिध्दन्ताचे प्रकार**

विचारवंतांनी वेगवेगळे उद्योजकतेचे सिध्दान्त मांडलेले आहेत त्यांचा आशय हा वेगवेळा आहे.परंतू तीन विचावंतानी जे सिध्दान्त मांडलेत त्याचे अस्तित्व जाणवते. या विचारांचे स्वरूप लक्षात घेऊन उद्योजकतेचे सर्व सिध्दान्ताचे स्थूलमानाने आर्थिक सिध्दान्त, समाजशास्त्रीय सिध्दान्त, मानसशास्त्रीय सिध्दान्त असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

**६.२ विषय विवेचन**

**६.२.१ आर्थिक शास्त्रीय सिध्दान्त (Economic Theories)**:ज्या काळात उद्योजकतेला उत्पादनाचा स्वतंत्र घटक मानले जात नव्हते त्या काळातील अर्थशास्त्रज्ञांनी उद्योजकतेशी संबधित अनेक विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत. या बाबत क्लासिकल अर्थशास्त्रज्ञांचा प्रमुख्याने उल्लेख करता येतो तसेच मार्शल, जे. बी.से., नाईट, इत्यादी विचारवंताच्या मते उद्योजकतेच्या उत्पत्ती व विकासावर प्रामुख्यो अर्थिक घटकांचा व आर्थिक पर्यावरणाचा तीव्रतेने परिणाम होतो.उद्योजकतेशी संबंधित आर्थिक घटक अनुकूल असतील तरच उद्योजकतेचा विकास होतो. उद्योजक सक्रीय होतात, मोठया प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करतात,अनिश्चिमुळे उत्पन्न होणारी व्यावसायिक जोखीम स्वीकरतात आणि नवीन उद्योगांची स्थापना

व अस्वित्वात असलेल्या उद्योगांचा विस्तार करतात. हा विचार आर्थिक विचारधारेचा आधार आहे.

उद्योजकीय प्रेरणा विविध आहेत. परंतू हया प्रेरणांमध्ये आर्थिक प्रेरणा मूलभूत व महत्वाच्या आहेत. जास्तीत जास्त नफा मिळविणे, आर्थिक उत्कर्ष साध्ये करणे, आर्थिक शक्ती होणे, औद्योगिक सामराज्यनिर्माणकरणे,हया सर्व आर्थिक प्रेरणा आहेत. आर्थिक प्रेरणांचे उद्योजकावर होणरे परिणामदिघकाळापर्यंत टिकून राहतात.

अनेक विचारवंतांनी विकसनशील देशांमध्य घडूनयेणाऱ्य विकासा बद्दल चिंतन कलेले आहे. हया विचारवंतात गुन्नार मिरडाल, रानार नर्क्स विल्यम रोस्टोव्ह, इत्यादी अर्थशास्त्रज्ञांचा प्रामुख्याने समावेश होतो या विचारवंतांचा सिध्दान्त हा आर्थिक सिध्दान्तात समावेश करता येईल.

उद्योजकतेविषयी आर्थिक सिध्दान्त मांडणाऱ्या विद्वानांमध्ये अधुनिक काळातील जी. एफ. पॅवनेक, आणि जे.आर हॅरिस यांचा प्रामख्याने उल्लेख करता येतो. हया विचावंतांच्या मते आर्थिक फायदा मिळविण्याची प्रेरणा सर्वच समाजामध्ये कार्य करीत असली तरी देशात विशिष्ट वेळेस असलेले आर्थिक वातावरण, आर्थिक अभिप्रेरण आणि सरकारची विभिन्न धोरण यांचा उद्योजकतेच्या विकासावर सर्वात जास्त परिणाम होतो. या विषयी फलेव्हिआ डेरोसी यांचे विचार स्पष्ट करता येतील यांच्या मते आर्थिक व राजकीय सत्ता,सत्ता मिळविण्याची आकांक्षा, सत्तेशी जवळीकता हा विकसनशील देशामध्ये उद्योजकतेच्या विकासावर प्रभावित करणारा एक महत्वाचा घटक असतो. अर्थयास्त्रीय विचारधारेच्या विकासामध्ये योगदान करणाऱ्या विचारवंतांच्या मते आर्थिक घटक , आर्थिक पर्यावरण, आर्थिक प्रेरणा आणि आर्थिक धोरणे अशा आर्थिक धोरण अशा आर्थिक बाबींचा उद्योजकता विकासावर सर्वात जास्त परिणाम घडुन येतात.

६.२.२) **समाजस्त्रीय सिध्दान्त (SociologicalTheories)**ःउद्योजक समाजात राहतात, समाजाचा एक घटक म्हणून कार्य करीत असतात. त्यांचे प्रयत्न व उपक्रम समाजाच्या प्रगतीकरिता कारणीभूत ठरतात. अनेक समाजस्त्रज्ञांना हया संदर्भात मौलिक योगदान केलेले आहे त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळेच समाजशास्त्रीय विचारधारा बदल झालेली आहे. आणि समाजशास्त्रीय सिदन्तांना व्यापक स्विकृती प्राप्त झाली त्याच प्रमाणे समाजशास्त्रीय सिध्दान्तांचे ज्या शास्त्रज्ञांनी वर्णन केलेले आहे ते पुढीलप्रमाणेः

१) मॅक्सवेबर यांनी सांगितलेला सिध्दान्त हा व्यापक मान्यता प्राप्त सिध्दान्त

आहे त्यांनी स्पष्ट केले  की काही विशिष्ट प्रकारच्या धार्मिक श्रध्दा व मुल्याची जोपासना केल्यास संबंधित व्यक्तीच्या मनात व्यवसायात याशस्वी होण्याकरिता पैसा व भौतिक वैभव मिळविण्याकरिता आवश्यक ते प्रयत्न व परिश्रम जिद्दीने करण्याची प्रबळ प्रेरणा निर्माण

२) थॉमस कोचपन यांनी सांगितलेला सिध्दान्त हा उद्योजकताच्य व्यक्तीमत्वाशी संबधित आहे . या सिध्दान्तात समाजाच्या दृष्टीने उद्योजक हे एक आदर्श व्यक्तीमत्व असते आणि त्याच्या कार्यावर आणि  याशावर प्रामुख्याने तीन बाबींचा प्रभाव पडतो. व्यवसायाच्या बाबतीत उद्योजकाच्या वैयक्तीक दृष्टीकोन व प्रवृत्त, सामाजिक मान्यता प्रदान करणाऱ्या समुदायाच्या उद्योजकाकडुन असलेल्या अपेक्षा आणि उद्योजकाच्या कार्यविषयक गरजा, समाजिक मुन्ल्याचा उद्योजकतेवर तीव्रतेने परिणाम होतो.

३) जॉन कुन्कल यांना उद्योजकतेच्या पुरवठयाच्या संदर्भात सामाजिक पर्यावरणाचा अभ्यास करून वर्तणूकीचा सिध्दन्त मांडला कुन्कल यांच्यामते उद्योगाच्या भोवताली जी सामाजिक चौकट आहे, तिचा उद्योजकाच्या वागणूकीवर परिणाम होतो. त्यामळे आर्थिक व सामाजिक प्रेरणांच्या माध्यमातून उद्योजकाची वागणूक प्रभावित करता येते. कुन्कल यांच्या सिध्दान्तानुसार समाजव्यवस्था आणि उद्योजकता यामध्ये संबंध असून सामजिक रचना, मागणीची रचना, संधीची रचना व कामगार रचना ह्या घटकांचा उद्योजकतेवर परिणाम होतो.

४) फ्रँक यंग यांच्यामते समाजातील विविध समूहातील परपस्पर संबंध, त्यातील क्रिया प्रतिक्रिया व त्या माध्यमातून घडून येणारे परिर्वतन हा फ्रॅंक यंग यांनी सांगितलेल्या सिध्दान्ताचा विषय आहे या सिध्दान्तानूसार जेव्हा समाज व्यवस्थेमध्ये योग्य नाकारले जाते, त्यांच्या हिताकडे दुर्लक्ष होते, तेव्हा हया समूहांजवळ काही संसाधने उपलब्ध असल्यास व आपल्या स्थितीमध्ये बदल घडवून आणाण्याची त्यांची प्रबळ प्रेरणा असल्यास हे समूह सक्रिय होतात व त्या परिस्थितीत उद्योजकाचा विकास घडुन येतो.

५) होझेलिस व स्टोकस यांच्या मते समाजशास्त्रीय विचारधारा समृध्द करण्यासाठी यांचे योगदान महत्वाचे आहे होझेलिटझ यांनी आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीकोणातून सांकृतिक दृष्टीने मागास वर्गाच्या भूमिकेला विषेश महत्व असते असे त्यांनी स्पष्ट केलेल आहे.

स्टोकस यांनी त्याच्या सिध्दान्तात समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक मुल्यांचा आर्थिक व्यवहारांवर परिणाम होतो आणि ही प्रक्रिया पुढे आर्थिक दृष्टीने संक्रमणावस्थेमध्ये असलेल्या समाजामध्ये औद्योगिक उद्योजक निर्माण करण्यासाठी कारणीभूत होते हा विचार मांडलेला आहे.

**६.२.३ मानसशास्त्रीय सिध्दन्त (Psychological theories)**:मानसशास्त्रीय विचारधारा समृध्द करण्यामध्ये अनेक मानसशास्त्रज्ञांचे योगदान आहे. यांच्यात प्रामुख्याने जोसेफ शुम्पीटर, मॅक्लीललँड, हेगन, जे. ई. स्टेपनेक, बी.सी. टंडन आणि जे .जे. बरना यांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. यांचे विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) शुम्पीटर यांनी त्यांच्या सिध्दान्तात व ननिमिर्ती,उद्योतकता, परिवर्तन आणि आर्थिक विकास यांच्यातील संबध प्रस्थापित केला . नवनिर्मिती करणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक शुम्पीटर यांच्या सिध्दान्तानुसार उद्योजक विविध मार्गांनी नवनिर्मिती घडवून आणतात. ह्या नवनिर्मितीमुळे अर्थव्यवस्थेत परिवर्तन घडुन येते व ह्या परिवर्तनाचा परिणाम आर्थिक विकासाला चालना मिळते असे घडून येण्यासााठी उद्योजक सत्ता मिळण्याचा, विजय मिळविण्याचा,लढण्याचा,श्रेष्ठत्व सिध्द करण्याच्या महत्वाकंक्षेने अभिप्ररित असले पाहीजे तसेच उद्योजकामध्ये काही दुर्मिळ गुण, योग्यता व कौशल्ये असणे आवश्यक आहे.

२) डेव्हिड मॅक्लेलँड यांचा सिध्दांत हा मागास देशाच्या दृष्टीकरणातून एक मैलाचा दगड मानला जातो. मॅक्लेलँड यांनी आर्थिक विकासामागे एक विशिष्ट प्रेरणा, एक विशिष्ट वैचारिक मार्ग असतो असे स्पष्ट केले.महत्वकांक्षी व्यक्तींचा शोध घेऊन त्याच्या मनात ही प्ररेणा सिध्दप्रेरणा निर्माण करता येते. सिध्दप्रेरणा, उद्योजकतेची वाढ व आर्थिक विकासामधील सहसंबंधाच्या आधारावर मॅक्लेलँड यांच्या प्रमेयाची उभारणी झाली आहे. मॅक्लेलँड यांनी प्रयोगातून प्रशिक्षणाच्या माध्यामातू सिध्दीप्रेरणा निर्माण करता येत, सिध्दीप्ररणेची पातळी वाढविता येते हे स्पष्ट झाले

३) प्रो. हेगन यांनी उद्योजकतेची मानसशास्त्रीय बाजू लक्षात घेऊन एखाद्या वर्गाचे सामाजिक स्थान नष्ट झाल्यामुळे त्या वर्गाची कशी पडझड व अवनती होत आणि काही काळ गेल्या नंतर कुटूंबातील मुलांचे विशिष्टरितीने संगोपन केल्यानंतर अबलेल्या वर्गातून नवीन उद्योजक कसे निर्माण होतात, याबद्दल स्पष्टीकरण केलेले आहे. हेगन यांचा सिध्दान्त मागास देश,

मागास समाज,मागास वर्ग, व मागास जातींच्या दृष्टीने महत्वाचा आहे. कुटूंबात सांस्कृतिक मुल्यांची जपणूक करण्यात आल्यास व स्त्रियांकडून मुलांना संस्कारिता व अभिप्रेरित करण्यात आल्यास,दबलेल्या जातीमधूनही कर्तबगार उद्योजक निर्माण होतात. हा निष्कर्ष आपण सर्वांनाच एक नवीन दृष्टीकोण देण्यासाठी साहाय्यक ठरतो.

**या सिध्दान्तांचे निष्कर्ष**ःउद्योजकतेच्या सिध्दान्तांचे तीन प्रकारामध्ये वर्गीकरण करण्यात आले असले, तरी हे वर्गीकरण साचेबंद नाही. उद्योजकतेचे आर्थिक सिध्दान्त हे निव्वळ आर्थिक स्वरूपाचे किंवा आर्थिक बाबींशी संबंध असणारे सिध्दान्त नाहीत. हया आर्थिक सिध्दान्तांना समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय बाजू आहेत.जे समाजशास्त्रीय सिध्दान्त आहेत त्यांनाही जशी आर्थिक बाजू आहे तशीच मानसशास्त्रीय बाजू आहे.उद्योजकतेचा प्रत्येक सिध्दान्तामध्ये आर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि मानसशास्त्र हया तीन समाजिक शास्त्रांशी संबधित अशा विविध छटा आहेत. हया छटा परस्परां पासून पूर्णपणे वेगवेगळया करता येणार नाहीत अर्थात त्यामुळे हया सिध्दान्ताची मौलिकता आणि महत्व मुळीच कमी होत नाही, हेही तेवढेच खरे आहे.

### ६.२.४ एकत्रितचा सिध्दांत *(Integrated Model)*

उद्योजकतेच्या सिध्दांतेचे मानसशास्त्रीय सिध्दांत, समाजशास्त्रीय सिध्दांत आणि आर्थिक सिध्दंत तीन प्रकरात केलेले वर्णन आशयाच्या दृष्टीने स्वाभाविकणे वेगवेगळे असले तरी ते **साचे बंध** नाही.उद्योजकतेचे आर्थिक आदर्श हे निव्वळ आर्थिक स्वरूपाचे किंवा आर्थिक बांबीशी संबंधी असणारे आदर्श नाही. तर या आर्थिक आदर्शांना समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय बाजूपण आहेत.जे समाजशास्त्रीय सिध्दांत आहेत.त्यांनाही आर्थिक आणि समाजशास्त्रीय बाजू आहे तसेच मानसशास्त्रीय सिध्दांतांना सामाजिक बाजू आहे. **उद्योजकतेच्या प्रत्येक सिध्दांतामध्ये अर्थशास्त्र समाजशास्त्र आणि मानसशास्त्र या तीन सामाजिक शास्त्रांशी संबंधीत अशा विविध बाजू आहेत. या परस्परांपासून पूर्णपणे वेगळ्या करता येत नाही**.त्यामुळे या सिध्दांताची मौलिकता आणि महत्व मुळीच कमी होत नाही. हे सांगणे देखील क्रम प्राप्त आहे.

## ६.३.परिभाषिक शब्द

## ६.४ स्वयं अध्ययन प्रश्न

प्रश्न १ः उद्योजकता विकासातील सिध्दांत थोडक्यात स्पष्ट करा?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

प्रश्न २ः आर्थिकशास्त्रीय सिध्दांत थोडक्यात स्पष्ट करा?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

प्रश्न ३ः मानसशास्त्रीय सिध्दांत विशद करा?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

प्रश्न ४ः एकत्रितेचा सिध्दांत थोडक्यात स्पष्ट करा?

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

## ६.५ सारांश

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १: उद्योजकता विकासातील सिध्दांत स्पष्ट करा?

प्रश्न २: आर्थिकशास्त्रीय सिध्दांत सविस्तर वर्णन करा?

प्रश्न ३: समाजशास्त्रीय सिध्दांतची सविस्तर माहिती लिहा?

प्रश्न ४: मानसशास्त्रीय सिध्दांत स्पष्ट करा?

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. येवले, अरूण; सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरिंवद (२०१०) उद्योजकता विकास, जळगांवः प्रशांत पब्लिकेशा.

२. कडवेकर, व्ही; रावळ, सी.ए. आणि कोठावदे, आर. (२००५) व्यवसायिक उद्योजकता, पुणेः डायमंड बुक डेपो

३.कडवेकर ,व्ही. आणि कोठावदे, आर.(२००६) व्यवसायिक उद्योजकता-२,पुणेः डायमंड बुक डेपो

४.कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर.(२००७) व्यवसायिक उद्योजकता-३,पुणेः डायमंड बुक डेपो

५.देशमुख, प्रभाकर (२००२) उद्योजकता विकास,नागपुरः पिंपळापुरे ॲण्ड कंपी पब्लिशर्स

*6.Khan, M.A, (1992) Entrepreneurial Development in India, New Delhi: Kanishka Publishing House*

*7.Khanka,S.S (2001) Entrepreneurship Developme New Delhi:S. Chand&Co.*

*8.Desai,Vasant(2001) Dynamics of Entrepreneur Develoment and Management,New Delhi: Himalaya Publishing Hous*

*9. Gupta, C.B.(1999) Entrepreneurship and Small Business Managment, New Delhi:S. Chand & Co.*

## घटक ७

## प्रकल्प अहवाल

# Project Report

**अनुक्रमणिका**


७.० उदिष्टे

७.१ प्रास्तावना

७.२ विषय विवेचन

    ७.२.१ प्रकल्प - व्याख्या व व्याप्ती

    ७.२.२ प्रकल्प अहवालाचे महत्व

    ७.२.३ प्रकल्प अहवालातील घटक

    ७.२.४ नमुना प्रकल्प अहवाल

७.३ परिभाषिक शब्द

७.४ स्वयं अध्ययन प्रश्न

७.५ सारंश

७.६ सरावासाठी स्वाध्याय

७.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ७.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला .........

- ❖ प्रकल्प अहवाल स्पष्ट करता येईल.
- ❖ प्रकल्प अहवालची व्याप्ती नमुद करता येईल.
- ❖ प्रकल्प अहवालचे महत्व वर्णन करता येईल.
- ❖ प्रकल्प अहवालतील घटकची माहिती देता येईल.
- ❖ नमुना प्रकल्प अहवाल सादर करता येईल.

## ७.१ प्रस्तावना

स्वतंत्र्यपणे एखादा उद्योग सुरू करण्यासंदर्भात जेव्हा निर्णय घेतला जातो, तेव्हा सर्वप्रथम विशाल अशा उदद्योग, व्यापार विश्वातील घटकांचा अभ्यास करावा लागतो. विविध उपक्रमाचा पर्यायी उदद्योग संधीचा पूर्ण विचार केला जातो. उद्योग समुहाचा नाही मात्र दृष्टकोन असेल आणि कोणताही अभ्यास नकरता केवळ अनुकरणाने जर उदद्योग स्थापित केला तर त्याद्वारे फक्त नुकसान मिळू शकते असे होवू नये म्हणून विविध उदद्योग समुहाची माहीती, शास्त्रीय दृष्टीकोनात्मक अभाव आपल्या जवळ असलेली कौशल्य, शिक्षण व अवांतर ज्ञान याचाही अभ्यास महत्वपूर्ण असतो. **उद्योग संधीची ओळख आणि निवड या माध्यमातूनस यशस्वी व्हायचे असेल तर त्यासाठी प्रकल्प अहवालाची भूमिका महत्वपूर्ण ठरते.** कोणताही उदद्योग स्थापित करत असताना भक्कम इच्छाशक्ती आवश्यक असते, मात्र केवळ त्या आधारावर यश मिळवता येत नाही.**आधुनिक युगात यशस्वी उद्योजकाजवळ शास्त्रशुध्द पध्दतीची व त्यामार्गाने जाण्याची गरज असते.** प्रकल्प म्हणजे काय त्याची गरज काय याबाबतची माहिती त्यासाठी आवश्यक असते.

## ७.२ विषय विवेचन

### ७.२.१ प्रकल्प व्याख्या व व्याप्ती :-

विविध औद्योगिक वस्तु व सेवा यांची जनतेमधील गरज भागविण्यासाठी आवश्यक ते उत्पादन व सेवा यासाठी करावी लागणारी भांडवली गुंतवणूक योजना म्हणजे प्रकल्प होय.

ज्या वस्तुचे उत्पादन करायचे आहे त्या प्रकल्पाचे सविस्तर लेखी स्वरूपात नियोजनबध्द केलेले विश्लेषण म्हणजे प्रकल्प होय.

**तांत्रिक दष्टीने सविस्तर केलेले लेखी नियोजन म्हणजे प्रकल्प अहवाल होय.**

**हेन्री फयाल** -प्रकल्पास उपलब्ध असलेल्या व्यावसायिक संधीचा विचार करून त्याची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यापुर्वी त्याच्या व्यावहारिक व तांत्रिक बाबीसंबंधी निर्देशन करणारा आराखडा म्हणजे प्रकल्प अहवाल.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होतेकी, जेव्हा एखादा उद्योजक एखादा उपक्रमाचा विचार करतो तेव्हा उत्पादन पूर्व योजना तयार करावी लागते. ज्यात माहितीचे पृथ्थकरण, मुल्यमापन, विश्लेषण व मिळू शकणारा लाभ याविषयी शास्त्रीय पध्दती स्वतंत्रपणे

आहे? या उपक्रमाची समाजाला काय गरज आहे ? समाजाचे संरक्षण कसे केले जाणार आहे? असे किती उपक्रम परिसरातआहे ? त्यांची स्थिती काय आहे ? याची माहिती प्रकल्प अहवालात महत्वपूर्ण असतो.

५) **पर्यावरण** – नियोजीत प्रकल्पामुळे पर्यावरणावर कसा परिणाम होणार आहे त्याचे नियंत्रण कसे करण्यात येईल, पर्यावरणाची सुरक्षा कशी केली जाईल, उपाय योजना काय आहेत, प्रामुख्याने पाणी, धुर, आवाज. **या प्रदुषणाचे नियंत्रण कसे केले जाईल.** यामुळे समस्या निर्माण होवू शकतात काय? या विषयीची माहिती प्रकल्पात सविस्तरपणे मांडलेली असते व विविध विभागांकडून त्या संदर्भात प्रमाणपत्र जोडलेली असतात. समाज सुरक्षततेच्या दृष्टीने प्रकल्प अहवाल महत्वपूर्ण मानला जातो.

६) **आर्थिक स्थिती** – प्रकल्प अहवालात आर्थिक विवरण स्पष्ट केलेले असते, पैसा किंवा भांडवल उभारण्याचे मार्ग, प्रकल्पावर होणारा खर्च, कर्जाची आवश्यकता असल्यास बँकेचे वित्तीय संस्थाचे पतप्रमाणपत्र याबाबत सविस्तर वर्णन केलेले असते. **आर्थिकदृष्ट्या प्रकल्प कसा सक्षम असणार आहे हे प्रकल्प अहवालात नमुद केलेले असल्याने प्रकल्प अहवालाचे महत्व वाढते.**

७)**तांत्रिक माहिती** – प्रकल्प उभारत असतांना, प्रकल्प प्रत्यक्षात सुरू करतांना व प्रकल्प संचलन करतांना कोणत्या तंत्राचा वापर केला जाणार आहे त्या तंत्राची पर्श्वभूमी, आखणी व तज्ञ विश्वासर्हता याबाबत सविस्त्तर विवेचन केलेले असते. त्यामुळे प्रकल्प अहवालाचे महत्व वाढते. कोणते तंत्र तांत्रिक सहकार्य करणार आहेत. त्यांची मदत व मार्गदर्शन कसे घेण्यात येईल याबाबत करार आहे काय? **तांत्रिक जबाबदारी स्विकारण्याचे लेखी विवेचन प्रकल्प अहवालात द्योवे लागते.**

### ७.२.३ प्रकल्प अहवालातील घटक

१) **उद्दिष्टे** – प्रकल्प अहवालात **प्रकल्पाची उद्दिष्टे काय आहेत** हे सुत्र स्पष्ट केलेले असते. आर्थिक आर्थिक उद्दिष्ट, सामाजिक उद्दिष्टे व गरजेची उद्दिष्टे स्पष्ट केलेली असतात. त्याचप्रमाणे उद्योजकाची पार्श्वभूमी त्याची पुर्ण माहिती आर्थिक व तांत्रिक क्षमता स्पष्ट केलेली असते. प्रकल्पाची जागा , जागा निश्चितीचे कारण वापरला जाणारा कच्चा माल, वाहतूक, बाजारपेठ, विजपाणी व मनुष्यबळ या घटकांचा विचार प्रकल्प अहवालात नमुद करणे आवश्यक असते.

२) **उत्पादनाची वैशिष्टे** – उत्पादनाची वैशिष्टे काय आहे, उत्पादनाची दर्जा, उत्पादनाची प्रक्रिया थोडक्यात पूर्वपासून ते उत्पादन ग्राहकाच्या उपभोगापर्यंत अवस्था

काय असतील याबाबत सविस्तर माहिती प्रकल्प अहवालात नोंदविलेली असते. **उत्पादन साठवन, विपणन व वितरण पध्दती, दर्जा नियंत्रण पध्दती याबाबत सुस्पष्ट माहिती प्रकल्प अहवालात मुद्देसूदपणे असते.**

**३) वेळापत्रक –** उद्योग प्रकल्प वेळ घटक महत्वपूर्ण असतो. वेळेबाबतची जागरूकता व नियाकजन स्पष्ट असले पाहिजे. **वेळेची उपयुक्ताता, वेळेचे महत्व याबाबत प्रकल्पात संपूर्ण प्रकल्पाचे वेळापत्रक स्पष्ट होणे महत्वाचे असते.** त्यात प्रामुख्याने कार्यालयीन कामकाज, विविध प्रकल्पांच्या भेटी व उत्पादन प्रक्रिया कालावधी यासंर्भात परिपूर्ण माहिती असावी.

**४) साधन सामग्री व कच्चा माल –** प्रकल्प अहवालात साधन–सामग्री कच्चा माल या संदर्भातील स्पष्टीकरण असावे. कोणती साधन–सामग्री कशी वैशिष्टपूर्ण असेल कुठून उपलब्ध होईल. कच्चा मालाचा दर्जा कसा असेल, वाहतूक कशी केली जाईल. याबाबत प्रकल्प अहवालात माहिती असावी.

**५) संभाव्य बाजारपेठ व विक्री–** ग्राहकाचा प्रतिसाद कसा प्राप्त केला जाईल, विक्रीचे टप्पे कसे असतील, कोणत्या तज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईल ही माहिती देवून अंदाजे ग्राहकाची संख्या, बाजारपेठेचा आकार, वाहतूकीची सुविधा, शैक्षणिक व मानसिक पार्श्वभूमी याचे स्पष्टीकरण प्रकल्प अहवालात असावे. त्याचप्रमाणे बाजारपेठ, बाजापेठेतील परिस्थिती, बाजारपेठेचे केलेले संशोधन, आकडेवारी व स्पर्धकांची अनुभव तसेच भुतकाळातील बाजारपेठेविषयी प्रसारित झालेली अधिकृत आकडेवारी याचे विश्लेषण प्रकल्प अहवालात महत्वपूर्ण असते.

**६) मनुष्यबळ –** उपक्रमासाठी किती व कोणत्या प्रकारचे मनुष्यबळ आवश्यक आहे. त्यांच्या नियुक्तीचे धोरण कसे असेल, त्यात प्रशासकीय व शारिरीक कार्यालयीन कामकाजाची विभागणी कशी असेल, निवड प्रक्रिया कशी राबविली जाईल. कामाचे वेळापत्रक कसे असेल, मजुरी व वेतनविषयक धोरण कसे असेल, याचे विवेचन प्रकल्प अहवालात महत्वपूर्ण असते.

**७) आर्थिक तपशिल –** प्रकल्पासाठी भांडवल उभारणी कशी केली जाईल. वित्त व्यवस्था काय असेल, बँक व वित्तीय संस्था तसेच अर्थतज्ञ यांचे सहकार्य कसे मिळवले जाईल, अर्थविनियोग करण्याची पध्दती कशी असेल, अधिकार कोणाला असतील, आर्थिक नोंदी कश्या ठेवल्या जातील, हिशेब तपासणी कशी केली जाईल या संदर्भात पारदर्शीपणा आवश्यक असतो म्हणून या संदर्भातील माहिती प्रकल्प अहवालात महत्वपूर्ण असते.

**७.२.४ नमुना प्रकल्प अहवाल**

**जळगाव जिल्ह्यातील केळी जागतिक पातळीवर प्रसिध्द आहेत.**

**१) वेफर्स**

**ओळख:–**सदरील प्रकल्प हा वेफर्स उत्पादित करण्याचा आहे. आपल्याकडील बाटाटे व केळीचे उत्पादन वाढते आहे. त्या प्रमाणात त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग बरेच कमी आहेत. वेफर्स हा खाद्यापदार्थ . टाईमपास स्नॅक्स म्हणून याचा वापर होतो. वेफर्स खपण्याचे प्रमाण सिनेमा हॉल, रेल्वे पॅट्री कार्स, प्रदर्शने, उद्याने इत्यादी ठिकाणी जास्त आहे.

**यंत्रसामग्री :–** वॉशिंग मशीन, स्लाईसिंग मशीन, बॅच फ्रायर्स, स्पाईस कोटिंग पॅन, वेइंग स्केल्स, मशीन स्पेअर्स, वॉटर ट्रिटमेंट प्लँट, सिलिंग मशीन, लॅब इक्विपमेंट. **प्रकल्प क्षमता :–** सादर प्रकल्पाची क्षमता ३०००००० किलोमिटर वर प्रक्रिया करण्याची आहे.

**लागणारा कच्चा माल :–** बटाटे, केळी, ऑईल, मीठ व मसाले

**उपयुक्तिके :–**

| | |
|---|---|
| वीज | –५ हॉर्स पॉवर |
| पाणी | –५ के. एल. |

**मनुष्यबळाची आवश्यकता :–**

| | |
|---|---|
| कुशल कामगार | ३ |
| अर्धकुशल | २ |
| अकुशल | २ |

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :–**

| | |
|---|---|
| जागा | रूपये ३,००,०००.०० |

**जागेच्या चिकासाचा खर्च :–**

| | |
|---|---|
| फेन्सिंग, लेव्हलिंग इतर | रूपये ५०,०००.०० |

**इमारतीची आवश्यकता :–**

| | |
|---|---|
| इमारत | रुपये ५,००,०००.०० |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता:**

| | |
|---|---|
| इमारत | १५,००,०००.०० |

**इतर स्थिर संपत्तीची आवश्यकता :–**

| | |
|---|---|
| ऑफिस फर्निचर | ३०,०००.०० |
| वर्कशॉप फर्निचर | ३०,०००.०० |
| **एकूण** | **६०,०००.००** |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,००,०००.०० |
| पक्का माल | ५०,०००.०० |
| उधारी | १,००,०००.०० |
| प्रत्यक्ष खर्च | २,००,०००.०० |
| **एकूण** | **४,५०,०००,००** |

**प्राथमिक व पूर्वउत्पादन खर्च :-**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवालाचा खर्च, मार्केट सर्व्हे, कयदा खर्व | २५,०००,०० |

**आकर्षक कच्चा मालाची आवश्यमता :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२,००,०००,०० |

**उपयुक्तिकांची आवश्यकता:-**

| | |
|---|---|
| वीज | ६०,०००.०० |
| पाणी | २४,०००.०० |
| इतर | ६०,०००.०० |
| **एकूण** | **१,४४,०००,००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कूशल | १,५०,०००.०० |
| अर्धकूशल | १,००.०००.०० |
| अकूशल | ५०,०००.०० |
| **एकूण** | **३,००,०००.००** |

**देखभाल व दुरूस्ती खर्च**

| | |
|---|---|
| इमारतीवर | २०,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | १,००,०००.०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ६,०००,०० |
| **एकूण** | **१,२६,०००.००** |

**घसाऱ्याचा खर्च :-**

| | |
|---|---|
| इमारतीवर | २०,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | १,००,०००.०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ६,०००,०० |
| **एकूण** | **१,२६,०००.००** |

**प्रशासकीय खर्च :-**

| | |
|---|---|
| वाहतूक | १,००,०००.०० |

| | |
|---|---|
| प्रवास | ६०,०००.०० |
| इतर | ३६,०००.०० |
| **एकूण** | **१,९६,०००.००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :-**

| | |
|---|---|
| जागा | ३,००,०००.०० |
| विकास खर्च | ५०,०००.०० |
| इमारत | ५,००,०००.०० |
| यंत्रसामग्री | १,५०,०००.०० |
| इतर स्थिर संपत्ती | ६०,०००.०० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २५,०००. ०० |
| **एकूण** | **२४,२५,०००.००** |
| खेळते भांडवल | ४,५०,०००.०० |
| **एकूण** | **२८,७५,०००.००** |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२,००,०००.०० |
| उपयुक्तिके | १,४४,०००.०० |
| वेतन व भत्ते | ३,००,०००.०० |
| देखभालव दुरूस्ती | १,२६,०००.०० |
| घसारा | १,२६,०००.०० |
| प्रशासकीय खर्ख | ३,००,०००.०० |
| व्याज | २,४४,०००.०० |
| **एकूण** | **२४,४०,०००.००** |
| **वार्षिक विक्री** | **२९,२८,०००.००** |
| **नफा** | **४,८८,०००.००** |

(उद्योजकमासिकातून)

## २)बडीसोप पॅकिंग

**ओळख :** सदरील प्रकल्प हा बडीसोपवर प्रक्रिया करण्याचा आहे. बडीसोप हा असा एक खाद्यपदार्थ आहे, की सर्वदूर बाजारात मिळतो व सर्व प्रकारच्या ग्राहकवर्गाची या उत्पादनासाठी मागणी असते. त्याचा आपण जेवल्यानंतर मुखशुध्दी म्हणून वापर करतो.

**यंत्रसामग्री :** रोस्टर, स्पाईस कोटिंग पॅन, पॅकिंग मशीन.

**प्रकल्प क्षमता :** सदर प्रकल्पाची क्षमता ही २५ किलोग्रॅम बडीसोप प्रक्रिया करण्याची आहे.

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळ्या क्वालिटीचा बडीसोप, मीठ, मॅथॉल, मसाले इत्यादी.

**उपयुक्तिके :**

| | |
|---|---|
| वीज | ५ हॉर्सपॉवर |
| पाणी | १ के . एल. |

**मनुष्यबळाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कुशल कामगार | २ |
| अर्धकुशल | २ |
| अकुशल | २ |

**यंत्रसामग्री मिळण्याचे ठिकाण :-**

मे. संजय एंटरप्रायझेस, ५७१, नारायणपेठ, पुणे,

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| जागा | ३०,०००.०० |

**जागेच्या विकासाचा खर्च :-**

| | |
|---|---|
| फेन्सिंग, लेव्हलिंग इतर | १५,०००.०० |

**इमारतीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| इमारत | २,००,०००.०० |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | २,००,०००.०० |

**इतर स्थिर संपत्तीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| ऑफिस फर्निचर | १०,०००.०० |
| वर्कशॉप फर्निचर | १५,०००.०० |
| **एकूण** | **२५,०००.००** |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ५०,०००.०० |
| पक्का माल | २७,०००.०० |
| उधारी | ५०,०००.०० |
| प्रत्यक्ष खर्च | १,००,०००.०० |
| **एकूण** | **२,२७,०००.००** |

| | |
|---|---|
| **प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च :-** | |
| प्रकल्प अहवालाचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १५,०००.०० |
| **वार्षिक कच्चा मालाची आवश्यकता :-** | |
| कच्चा माल | ६,००,०००.०० |
| **उपयुक्तिकांची आवश्यकता :-** | |
| वीज | ३६,०००.०० |
| पाणी | १८,०००.०० |
| इतर | ३०,०००.०० |
| **एकूण** | **८४,०००.००** |
| **मनुष्यबळाची आवश्यकता :-** | |
| कुशल | १,००,०००.०० |
| अर्धकुशल | ५०,०००.०० |
| अकुशल | ३०,०००.०० |
| **एकुण** | **१,८०,०००.००** |
| **देखभाल व दुरूस्ती खर्च :-** | |
| इमारतीवर | १०,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | २०,०००.०० |
| इतर स्थिती संपत्तीवर | २,०००.०० |
| **एकूण** | **३२,०००.००** |
| **घसाऱ्याचा खर्च :-** | |
| इमारतीवर | १०,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | २०,०००.०० |
| इतर स्थिती संपत्तीवर | २,०००.०० |
| **एकूण** | **३२,०००.००** |
| **प्रशासकीय खर्च :-** | |
| वाहतूक | ८०,०००.०० |
| प्रवास | ४०,०००.०० |
| इतर | ३०,०००.०० |
| **एकूण** | **१,५०,०००.००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :-**

| | |
|---|---|
| जागा | ३०,०००.०० |
| विकास | १५,०००.०० |
| इमारत | २,००,०००.०० |
| यंत्रसामग्री | २,००,०००.०० |
| इतर स्थिर संपत्ती | २५,०००.०० |
| प्राथमिक व पूर्वउत्पादन खर्च | १५,०००.०० |
| **एकूण** | **४,८५,०००.००** |
| खेळते भांडवल | २,२७,०००.०० |
| **एकूण** | **७,१२,०००.००** |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ६,००,०००.०० |
| उपयुक्तिके | ८४,०००.०० |
| वेतन व भत्ते | १,८०,०००.०० |
| देखभाल व दुरूस्ती | ३२,०००.०० |
| घसारा | ३२,०००.०० |
| प्रशासकीय खर्च | २,७५,०००.०० |
| व्याज | ८०,०००.०० |
| **एकूण** | **१२,८३,०००.००** |
| **वार्षिक विक्री** | **१५,३९,०००.००** |
| **नफा** | **२,५६,०००.००** |

**(उद्योजक मासिकातून)**

## ३)हॉटेल

**ओळख :-** सदरील प्रकल्प हा लॉजिक आणि बोर्डिंगचा आहे. आजकाल जसजसे माणसांचे आयुष्यमान व त्याचबरोबर दाडोई उत्पन्न वाढत आहे तसतसे तो पर्यटनाकडे आकर्षिला जात आहे. पर्यटन उद्योग येणाऱ्या काळामध्ये खूप मोठी संधी असणारा व्यवसाय म्हणून नावारूपास येत आहे. साधारण माणूस जेव्हा पर्यटनाच्या ठिकाणी लॉजिंगची सोय असावी असे अपेक्षित असते. जेव्हा पर्यटन स्थळी येतो तेव्हा तो प्रवासाने थकलेला असतो, तेव्हा त्या ठिकाणी लॉजिंग असलेच पाहिजे.

**लागणाऱ्या मूलभूत गरजा :-**

| | |
|---|---|
| जागा | १ एकर |
| वीज | ७० हॉर्सपॉवर |
| पाणी | ५००० के. एल. |

**मनुष्यबळाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कूशल कामगार | १२ |
| अर्धकूशल कामगार | १८ |
| अकूशल | १५ |

**लागणारी यंत्रसामग्री :-**

टीव्ही, एअर कंडिशनर, व्हेकल्स, डीप फ्रीजर इत्यादी.

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| जागा | ५,००,०००.०० |

**जागेच्या विकासाचा खर्च:-**

| | |
|---|---|
| फेन्सिंग, लेव्हलिंग इतर | १,५०,०००.०० |

**इमारतीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| इमारत | २०,००,०००.०० |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ३०,००,०००.०० |

**इतर स्थिर संपत्तीची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| ऑफिस फर्लिचर | २,००,०००.०० |
| वर्कशॉप फर्निचर | ५,००,०००.०० |
| इतर | ५,००,०००.०० |
| **एकूण** | **१२,००,०००.००** |

**प्रकल्पाला लागणाऱ्या खेळत्या भांडवलाची आवश्यकता :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १,००,०००.०० |
| पक्का माल | २,००,०००.०० |
| उधारी | १०,०००.०० |
| प्रत्यक्ष खर्च | २,५०,०००,०० |
| **एकूण** | **६,५०,०००.००** |

| | |
|---|---|
| **उपयुक्तिकांची आवश्यकता :-** | |
| वीज | ६,००,०००.०० |
| पाणी | १,००,०००.०० |
| इतर | ५०,०००.०० |
| **एकूण** | **७,५०,०००.००** |
| **मनुष्यबळाची आवश्यकता :-** | |
| कुशल | २,२५,०००.०० |
| अर्धकूशल | १,७५,०००.०० |
| अकूशल | १,००,०००.०० |
| **एकूण** | **५,००,०००.००** |
| **प्रशासकीय खर्च :-** | |
| व्यवस्थापक | ३,००,०००.०० |
| पर्यवेक्षक | २,००,०००.०० |
| वॉचमन | ६०,०००.०० |
| **एकूण** | **५,६०,०००.००** |
| प्रवास खर्च | ३६,०००.०० |
| वाहतूक खर्च | ६०,०००.०० |
| इतर खर्च | १,००,०००.०० |
| **एकूण** | **१,९६,०००.००** |
| **देखभाल व दुरूस्ती खर्च :-** | |
| इमारतीवर | २,००,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | ३,००,०००.०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १,२०,०००.०० |
| **एकूण** | **६,२०,०००.००** |
| **घसाऱ्याचा खर्च :-** | |
| इमारतीवर | २,००,०००.०० |
| यंत्रसामग्रीवर | ३,००,०००.०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १,२०,०००.०० |
| **एकूण** | **६,२०,०००.००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :-**

| | |
|---|---|
| जागा | ५,००,०००.०० |
| जागा विकास खर्च | १,५०,०००.०० |
| इमारत | २०,००.०००.०० |
| यंत्रसामग्री | ३०,००,०००.०० |
| इतर स्थिती संपत्ती | १२,००,०००.०० |
| प्राथमिक व पूर्वउत्पादन खर्च | २,००,०००.०० |
| **एकूण** | **६०,५०,०००.००** |
| खेळते भांडवल | ६,५०,०००.०० |
| **एकूण** | **६७,००,०००.००** |

**प्रकल्पाचे वित्तीय व्यवस्थापन :-**

| | |
|---|---|
| स्वत:चे | १९,२५,०००.०० |
| बँकचे कर्ज | ५७,७५,०००,०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :-**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २४,००,०००.०० |
| उपयुक्तिके | ७,५०,०००.०० |
| वेतन व भत्ते | ५,००,०००.०० |
| प्रशासकीय खर्च | ७,५६,०००.०० |
| देखभाल व दुरूस्ती | ६,२०,०००.०० |
| घसारा | ६,२०,०००.०० |
| व्याज | ७,२१,०००.०० |
| **एकूण** | **६३,७०,०००.००** |
| विक्री | ८५,३९,०००.०० |
| **नफा** | **२१,६९,०००,००** |

**(उद्योजक मासिकातून)**

## ७.३ परिभाषिक शब्द

## ७.४ स्वयं अध्ययन प्रश्न

प्रश्न १ : प्रकल्प अहवाल म्हणजे काय?

प्रश्न २ : प्रकल्प अहवालाचे महत्व थोडक्यात स्पष्ट करा?

प्रश्न ३ : प्रकल्प अहवालातील घटक विशद करा?

प्रश्न ४ : नमुना प्रकल्प अहवाल थोडक्यात सादर स्पष्ट करा?

## ७.५ सारंश

## ७.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १ : प्रकल्प अहवालाचे महत्व स्पष्ट करा?

प्रश्न २ : प्रकल्प अहवाला आणि त्याची व्याप्ती सविस्तर वर्णन करा?

प्रश्न ३ : प्रकल्प अहवालातील घटक सविस्तर लिहा?

प्रश्न ४ : प्रकल्प अहवालाचा नमुना तयार करा?

## ७.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. येवले, अरून; सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरविंद (२०१०) उद्योजकता विकास, जळगांव: प्रशांत पब्लिकेशन.

२. कडवेकर, व्ही. रावळ, सी. ए. आणि कोठावदे, आर. (२००५) व्यवसायिक उद्योजकता, पुणे : डायमंड बुक डेपो

३. कडवेकर, व्ही.; आणि कोठावदे, आर. (२००७) व्यवसायिक उद्योजकता-३, पुणे : डायमंड बुक डेपो

**4.Khan M.A, (1992) Entrepreneurial in India, New Delhi: Kanishka Publishing House**

**5.Khanka, S.S.(2001) Entrepreneurship Develo[ment, New Delhi: S.Chand & Co.**

घटक ८

नोंदणी प्रक्रिया

# Registration Procedure

अनुक्रमणिका

८.० उदिष्टे

८.१ प्रास्तावना

८.२ विषय विवेचन

- ८.२.१ नोंदणीचे टप्पे
- ८.२.२ नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे
- ८.२.३ जिल्हा उद्योग केंद्र
- ८.२.४ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
- ८.२.५ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ
- ८.२.६ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ
- ८.२.७ महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक सल्लागार संघटना

८.३ परिभाषिक शब्द

८.४ स्वयं अध्ययन प्रश्न

८.५ सारंश

८.६ सरावासाठी स्वाध्याय

८.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ८.० उदिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला...........

- ❖ नोंदणी प्रक्रिया व त्याचे टप्पे स्पष्ट करता येईल.
- ❖ नोंदणीसाठी लागणारे कागदपत्राची माहिती देता येईल.
- ❖ जिल्हा उद्योग केंद्राचे वर्णन करता येईल.
- ❖ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची माहिती देता येईल.
- ❖ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडाळाची माहिती नमुद करता येईल.
- ❖ महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक सल्लागार संघटनेचे कार्य सांगता येईल.

## ८.१ प्रस्तावना

नवीन उद्योजकांना उद्योग सूरू करतांना उद्योगाची नोंदणी करणे गरजेचे असते कारण सारकारच्या उद्योग धोरणानुसार उद्योगासाठी असलेल्या नवनवीन योजनांचा लाभ घेणे, सवलती मिळविणे, परवानग्या घेणे, भांडवल उभारणी, कच्चामाल, यंत्रसामुग्री, विविध सेवा व सोयी मिळविणे इत्यादी सर्व गोष्टी मिळविण्यासाठी **उद्योजकाला नोंदणीची वेळोवेळी गरज पडते. त्याशिवाय या सोयी-सवलती मिळत नाही.**

## ८.२ विषय विवेचन

### ८.२.१ नोंदणीचे टप्पे (Stages Involved Registration)

उद्योजकांना उद्योगाची नोंदणी करतांना ज्या प्रक्रियेतून जावे लागते आणि त्यासाठी ती कागदपत्रे लागतात त्याबाबतची माहिति खालीलप्रमाणे आहे.

### नोंदणीचे टप्पे (Stages Involved for Registration)

उद्योग निवडीनंतर उद्योजकाला त्याच्या उद्योगाची नोंदणी करून घ्यावी लागते. राज्य औद्योगिक संचालकांकडे रीतसर उद्योगाची नोंदणी म्हणजे उद्योगासाठी लागणारे अर्थसाहाय्य, हप्त्याने घ्यावयाची यंत्रसामग्री, आयात कच्चामाल, विघुतपुरवठा, औद्योगिक साहतीमधून जागा, कामगारांचे प्रशिक्षण इत्यादी सर्व सुविधा उपलब्ध करणे सोयीचे जाते. त्याचप्रमाणे **उद्योगा कायदेशीर अस्तित्व प्राप्त होण्याच्या दृष्टीने उद्योगाची नोंदणी करणे आवश्यकच आहे.** तात्पुरती नोंदणी आणि कायम स्वरूपी नोंदणी असे नोंदणीचे दोन प्रकार आहेत.

### ब) तात्पुरती नोंदणी

जिल्हा उद्योग केंद्राकडून तात्पुरत्या नोंदणीचे प्रमाणपत्र अर्ज सादर केलेल्या तारखेपासून ७ दिवसात मिळते. तात्पुरत्या नोंदणीमुळे आपला प्रकल्प अस्तित्वात येतो व तात्पुरत्या नोंदणी प्रमाणतत्राच्या आधारे कच्चामाल आयात करण्यासाठी किंवा अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी विविध प्रकारे अर्ज करण्यास उद्योजक पात्र ठरतो. **तात्पुरत्या नोंदणीची मुदत ६ महिने असते.** पण त्या कालावधीत प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी काही समस्या उद्‌भवल्यास तात्पुरत्या नोंदणीची मुदत १ वर्षांपर्यत वाढवून मिळू शकते.

यासठी प्रकल्पाची उभारणी योग्य व समाधानकारक आहे याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची खात्री पटावी लागते. तात्पुरत्या नोंदणीमुळे उद्योजकास पुढील गोष्टी करता येतात.

१ औद्योगिक वसाहतीमधील शेड किंवा बांधकाम साहित्या मिळविणे.

२ शेड बांधण्यास स्थानिक अधिकाऱ्यांची परवानगी मिळविणे.

३ वीज पुरवठा, पाणी परवानगी, पाणी पुरवठा, टेलीफोन इत्यादीची सोय घेता येते.

४ अर्थसाहाय्य, हप्त्याने यंत्रसामग्री घेता येते आणि कच्चामाल आयात करता येते.

५ खेळत्या भांडवलाची तरतुद करता येते व विक्रीकर, अबकारीकर यांचे क्रमांक घेता येते.

**ब कायम स्वरूपी नोंदणी**

कारखान्याची इमारत, विद्युत पुरवठा, यंत्रसामग्री इत्यादी गोष्टींची पुर्तता झाल्यानंतर कायम स्वरूपी नोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येतो. अर्ज कार्यालयात दाखल झाल्यानंतर सक्षम अधिकारी अर्जदारास त्याच्या उद्योगाची तपासणी करण्याची तारीख व वेळ कळवितात. ठरल्याप्रमाणे **तपासणी केल्यावर आणि ती कारखाना उत्पादनक्षम आहे त्याची खात्री पटल्यावर उद्योजकास कायम नोंदणी प्रमाणपत्र मिळते.**

## नोंदणीची पध्दती (Registration Process)

आपल्या उद्योगांची नोंदणी करण्यासाठी उद्योजकाने खालील गोष्ट करणे आवश्यक आहे.

१) प्रथम जिल्हा उद्योग केंद्राच्या अधिकाऱ्यांकडून किंवा स्थानिक अधिकाऱ्यांकडून किंवा राज्य औद्योगिक संचालकांकडून ४ कोरे अर्ज मिळवावेत .

२) आणलेला अर्ज पूर्ण तपशिलायह भरावा.

३) भरलेल्या अर्जाच्या २ प्रती स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत राज्य औद्योगिक संचालकांकडे पाठवाव्यात.

४) अर्जाची एक प्रत स्थळप्रत म्हणून त्यावर सक्षम अधिकाऱ्याची अर्ज मिळाल्याची सही घऊन आपल्या कार्यालयात ठेवावी व उरलेली एक प्रत वेळप्रसंगी उपयोगासाठी म्हणून ठेवावी.

५) राज्य औद्योगिक संचालकांकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळेपर्यंत अर्जाचा पाठपुरावा करावा.

६) संबंधित अधिकाऱ्याने वेळोवेळी केलेल्या सुचनेप्रमाणे योग्य त्या दूरूस्त्या करून द्याव्या.

७) गरज भासल्यास संबंधित अधिकाऱ्याशी वेळोवेळी चर्चा करावी.

८) कोणत्याही दबावाला, दडपणाला बळी न पडता, इतरांवर दबाव न आणता उद्योगाचा नोंदणी क्रमांक व प्रमाणतत्र मिळावावे.

वरील सर्व गोष्टी अतिशय शांतपणे व संयमाने करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पुर्ण करणे म्हणजे उद्योगाच्या यशाची पहिली पायरी होय.

दुय्यम उद्योजकांनी राज्य औद्योगिक संचालकांकडे नोंदणी करावीत पण त्याचबरोबर लघुउद्योग विकास संघटनेकडेही नोंदणी केल्यास त्याचे अनेक फायदे मिळतात.

ज्या उत्पादनासाठी पूर्वीच नोंदणी प्रमाणपत्र घेतलेले आहे. त्या उत्पादनात वाढ करून कारखान्याचा विस्तार करावयाचा असेल तर त्यासाठी नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. मात्र चालू उत्पादनाच्या ऐवजी नव्या वस्तूचे उत्पादन करावयाचे असल्यास उद्योजकाने नवीन नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधणकारक आहे. त्याचप्रमाणे चालू उत्पादनात काही दुरूस्ती करावयाची असेल तर संबंधित स्थानिक अधिकाऱ्यांना तसे कळविले पाहीजे व त्याची परवानगी घेतली पाहीजे.

**उद्योगाच्या नोंदणीसाठी गोळा करावयाची माहिती**

१) उद्योग ज्या जागेत सुरू करावयाचा आहे किंवा सुरू केलेला आहे तिथे पत्त्यासह ठळक अक्षरातील बोर्ड असावा.

२) उद्योगाची जागा अर्जदाराच्या ताब्यात असल्यासचा पुरावा .

३) उद्योगाची जागा बिगरशेती केल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र.

४) उद्योगास वीज पुरवठा व आवश्यक ती पॉवर मंजूर केल्याचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादीत मंजूरीपत्र.

५) पाणीपुरवठा परवाणगी दिल्याचा दाखला.

६) उत्पादन करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र.

७) उद्योग भागीदारी, मर्यादीत कंतनी, सहकारी तत्वावरील असेल तर त्याबाबतची कायदेशीर पूर्तता झाली. असल्याचा पुरावा.

८) विशिष्ट प्रकारचे उत्पादन असेल उदा. स्पिरीट, औषध वगैरे तर त्या त्या शासकीय विभागाचे ना हरकत पमाणपत्र.

९) नोंदणी अर्जातील सर्व तपशीलबरोबर असल्यासबाबत सक्षम व्यक्तीची सही असलेली स्थळ प्रत.

१०) इतर आवश्यक गोष्टी इत्यादी.

व्यवसाय संस्थेच्या नोंदनीसाठीचा अर्ज व्यवस्थित भरलेला असेल व ना हरकत प्रमाणपत्र रीतसर असेल तर नोंदणी अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केल्या पासून साधारणपणे १५ दिवसात अस्थायी नोंदणी मिळते. स्थायी नोंदणी मिळण्यास एक महिन्याचा कालावधी लागतो. अस्थायी नोंदणीच्या संदर्भात नियोजित कारखान्याच्या आवारात भेट देण्याची बिलकूल

## ८.२.२ नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे (Documents Required for Registration)

**उद्योगाची प्रत्यक्ष सुरूवात सरण्याठी उद्योतकाला उद्योजकाला अनेक प्रकारच्या कागदपत्रांची पुर्तता करावी लागते.** शासनाकडून वेगवेगळ्या परवानग्या घेण्यासाठी, बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज घेण्यसाठी, उद्योगाच्या नोंदणीसाठी विभागीय महामंडळाकडून मदत मिळविण्यासाठी, पाणी, वीज, टेलिफोन इत्यादी सेवा तातडीने मिळविण्यासाठी यासारख्या असंख्य कारणांसाठी उद्योजकाला असंख्य कागदपत्रांची जमवाजमव करावी लागते. काही कार्यालयात कागदपत्रांच्या चार प्रती मागतात, तर काही ठिकाणी सात प्रती मागतात. त्यामुळे उद्योजकाने कागदपत्रांची जमवाजमव करतांना खालील गोष्टी कटाक्षाने पाळाव्यात.

१) मूळ कागदपत्रांची (Original Documents) सुरक्षित ठेवण्यासाठी एक उत्कृष्ट दर्जाची फाईल करावी व ती आपल्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवावी.

२) मूळ कागदपत्रांची उपलब्ध होताच मूळ कागदपत्र सुरक्षित फाईलमध्ये ठेवून लॉकर बंद करावा.

३) झेरॉक्स प्रती काढून ठेवण्याचा कंटाळा करू नये किंवा खर्च फारच होतोय म्हणून टाळाटाळही करू नये.

४) निरनिराळ्या कार्यालयांना भेटी देतांना झेरॉक्स प्रतींची फाईल प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून नेहमी सोबत घ्यावी म्हणजे अर्ज देत असतांना तातडीने पाहिजे त्या कागदपत्रांच्या प्रती जोडता येतात.

५) कागदपत्रांचे जतन व्यवस्थित करावे. तिला कोणत्याही प्रकारे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.

६) सुरक्षित फाईलमध्ये कागदपत्रे ठेवताना त्याला क्रमांक टाकण्याचे व त्याची एक यादी स्वतंत्रपणे करून (दोन ते तीन प्रतीत) ठेवण्याचे अजिबात विसरू नये.

७) केलेल्या यादीची एक प्रत घरी, एक प्रत कार्यालयात, एक प्रत सुरक्षित फाईल ठेवावी. म्हणजे कोणत्याही कारणाने एखादे कागदपत्र गहाळ झाल्यास, चोरीला गेल्यास ते आपल्या चटकन लक्षात येईल.

८) कागदपत्रांची जमवाजमव व पूर्तता करतांना पूर्णपणे संयमाने न चिडता शांतपणे केली पाहीजे.

उद्योजकाला ज्या विविध प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करावी लागते ती खालीलप्रमाणे आहेज.

**(१) अत्यंत महत्वाची कागदपत्रे**

**१) शैक्षणिक पात्रतेसंबंधी कागदपत्रे**

एसएससी, एचएससी, आयटीआय, परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे व पुढिल पदवी, पदव्युत्तर किंवा पदविका प्रमाणपत्र व त्याच्या प्रती.

**२) जन्मतारखेचा पुरावा**

शाळा सोडल्याचा किंवा सक्षम अधिकाऱ्याचा जन्मतारखेचा दाखला.

**३) सुशिक्षित बेकार पुरावा**

विनिमय केंद्राचे वैध पत्रक (Valid Empliyment Exchange Card) किंवा स्थानिक अधिकाऱ्याचा ( सरपंच इत्यादी ) दाखला.

**४) उत्पन्नचा दाखला**

आपल्या पालकांचे उत्पन्न वार्षिक रू. २०,०००/- च्या आत असल्यास अर्जात नोंदविलेल्या पालकाच्या नावाचा मे.तहसिलदार/मे. मामलेदार यांनी सही केलेला शिक्क्यासहित दाखला.

**५) मागास जातीचा पुरावा**

उद्योजक स्वत: मागासवर्गीय (*ST*), अनुसूचित जाती-जमाती किंवा भटक्या विमुक्त जमाती*(NT)* मधील असल्यास मा तहसिलदार/मा. मामलेदार यांचा जातीचा दाखला.

**६) उद्योजकाच्या स्थानाचा पुरावा**

शिधापत्रिकेची फोटो कॉपी झेरॉक्स ,ओळखपत्र आणि दीर्घकाळ रहिवासी असल्याचा पुरावा सांगणारी भाडेपावती किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची कर पावती.

**७) अनुभवाची कागदपत्रे**

उद्योजक पूर्वी नोकरीत असल्यास सेवेचा व कामाच्या स्वरूपाचा संस्थेचा दाखला. तांत्रिक सल्लागार म्हणून काम केले असल्यास तसा दाखला.

**८) प्रकल्प अहवाल**

उद्योजकाला उद्योग सुरू करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करावा लागतो.

**९) ना हरकत प्रमाणपत्रे/दाखले**

ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद यांना ना हरकत प्रमाणपत्र/ दाखले सादर करावे लागतात. त्यांत अन्न आणि औषध नियंत्रक ना हरकत प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ना हरकत प्रमाणतत्र, सहकारी संस्था निबंधकाचे ना हरकत प्रमाणपत्र इत्यादीचा समावेश होतो.

**१०) वाहन चालक-परवाना**

पक्क्या ड्रायव्हिंग लायसेन्सची सर्व पृष्ठांची खरी नक्कल व आर. टी. ओ. परमिटची खरी नक्कल.

**११) विमा**

उद्योजकाचा विमा उतरविला असल्यास प्रीमीयम भरल्याच्या अलीकडच्या पावतीची नक्कल.

**१२) वास्तव्य दाखला**

महाराष्ट्रबाहेरील जन्म असल्यास १५ वर्षे महाराष्ट्रात वास्तव्य असल्याचा सक्षम अधिकाऱ्याचा दाखला.

**१३) जागा**

जागेच्या मालकीबाबत पुरावा. संमतीपत्र, भाडेपावती किंवा ७/१२. उतारा

**१४) उद्योग नोंदणी**

उद्योगाच्या अस्थायी किंवा स्थायी (temporary or Permament) नोंदणीचा दाखला.

**१५) अन्य**

डायरेक्टर जनरल ऑफ कमर्शिअल इंटेलिजन्स ॲड स्टॅटिस्टिक्स (DGCIS), ट्रेड डेव्हलपमेंड ॲथॉरिटी यांचेकडील नोंदणीप्रत.

**(२) उद्योगाच्या जागेच्या संदर्भातील कागदपत्रे**

१) फ्रीहोल्ड जागेचा किंवा कारखान्याची इमारत भुईभाड्याच्या जागेवर बांधण्यात येणार असेल तर भुईभाडे कराराच्या प्रती.

२) स्वत:च्या मालकीची जागा असल्यास ७/१२, सिटी सर्वेच्या उतारा प्रती.

३) फॅक्टरीची इमारत बांधावयाची असल्यास स्थापत्य शास्त्रज्ञाने काढलेला व जिल्हाधिकारी वा टाऊन प्लॅनिंगच्या सक्षम अधिकाऱ्याने मजूंर केलेला नकाशा, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक (Plan & Esimate) आणि त्याच्या किंमतीबाबतचे आर्किटेक्टचे प्रमागपत्र, आर.सी.सी. कन्सल्टंटने काढलेल्या व सही केलेल्या आर.सी.सी. डिझाईनचा नकाशा.

४) लागू असेल त्यानुसार महानगरपलिका/ग्रामपंचायत/अन्न आणि औषध नियंत्रक यांच्या प्रसधिकाऱ्यांनी मंजूर केलेले इमारतींचे आराखडे.

५) आवश्यकता असल्यास कारखाना निरीक्षकांनी आराखड्यांना दिलेले मंजुरीपत्र.

६) अर्बन लँउ सीलिंन रेग्युलेशन कायदा १९७६ च्या कलम २७ (२) नुसार जमीन, फॅक्टरी तारण ठेवण्याबाबत व कलम २० मधून सूट मिळण्याबाबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेली परवानगी किंवा २६ व्या कलमानुसार नोटिसीला सक्षम अधिकाऱ्याने दिलेली पोच.

७) जागा भाड्याने असेलतर भाडेपावती किंवा करारनामा प्रत आणि मालकाची जागा सुरू करत असलेल्या उद्योगासाठी, उत्पादन, व्यवस्थापनासाठी वापरण्यास परवानगी वा संमती दिलेल्या अधिकृत संमतीपत्र.

८) जागा खरेदी करणार असल्यास नोंदणीकृत साठेखताची खरी नक्कल.

९) खरेदीखताची प्रत.

१०) उद्योगास आवश्यक त्याप्रमाणे इलेक्ट्रिफिकेशन, वायरिंग केल्याबाबतचे नोंदणीकृत किंवा लायसनधारक इलेक्ट्रिक इंजिनिअरचे प्रमाणपत्र.

११) उद्योगाच्या आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठ्याची सोय, प्लंबिंग पूर्ण केल्याचे लायसन-होल्डर प्लंबरचे प्रमाणपत्र.

१२) उद्योगाच्या आवश्यकतेप्रमाणे सांडपाणी आणि इतर टाकाऊ गोष्टींची योग्य ती विल्हेवाट लावण्यासाठी केलेल्या ड्रेनेजच्या पूर्ततेबाबतचे लायसन होल्डरचे प्रमागपत्र.

**(३) यंत्रसामग्री संदर्भातील कागदपत्रे**

१) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडाच्या अर्जातील अनुसुची ड१ व ड२ नुसार अस्तित्वात असलेल्या व खरेदी करावयाच्या यंत्रसामग्रीची संपूर्ण यादी.

२) खरेदी करायच्या यंत्रसामग्रीच्या पुरवठादारांचे दरपत्रक, त्यांचा पत्ता व वस्तूच्या दर्जाबाबत माहिती:(किमान तीन वेगवेगळ्या पुरवठादारांकडून ही पत्रे घेतलेली असावीत.)

३) आयात करायच्या व केलेल्या यंत्रसामग्रीच्या बाबतीत आयात परवाना पत्राच्या प्रती.

४) तंत्रज्ञान आयात परवाना प्रती.

**(४) कच्चामालाच्या पुरवठा हमीबाबत कागदपत्रे**

१) महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास संस्थेचे (MISSIDC)कच्चामाल पुरवठ्याबाबतचे हमीपत्र.

२) बाजारपेठेतील इतर पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांची यादी व संमतीपत्र.

३) आयात करावयाचा किंवा केलेल्या कच्चामालाच्या संदर्भात आयात परवान्याच्या प्रती.

**(५) पक्क्यामालाच्या विक्रीबाबतची हमीपत्रे**

१) महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास संस्थेचे(MISSIDC) पक्क्यामालाच्या विक्रीबाबतचे हमीपत्र.

२) बाजारपेठेतील इतर विक्रेते, त्यांचे पत्ते व हमीपत्रे किंवा अन्य विक्री व्यवस्था केली असल्यास त्याची माहिती.

३) निर्यात करावयाच्या किंवा केलेल्या पक्क्यामालाच्या संदर्भात निर्यात परवाना पत्राच्या प्रती.

४) डायरेक्टोरेट  जनरल ऑफ सप्लाइज अॅन्ड डिस्पोझल्स यांचे हमी पत्र.

**(६)  उद्योग संघटन प्रकाराबाबतची कागदपत्रे**

१) एक व्यक्ती संघटन प्रकार असेल तर शॉप अॅक्ट, फॅक्टरी अॅक्ट व अन्य कायद्यान्वये दिलेली परवाना प्रत.

२) उद्योग भागीदारी असेल तर भागीदारी करारचा दस्तऐवज प्रती व त्याच्या नोंदणीच्या प्रती.

३) उद्योग कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेल्या असल्यास .

अ) खाजगी मर्यादित कंपनी असेलतर कंपनी  रजिष्ट्रारचे मान्यता पत्र, भागधारकांची पत्तासहित यादी व त्यांनी गुतंविलेले भांडवल, अध्यक्ष व कार्यकारी संचालकांची निवड या नेमणूक केलेल्या ठरावाच्या प्रती.

ब) सार्वजनिक मर्यादित कंपनी असल्यास अध्यक्ष व कार्यकारी संचालकांनी अद्ययावत म्हणून प्रमाणित केलेल्या मेमोरॅडम ऑर्टिकल्स ऑफ असोसिएशनची प्रत. कंपनी रजिष्ट्रारचे परवाना पत्र व सर्टिफिकेट ऑफ इनकार्पोरेशन.

क) सहकारी असल्यास-स्थापना, कामकाजाचे क्षेत्र व अधिनियमावली, सहकारी संस्था निबंधकाचे ना हरकत प्रमाणपत्र व महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाकडून महाराष्ट्र सहकारी कायद्याच्या कलम ४३ आणि ४५, त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम ४६ (अ) मधून सूट दिलेले आज्ञान आणि कार्यकारी संचालक किंवा अध्यक्षांची नेमणूक करण्याचा संस्थेची ठराव प्रत.

**(७) वित्तीय व्यवस्थेबाबतची कागदपत्रे**

१) एकूण  भंडवल  गुंतवणुकीतील स्वत:चा हिस्सा दर्शविणारे अधिकृत पत्र.

२) कर्ज उभारण्याबाबतचे अधिकार, ठराव (एका व्यक्ती व्यवसाय सोडून सामूहिक उद्योजकतेच्या सर्व प्रकारांना)

३) रूपये २० च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्रक (Affidavit) कर्ज मागणी अर्जातील नमुन्याप्रमाणे.

४) बँकेतील चालू खाते व त्यावरील शिलकेबाबतचा, सह्यांचे अधिकारी कोणाला दिलेत त्याबाबतचे बँकेचे पत्र.

५) उद्योग घटकाला बँकांनी यापूर्वीच विविध पतीसुवीधा  मंजूर केलेल्या पत्राच्या प्रती.

६) मागील तीन वर्षाचे लेखापरीक्षण केलेले (Audited) उत्पादन व व्यापार खाते, नफा-तोटा विनियोजन लेखे व ताळेबंदाच्या प्रती. किंवा हिशोबपत्रक सादर केलेल्या नवीन

वर्षातील सहा महिन्याच्या कालावधी लोटला असल्यास या कालावधीसाठीची तात्पुरतीची (Provisional) हिशेबपत्रके किंवा उद्योग नवीन असल्यास पण तात्पुरतीची हिशेब पत्रके.

७ ) नवीन वर्षासाठी प्राप्तीकर, संपत्तीकर, निपटारा प्रमाणपत्राची प्रत आणि मागील ३ वर्षाच्या प्राप्ती व निर्धारणाच्या प्रती.

**(८) इतर कागदपत्रे**

१) बँक, वित्तीय संस्था किंवा शासनाकडून अर्थपुरवठा घ्यावयाचा असेल तर प्रत्येकाचे अर्जाचे नमुने वेगवेगळे असतात. त्याची पूर्तता केली पाहिजे.

२) महामंडळाकडे (MSFC) अर्थसाहाय्य मागण्यास आलेल्या खाजगी वा सार्वजनिक मर्यादित कंपन्याची कार्यालये महाराष्ट्र राज्याच्या बाहेर असल्यास ती महाराष्ट्र राज्यात स्थानांतरित करावी लागतील व त्यासाठी उच्च न्यायालयाने दिलेल्या परवानगीची प्रमाणीत प्रत.

३) महामंडळाकडून हव्या असलेल्या कर्जाची रक्कम पाच लाख रूपयांपेक्षा जास्त असणाऱ्या नवीन प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्प अहवाल लागतो.

४) वीज कनेक्शनसाठीची परवानगी आपल्या उद्योगास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ना हरकत दाखला घेतल्याशिवाय मिळत नाही.

५) आवश्यक त्या ठिकाण जिल्हा उद्योग केंद्राकडून आपल्या उद्योगास मंजूर घ्यावी लागते त्याचे पत्र.

**कागदपत्रांबाबत घेण्याची काळजी**

१) कोणाकडेही अर्ज करावयाचा असेलतर संपूर्णपणे, सुवाच्य अक्षरात भरलेला किंवा टंकलिखित (संगणकलिखित प्रत) असावा. सोबत प्रकल्प अहवालाची प्रत जोडून पाठवावयास विसरू नये.

२) अर्जावर दिनांक, जावक क्रमांक, स्वाक्षरी व शिक्का असणे अत्यंत आवश्यक असते.

३) आपल्या प्रकरणाशी संबंधीत कागदपत्रे फक्त जोडवीत. अन्य कागदपत्रांची जर मागणी केली तरच ती सादर करावीत.

४) कागदपत्रांची खरी नक्कल अथवा झेरॉक्स प्रत असल्यास ती शासकीय राजपत्रित अधिकारी किंवा उद्योग केंद्रांचे अधिकारी, निरीक्षक यांनी प्रमाणित केलेली असावी.

५) वरील कागदपत्रांव्यतीरीक्त अर्जाची छाननी करताना आपल्या उद्योगानुसार काही जास्तीची कागदपत्रे आवश्यक असतील तर कार्यालयाकडून मागणी केल्यानंतरच सादर करावीत.

६) प्रत्येक कार्यालयाला केलेल्या अर्जाचा व त्याला जोडलल्या कागदपत्रांचा एकत्रित संच ऑफिसकॉपी म्हणून सही घेऊन ठेवावा म्हणजे त्याचा मागोवा घेणे/करणे सोपे जाते.

### ८.२.३ जिल्हा उद्योग केंद्र (DIC) (District Industries Centres)

औद्योगिक विकासातील असमतोल दुर करण्याच्या हेतूने १९७७ च्या औद्योगिक धारेणातील तरतूदीनुसार तत्कालीन श्रममंत्री मा. जॉज फर्नांडीस यांनी लघु उद्योग विकासाच्या दृष्टीने **जिल्हा उद्योग कार्यक्रम १ मे, १९७८ पासून केंद्र सरकारने अंमलात आणला.** लघु, मध्यम आणि कुटीर उद्योग क्षेत्रातील उद्योगांना चालना देणे, अधिकाधिक रोजगार संधी निर्माण करणे, ग्रामीण व मागास भागाचा विकास घडवून आणणे या प्रमुख उद्देशाने भारत सरकारने राज्य सरकारच्या मदतीने हा कार्यक्रम सुरू केला. त्यानुसार देशातील ४३१ जिल्ह्यासाठी सुमारे ४२२ जिल्हा उद्योग केंद्रे स्थापन करण्यात आलेली
आहे. जिल्हा उद्योग केंद्राचा खर्च केंद्र व राज्य सरकार यांच्यात विभागला जातो.

या केंद्रामार्फत उद्योजकांना उद्योग स्थापन करण्यासाठी गुंतवणूकीनंतरच्या अवस्थेत सहकार्य केले जाते. १९८८ मध्ये या कार्यक्रमाचे परिशीलन करण्यात आले. नमुना अभ्यासासाठी ५५ जिल्हा उद्योग केंद्रे निवडण्यात आली. जिल्हा उद्योग केंद्राच्या रचनेत आणि कार्यवाहीत अनेक गुणदोष दिसून येतात. परंतू शासकीय धोरणाचा पाठ पुरावा करून ग्रामीण व मागास भागात औद्योगिक वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हा उद्योग केंद्र ही एक चांगली यंत्रणा निर्माण झाली आहे.

उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली. **या केंद्रामार्फत मार्गदर्शनाबरोबर प्रकल्प तयार करणे, अनुदान देणे, विविध योजना राबविणे यासारखी कामेही केली जातात. सर्वात महत्वाचे म्हणजे जिल्हा उद्योग केंद्र उद्योजकांना बीज भांडवल पुरविण्याचे काम करते.**

**जिल्हा उद्योग केंद्राची उदिष्ट्ये (Objectives of DIC)**

राज्यातील मागास, आद्योगिकदृष्ट्या अपेक्षित व दुर्लक्षित भागात विशेषत: लघुउद्योगांच्या विकासासाठी जिल्हा उद्योग केंद्रांची कामे, विकास आणि संघटना ही खालील उद्दिष्ट्ये पुर्ण करण्यासाठीचा दृष्टीकोन ठेवून कार्यरत आहे.

१) महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासात लघुउद्योगाच्या सहभागाचा अभ्यास करून जिल्ह्यातील लघुउद्योगाच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२) लघुउद्योगाच्यां विकासासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांचा मागोवा घेणे.

३) जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

४) कुटिर उद्योगांच्या विकासासाठी विविध प्रकारे प्रयत्न करणे.

५) जिल्ह्यातील लघुउद्योग व कुटिर उद्योगातून रोजगार संधी निर्माण करणे.

६) लघुउद्योगांच्या विकासातील समस्यांचा शोध घेऊन त्या दूर करण्यासाठी महत्वाची भुमिका पार पाडते.

७) नवीन उद्योजकांना आवश्यक माहिती, मार्गदर्शन व मदत एकाच केंद्राद्वारे आणि एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे.

८) लघुउद्योगाच्या बरोबर कुटिरोद्योग व ग्रामोद्योगाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.

९) उद्योग विषयक सुविधा व अर्थसाह्या पुरविणाऱ्या सर्व संस्थांच्या कार्यप्रणालीत समन्वय प्रस्थातीत करणे.

१०) लघुउद्योतकांना आवश्यक सर्व सेवा पुरविणे.

**जिल्हा उद्योग केंद्राची कार्ये (Functions of DIC)**

जिल्हा उद्योग केंद्राच्या स्थापनेचा मुख्य उद्देश म्हणजे लघुउद्योग घटकांना एकाच छताखाली सर्व प्रकारची आर्थिक मदत व सेवा उपलब्ध करून देणे आणि संस्थांनांच्या कार्यप्रणाली लघुउद्योगांच्या विकासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांचा मागोवा घेणे हा आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यात खालील बाबींचा समावेश होता.

१) उद्योजकांना उद्योग निवडीत मदत करणे.

२) उद्योजकांना प्रकल्प अहवाल तयार करण्यास मदत करणे.

३) भाडेखरेदी तत्वावर यंत्रसामग्री व साधनसामग्री मिळवून देण्यास मदत करणे.

४) सवलतीच्या दराने अर्थपुरवठा करणे.

५) जमिन, पाणी, वीज पुरवठा मिळवून देण्यास मदत करणे.

६) उद्योजकता शिबीरे भरवून राज्यात औद्योगिक वातावरण तयार करणे.

७) उद्योजकांना सर्वार्थाने मदत करणे.

८) नवीन स्थापन झालेल्या आणि अस्तित्वात असलेल्या लघु उद्योगाची नोंदणी करणे.
९) उत्पादन प्रक्रियेबाबत तसेच उत्पादनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने तांत्रिक मार्गदर्श करणे, निवडक वस्तू उत्पादनामध्ये दर्जात्मक पध्दती वापरून त्यांच्या बरोबरीचे संशोधन व विकास घडवून आणणे.
१०) औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण उपलब्ध करणे आणि परवाने मिळवून देणे.
११) औद्योगिक वसाहतील जागा मिळवून देणे. पायामभूत सोयी उपलब्ध करून देण.
१२)जिल्ह्यातील साधनसंपत्तीची माहिती गोळा करणे आणि आर्थिक सर्वेक्षण करणे.
१३) उद्योजकांना गुंतवणूकीबाबत योग्य कल्ला देणे.
१४) कच्चामाल, मानवी संसाधने, बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या तयार वस्तूबाबत अंदाज इत्यादी बाबत माहिती घेणे. तांत्रिक व आर्थिक प्रकल्प अहवाल तयार करणे.
१५) प्रस्तावित प्रकल्पांची शक्यता पडताळून पाहणे.

**(१) पंतप्रधान रोजगार योजना**

या योजने अंतर्गत स्वत:चा लघुउद्योग अथवा सेवा उद्योग सुरू करण्यासाठी दोन लाखापर्यंत तथापी व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाखापर्यंत कर्ज मिळू शकते या कर्जांवर व्याजदर १० टक्के ते १२ टक्के असतो. कर्जाची परतफेड ४ वार्षात मासिक पध्दतीने करायची असते.

**पात्रता**

१) अर्जदार कमीतकमी आठवी पास असावा.
२) अर्जदारचे वय पुरूषांसाठी १८ ते २५ आणि स्त्रियांसाठी १८ ते ४५ असावे.
३) उम्मेदवार संबंधीत जिल्ह्याचा ३ वर्षा पासून रहिवासी असावा.
४) कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ४० हजारापेक्षा कमी असावे.
५) स्वत:ची गुंतवणूक ५ टक्के असावी. कर्ज मागणी १ लाखापेक्षा अधिक असल्यास २२.५ टक्के असावी.

एकूण प्रकल्प गुंतवणूकीपैकी ९५ टक्केपर्यंत कर्ज बँक मंजूर करते. १ लाखापेक्षा अधिक कर्ज मागणीसाठी जामीनदाराची गरज असते. तसेच मालमत्ता गाहणखत करावे लागते. एकूण कर्ज मागणीवर १५ टक्के रक्कम किंवा जास्तीजास्त ७५०० रू . अनुदान मिळते.

**(२) बीज भांडवल योजना**

सरकाच्या सुधारित बीज भांडवल योजने अंतर्गत स्वत:चा उद्योग व्यवसाय सेवा घटक सुरू करण्यासाठी १० लाख रू.पर्यंत कर्ज मागणी करता येते. त्यापैकी ७५ टक्के रक्कम बँके मार्फत १५ टक्के रक्कम जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत आणि १० टक्के रक्कम

अर्जदारला भरावी लागते. बँकेच्या कर्जावर १२ टक्के ते १४ टक्के वार्षिक व्याज असून कर्जाची परतफेड ४ वर्षात बँकेला करावी लागते. जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत मिळालेल्या कर्जाची परतफेड तीन वर्षा नंतर सुरू होते. त्यानंतर ४ वर्षात वार्षिक हफ्त्याने परतफेड करावी लागते. याचा व्याजदर १० टक्के असतो. वेळेवर परतफेड केल्यावर व्याजदर ७ टक्के लावण्यात येतो.

**पात्रता**

१) या योजने अंतर्गत अर्ज करण्यासाठीची पात्रता म्हणजे अर्जदार सातवी पास असावा.

२) त्याचे वय १८ ते ५० वर्ष असावे.

३) तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

४) उत्पन्नाची अट नाही.

**(३) सामूहिक प्रोत्साहन योजना २००१**

राज्य सरकारने नवीन लघुउद्योग सुरू करणाऱ्या उद्योजकांना सवलती जाहिर केल्या होत्या. या सवलती १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००६ पर्यंत लागू होत्या. यासाठी औरंगाबाद शहर व तालुका ड गटात असून उर्वरित सर्व तालुके ड+ गटात आहेत. ड गटात लघुउद्योग सुरू केल्यानंतर एकून स्थिर भांडवल गुंतवणूकीच्या ३० टक्के अनुदान राशी आणि जास्तीत जास्त २० लाख रू. मिळते. ड+ गटात ३५ टक्के अनुदान राशी आणि जास्तीत जास्त २५ लाख रू. मिळते. वस्त्रोउद्योगाला (लघुउद्योग असल्यास) कर्ज घेतल्यास व्याजदरात ५ टक्के पर्यंत येणारी रक्कम परतावा म्हणून मिळते. ही रक्कम ड गटात ५ वर्षापर्यंत जास्तीत जास्त २०रू. लाख व ड+ गटात ६ वर्षा पर्यंत जास्तीत जास्त २५ लाख रू. ऐवढी आहे. आपला उद्योग औरंगाबाद शहरात (महा नगर पालिका क्षेत्रात) असल्यास ९ वर्षापर्यंत एकूण भांडवल गुंतवणूकीच्या १०० टक्के रक्कमे पर्यंत ऑक्ट्राय परतावा अनुदान राशी मिळू शकते. १५ वर्षा पर्यंत सर्व उद्योगांना वीज शुल्क माफ आहे. **जे उद्योग सध्या सुरू आहेत व ज्यात आणखी गुंतवणूक करून विस्तार करू इच्छितात त्यांना सुध्दा या सवलती आहेत.** अनुदान रक्कम फक्त नवीन उद्योगाच्या तुलनेत ७५ टक्के ऐवढी असेल. त्याच प्रमाणे नवीन उद्योगांना औद्योगिक क्षेत्रात जमीन खरेदीसाठी व कर्जासाठी गहाणखत करतांना मुद्रांक शुल्क व नोंदनी शुल्कात माफी आहे. जे उद्योग या सवलती उपभोगतात त्यांनी कमीत कमी आपला उद्योग १५ वर्षापर्यंत सुरू ठेवणे बंधनकारक आहे. अन्यथा या सवलती व्याजासह वसूल करण्याची तरतूद सदर योजनेत करण्यात आली आहे. थोडक्यात **स्वत:चा लघुउद्योग सुरू करून तो शिस्तबध्द पध्दतीने चालविल्यास यशस्वी उद्योजकांना राज्य सरकारने भरपूर पाठिंबा उपलब्ध करून दिला आहे.**

**४ उद्योगसेतू योजना**

**उद्योगसेतू ही नवी योजना डिसेंबर २००९ पासून सुरू होणार आहे.** उद्योजकांशी निगडीत विविध कागदपत्रे एकाच ठिकाणावरून ठरवून दिलेल्या मुदतीत मिळावी, उद्योजकांना दाखले, इतर परवाने घेण्यासाठी भटकंती करावी लागू नये या उद्देशाने राज्य शासनातर्फे कामगार आहे. यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे.

**उद्योगसेतू योजनेचा उद्देश**

उद्योजकांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारची प्रमाणपत्रे मिळवीत या उद्देशाने उद्योगसेतूची निर्मिती औद्योगिक संघटनांच्या सहकार्याने व जिंदा च्या पुढाकाराने सुरू आहे. त्यामुळे सर्वच उद्योतकांचा वेळ व श्रम वाचणार आहे.

उद्योगसेतू मुळे उद्योजकांना व उद्योग सुरू करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे दाखले, कागदपत्रे मिळविण्यासाठी भटकंती लागणार नसल्याने उद्योजकांना दिलासा मिळाला आहे. पूर्वी केवळ नागरिकांशी संबंधीत विविध दाखले, प्रमाणपत्रे , रेशनकार्ड इत्यादी कागदपत्रे मिळविण्यासाठी शासनातर्फे तहसील कार्यालय सूते सुविधा कक्षाची निर्मिती करण्यात आली होती. **उद्योजकांसाठी प्रथमच या प्रकारच्या उद्योगसेतूची निर्मिती केली जात आहे.**

**उद्योगसेतूचे कार्य**

१) उद्योगाशी निगडीत विविध शासकीय कायदे, नियम, योजनांची माहिती देणे.
२) सेवेचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शन करणे.
३) उद्योग उभारणीसाठी विविध शासकीय व निमशासकीय संस्थांकडून लागणारे विविध परवान्यासाठी मार्गदर्शन करणे.
४) निपटारा प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे.
५) ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे.
६) विविध सेवाबाबत मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे.
७) विविध कागदपत्रे मिळविण्यासाठी लागणारा उद्योजकांचा वेळ व श्रम वाचविणे.

**उद्योगसेतू योजनात मिळणाऱ्या सुविधा**

१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मिडळाशी संबंधीत उद्योग स्थापन करण्यासाठीचे प्रमाणपत्र देणे.
२) उत्पादन सुरू करण्याबाबतच्या प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे.
३) कामगार विभागाशी संबंधित बाष्पके तपासणी व प्रमाणपत्रे देणे.

४) बाष्पके मालकीहक्क बदल पमाणपत्रे देणे.
५) दुकान व आस्थापना अधिनियमाखालील नोंदणी प्रमाणपत्रे देणे.
६) इमारत नकाशास मान्यता देणे.
७) कारखाना अधिनियमाखालील परवाना प्रमाणपत्रे देणे.
८) नवीन वीजजोडणी प्रमाणपत्रे देणे.
९) नावात बदल प्रमाणपत्रे देणे.
१०) विजेच्या जादा मागणीमध्ये बदल प्रमाणपत्रे देणे.
११) शेतजमीनी खरेदी करून त्यावर उद्योग उभारण्याचा दाखला देणे.
१२) उद्योगांची प्राथमिक नोंदणी कायम स्वरूपी नोंदणीच दाखले देणे.
१३) लघु उद्योग व मोठ्या उद्योगांचे परवाने देणे.
१४) ना हरकत प्रमाणपत्रे देणे.
१५) इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्रे देणे.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्हा समन्वय समिती, प्रांन्तस्तरीय समन्वय समिती, केंद्रास्तरीय समन्वय समिती, सिग्मा कक्ष, जिल्हा उद्योग मित्र, जिल्हा सल्लागार समिती, विशेष भांडवल योजना, उद्योजकता विकास कार्यक्रम, जिल्हा पुरस्कार योजना, वीज व करमाफी तरतूद योजना, हस्तकलेसाठी उत्तेजनपर योजना, दुर्मिळ/आयात कच्चामाल वाटप व परवाना योजना, गुणमुद्र योजना वगैरे सारख्या अनेक योजना राबविल्या जात आहेत.

**लघुउद्योग नोंदणी (स्थायी व अस्थायी)**

नवीन उद्योग प्रस्तावित केल्यानंतर जिल्हा उद्योग केंद्रामार्फत अस्थायी लघुउद्योग नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. तसेच उद्योग सुरू झाल्यानंतर स्थायी लघुउद्योग नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. ज्या उद्योगात यंत्र सामग्रीची किंमत १ कोटी रू. पर्यंत आहे. त्यांना लघुउद्योग प्रमाणपत्र देण्यात येते.

**माहितीसाठी संपर्क**

विकास आयुक्त (उद्योग),
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत,
मंत्रालयासमोर , मुबंई- ४०००३२
तसेच सर्व जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्राशी अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

## ८.२.४ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) (Maharashtra Industrial Development Corporarion)

**स्थापना:**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना १९६२ मध्ये झाली. **राज्यातील विकसनशील भागात उद्योगाची सुनियोजित आणि जलद वाढ व्हावी या भूमिकेतून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली.** मुख्य कार्यालयाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्यादित.
मरोळ इंडस्ट्रियल एरिया, महाकाली केव्हज रोड,
**अंधेरी (पूव), मुंबई ४०००९३.**

**उद्देश:**

राज्यात जलद औद्योगिक विकासाला घडवून आणणे आणि ते करतांना औद्योगिकीकणाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत पायाभूत सोयी उद्योजकांना पुरविणे. उदा. विकसित भुखंड, वीज, पाणी, रस्ता इत्यादी या उद्देशाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंढळाची स्थापना करण्यात आली.

**कार्यक्षेत्र:**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात औद्योगिक वसाहत बसविणे. **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्य ३० जिल्ह्यात पोहोसचलेले आहे. त्यामुळे औद्योगिक विकेंद्रीकरणास मोठा हातभार लागला आहे.**

**कार्य:**

१) उद्योगासाठी योग्य प्लाट्स ताब्यात घेऊन पूर्ण विकसीत करून देणे.
२) तयार गाळे उपलब्ध करून देणे.
३) ९५ वर्षाच्या दीर्घकालीन करारावर जागा देणे.
४) तयार शेड रोखीचे व हप्तेबंदीने विकणे.
५) पाणीपुरवठा, वीज, रस्ते, टेलिफोन, जलनिस्सारण इत्यादी सोयांची मध्यवर्ती निर्मिती करणे.
६) पाणीपुरवठा योजनेचे नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापन करणे.
७) पोष्ट ऑफिस, बँक, वैद्यकिय सेवा, अग्निशामक सेवा इ. सोयीसाठी जागा उपलब्ध करून देणे.
८) औद्योगिक क्षेत्रांमध्ये प्रकाश व्यवस्थेसारख्या मुलभूत सेवा उपलब्ध करून देणे.

९) रासायनिक क्षेत्रात सांडपाण्साची योग्य रीतीने विल्हेवाट लावण्याकरीता व्यवस्था करणे.
१०) विविध प्रकारच्या सहकारी व गैरसरकारी प्रकल्पांची उभारणी करणे. उदा. निर्यातप्रधान औद्योगिक वसाहत, मध्यवर्ती सरकारी विकास केंद्रे इत्यादी.

**खास सोय:**

महाराष्ट्र वित्तीय महामंडळाबरोबर संयुक्त योजनेनुसार विशिष्ट भागात शेड व यंत्रसामग्रीसाठी कर्ज पुरवठा करणे.

राज्यातील २७२ एकूण औद्योगिक क्षेत्रात विकासाची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने घेतली. ३९८७१ हेक्टर जागेचा पुरवठा झाला. ४३५७ या जवळजवळ औद्योगिक शेडस्‌चे बांधकाम झालेले आहे. औद्योगिक सहकारी सोसायट्यांची स्थापना करण्यात आली. पुणे, औरंगाबाद, नागपुर येथे इलेक्ट्रॉनिक औद्योगिक वसाहती पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे तारापूर येथे निवासासाठी ४७४ घरे बांधून पूर्ण झालेली आहेत.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रगती**

| अ. क्र. | बाब | प्रगती निर्देशांक |
|---|---|---|
| १ | एकूण औद्योगिक क्षेत्रे | २७२ |
| २ | दिल्या गेलेल्या प्लॉटस्‌ची संख्या | ३९८७१ |
| ३ | दिलेल्या प्लॉटस्‌चे एकून क्षेत्र | १५७०६ |
| ४ | बांधलेल्या शेडस् व गाळ्याची संख्या | ४३५७ |
| ५ | पाणीपुरवठा योजनावर केलेला खर्च | ३८१ |
| ६ | बांधलेल्या रस्त्यांची लांबी | १८९६ |
| ७ | औद्यागिक क्षेत्रात उद्योग संस्थांची सख्या | १७३२५ |

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलले कार्य**

१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने प्रत्येक जिल्ह्यात कमीतकमी एक औद्योगिक क्षेत्र स्थापन करून तेथे उद्योगांना आवश्यक सोयी उपलब्ध करून दिल्या.
२) तयार शेडस् व गाळे उपलब्ध करून देणे.
३) पाणीपुरवठा, वीज, रस्ते, टेलिफोन, जलनिस्सारणाच्या सोयी पुरविल्या.
४) रासायनिक क्षेत्रात सांडपाण्याची योग्यरीतीने विल्हेवाट लावण्याकरीता व्यवस्था केली.
५) इलेक्ट्रॉनिक विभागांची निर्मिती करण्यात आली.
६) महाराष्ट्र रासायनिक उद्योगाच्या स्थापनेसाठी अनुकूल वातावरण निर्मिती घडवून आणली.

७) राज्यात सर्व प्रकारच्या उद्योगांची स्थापना घडून यावी, विदेशी गुंतवणूकदारांना औद्योगिक क्षेत्रात थेट गुंतवणूक करता यावी, विकास प्रक्रियेत गतिमानता यावी म्हणून पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रांची स्थापना केली गेली.

८) प्रदूषित सांडपाण्याची निचरा व्यवस्था केली.

९) विमानतळ, धावपट्ट्या बांधल्या.

१०) औद्योगिक क्षेत्रात उद्योगाची उभारणी करण्यास उद्योजकांना प्रवृत्त केले.

औद्योगिक वसाहतीसाठी उपयुक्त जमिनीचा शोध घेऊन त्या ताब्यात घेण्याचा अधिकार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला आहे. औद्योगिक कारणामूळे, व्यापारी कारणामुळे आणि राहण्यासाठी जागेचे दर वेगवेगळे आकारले जातात.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसनशील भागात उद्योगधंद्यांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले असले तरी या भागात पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे.

## ८.२.४ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ(MSFC) (Maharashtra State Finincial Corporation)

१९५६ या औद्योगिक धारेणानुसार केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेच्यापुढाकाराने देशात अनेक वित्तीय संस्था स्थापन करण्यात आल्या. याचबरोबर राज्य सरकारांनी राज्यातील विभागीय असंतुलन दूर करणे व लघु उद्योगांचा विकास करणे यासाठी वित्तीय संस्था उभारण्यात आल्या.

**स्थापना:**

राज्य पातळीवर मध्यम आणि लघु उद्योगांना मध्यम आणि दीर्घकालीन वित्तपुरवठा करण्यासाठी राज्य वित्तीय महामंडळ स्थापन करण्यासाठी भारताच्या संसदेत २८ सप्टेंबर, १९५१ रोजी राज्य वित्तीय महामंडळे कायदा संमत करण्यात येऊन राज्यांना आपापल्या प्रदेशात वित्तीय महामंडळा स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला. १९५३-५४ याकाळात मुबंई, केरळ, पश्चिम बंगाल या प्रांतात राज्य वित्तीय महामंडळ स्थापन करण्यात आले.

**एप्रिल १९६२ मध्ये महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाची स्थापना राज्य वित्तीय महामंडळ कायदा १९५१ नुसार करण्यात आली.** या महामंडळाचे कार्यक्षेत्र १९६४ मध्ये गोवा, दमण व दिव पुरते विस्तावित झाले.

**व्यवस्थापन:**

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे व्यवस्थान संचालक मंडळाकडून होते. या मंडळाला कार्यकारी समिती आणि व्यवस्थापकीय संचालक मदत करतात. सध्या १२ सभासद

संचालक मंडळात आहे. यापैकी चार सभासदांची नियुक्त राज्य सरकार आणि दोन सभासदांची नियुक्ती भारतीय औद्योगिक बँक करते. संचालक मंडळावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा एक सभासद नियुक्त होतो. इतर सभासद विमा कंपनी गुंतवणूक न्यास आणि इतर वित्तीय संस्थांकडून नियुक्त केले जातात.

व्यवस्थापकीय संचालकाशिवाय एक संचालक राज्य सरकारकडून मंडळाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त केला जातो. राज्य वित्तीय महामंडळ कायदा १९५१ च्या कलम १७ (१) अंतर्गत व्यवस्थापकीय संचालक हा पूर्ण वेळ संचालक असतो. त्याची मुदत चार वर्ष असते.

**कामाकज:**

महामंडळाचे नऊ विभागीय कार्यालय तीन क्षेत्रीय कार्यालय २० शाखा कार्यालयामार्फत कामकाज चालते. **मुबंई येथे मुख्य कार्यालय आहे.** या महामंडळाचे भांडवल अनेक स्त्रोतातून साधन–सामग्री उभारते स्वत:चे भाग भांडवल ठेवी रोखे कर्ज रोखे राखीव निधी भारतीय औद्यागिक विकास बँकेकडून कर्ज या मार्गाने भांडवल जमा करते.

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे कार्य**

**१) मध्यम व लघुउद्योगांना वित्तीय साहाय्य देणे:**

मालकी व भागीदारी उद्योजकांना ३० लाखपर्यंत व मर्यादित कंपन्याना ६० लाखपर्यंत जास्तीत जास्त १० वर्ष मुदतीचे कर्ज दिले जाते. केंद्र व राज्य शासनाच्या औद्योगिक धोरणाशी सुसंगत औद्योगिक क्षेत्राच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या कार्यात विविधीकरण व व्याप्तीत वाढ करून १४ विविध कर्ज योजना अंमलात आणणे.

**२) हमी देणे:**

राज्यातील उद्योगांना अर्थ पुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून व्यापारी बँक किंवा इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले असेल तर त्या कर्जाची हमी महावित घेते. याशिवाय मध्यम व लघुउद्योगांनी उधारीवर घेतलेल्या यंत्रसामग्रीसंबंधीची हमी देण्याचे कार्य करते.

**३) उद्योगाचा भाग व कर्ज रोख्याची खरेदी करणे:**

राज्यातील नवीन उद्योगांना भांडवल उभारणे सुलभ जावे म्हणून हे कार्य महावित्त करते.

**४) कर्ज योजना:**

तंत्राज्ञ साह्या योजना संशोधन व विकास साह्या सुशिक्षित बेरोजगारांसाठी कर्ज दुर्बल घटक उद्योजकांना साह्या निर्देशित मागास जिल्ह्यांना पुर्नवित्त आजारी उद्योगाचे पुर्नवसन अशा अनेक योजनांच्या माध्यमातून महावित्त आर्थिक साह्या उपलब्ध करुन देते.

**५) इतर:**

तंत्रज्ञ नवे उद्योजक सुशिक्षित बेकार यांना कर्ज वाटपात प्राधान्य दिले जाते. केंद्र सरकारने घोषित केलेल्या मागास जिल्ह्यांना उदारपणे आवश्यक त्या सोयी व अर्थ पुरवठा महावित्त उपलब्ध करून देते. अविकसीत जिल्ह्यातील उद्योजकांना नोंदणी खर्च अथवा स्टँप ड्युटी माफ केली जाते. बीज भांडवल योजना राबविली जाते. लिजिंग तत्वावर कर्ज देणे व मर्चंट बँकींग ही कार्य देखील महावित्त करते.

**महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने केलेल्या वित्तपुरवठा**

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या मध्यम उद्योग, लघुउद्योगांना दीर्घमुदतीचा वित्तपुरवठा करण्यासाठी विविध योजना आहेत. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने ३१ मार्च, २००५ पर्यंत ४९८६ कोटी रूपयांची मंजूर केली. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ८७६९ कोटी रूपयांची गुंतवणूक घडून आली.६३८०० उद्योजकानां कर्जपुरवठा करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने वित्तपुरवठा केल्यामूळे आतापर्यंत १५ लाखांपेक्षा अधिक व्यक्तीला रोजगार पुरविला आहे.

## ८.२.६ महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित (MSSIDC) (Maharshtra Small Scale Industries Development Corporation Limited)

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची स्थापना १९६२ ला झाली. त्यांनतर पब्लिक लिमिटेड कंपनी म्हणून नोंदणी करण्यात आली. लघुउद्योजकांना कच्चामालाचा पुरवठा करणे तसेच विपणन साहाय्य देणे या प्रमुख उद्देशाने स्थापना करण्यात आली.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित<br>
कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग,<br>
बॅल्लार्ड इस्टेट, मुंबई ४००००१.

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची कार्य**

लघुउद्योजकांना विविध गरजांची पूर्ती करणारे एक अग्रगन्य लघुउद्योग विकास महामंडळ म्हणून ते कार्यरत आहे. महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ खालील कार्य करते.

१) लघुउद्योजकांना विविध बाबींवर सल्ला देणे.

२) विपणन साहाय्य करणे.

३) तांत्रिक व व्यवस्थापनाबद्दल प्रशिक्षण देणे.

४) व्यापारी गोदाम सेवा, आयात-निर्यात सेवा यावर लक्ष केंद्रीत केले.
५) कच्चामालाचा पुरवठा करणे.
६) प्रदर्शन व व्यापारी मेळावे भरविणे.
७) विविध  वस्तूंचे दर करार निश्चित करून या वस्तू शासकीय, निमशासकीय संस्थांना पुरविणे.
८) हस्तकला विकास व हस्तकला वस्तूंच्या विक्रीची व्यवस्था करणे.
९) ताग सेवा केंद्राची स्थापन केलीत.
१०) लघुउद्योजकांसाठी आयात केलेला मालाचा साठा करण्याची व्यवस्था केली.
११) लघुउद्योजकांच्या उत्पादनाची निर्यातीसाठी साहाय्य करणे.
१२) पॅकिंग क्रेडिट तसेच निर्यात कोटा मिळवून देणे.
१३) परदेशी खरेदीदार मिळवून देण्याची शक्यता पडताळणे.
१४) मालाच्या निर्यातीसाठी व संबंधित कागदपत्रे तयार करण्यासाठी  मदत करणे.

**निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू**

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळातर्फे तयार कपडे, दागिने, यंत्रसामग्री चामड्याच्या वस्तू, सुती कपडा व इतर उत्पादने, हस्तकलेच्या वस्तू निर्यात केल्या जातात. अनेक युरोपियन देश, अमेरीका, ऑस्ट्रेलिया, मध्य-पूर्व आणि ऑफ्रिका खंडाचा काही भाग ही बाजारपेठ आहे.

## ८.२.७ महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक सल्लागार संघटना (MITCON) (Maharashtra Industrial and Technical Consultancy Organisation)

लघुउद्योग आणि मध्यम उद्योग क्षेत्रांमधील उद्योजकांना, त्यांच्या गरजेनुसार व तत्परतेने, तंत्रज्ञानविषयक सल्ला प्राप्त व्हावा हे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेऊन १९८२ ला महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक सल्लागार संघटना स्थापन झाली. यासाठी भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळाने पुढाकार घेतला होता. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, औद्योगिक वित्त महामंडळ, औद्योगिक विकास बँक, सिकॉम, मेल्ट्रॉन इत्यादी संस्थांचे मिटकॉनच्या भांडवलामध्ये योगदान होते. त्यावेळेस मिटकॉनचे भाग भांडवल २० लाख रूपये होते.

**मिटकॉनचे उद्दिष्ट**

प्रत्येक मोठ्या उद्योगामध्ये विविध तज्ञ असतात. उद्योगपतीला किंवा व्यवस्थापकांना काही समस्या निर्माण झाली तर त्या समस्यांचे तत्परतेने निराकरण होऊ शकते. लघु उद्योगांमध्ये व मध्यम आकाराच्या उद्योगांमध्ये उत्पादनच्या क्षेत्रांमध्ये अनेक गतिरोधक व समस्या उद्‌भवतात. यावेळी उद्योजकांना तंत्रज्ञानविषयक सल्ला, मार्गदर्शन

व मदतीची आवश्यकता असते. अशावेळी उद्योजकांना एकाच छपराखाली सल्ला, मार्गदर्शन व मदत सहजपणे व योग्य दराने उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे. मिटकॉन ही विशेषज्ञांची संघटन आहे.

**मिटकॉनची कार्य**

१) विशिष्ट प्रदेशातील हवामान, तेथे असलेली संसाधने, विकासाची संरचना उदा. रस्ते, पाणी, वीज इत्यादी बाबींचा विचार करून तेथे विशिष्ट उद्योग स्थापन करावा काय या प्रश्नांचे उत्तर मिळविणे.

२) उद्योजकांनी तयार केलेल्या उद्योगांच्या रूपरेषेचे मुल्यमापन करणे.

३) उद्योजकांसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे.

४) उद्योगांचे आधुनिकीकरण करण्यासाठी उद्योजकांना अहवाल तयार करून देणे.

५) उद्योग अद्यावत व्हावेत यासाठी उद्योजकांनी तयार केलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

६) बाजारपेठ संशोधन करणे.

७) प्रादेशिक विकासाची रूपरेषा तयार करणे.

८) उद्योगांच्या आजारपणाची मिमांसा करणे.

९) उद्योगांच्या आजारपणाची नेमकी कोणती कोणती करणे जबाबदार आहेत ते ठरविले.

१०) आजारी उद्योगांच्या पुनर्वसनासाठी कार्यक्रम तयार करणे.

११) उद्योजकांना तत्रज्ञानविषयक सल्ला देणे.

१२) उद्योजकांना प्रशासनविषयक सल्ला देणे.

१३) उद्योजकतेची वाढ व्हावी, समाजात नवीन उद्योजक तयार व्हावेत आणि उद्योजकांना त्यांची योग्यता वाढविता यावी यासाठी विविध प्रकारचे उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित करणे.

१४) समाजात उद्योजक बनविण्यासाठी आवश्यक असलेली सुप्त गुण व योग्यता असलेल्या व्यक्तींना हेरून त्यांना उद्योजक बनण्यासाठी आवश्यक ती मदत करणे.

१५) वस्तूंचे विपणन, वस्तूंची बाजारपेठ, स्पर्धा, विदेश व्यापार, ग्राहकांच्या आवडी, मागणी निर्मिती इत्यादी बाबतीत उद्योजकांना मदत करणे.

१६) उद्योजकांना विचार करण्यासाठी व कृती करण्यासाठी अभिप्रेरित करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशी शिबीरे व चर्चासत्रांचे आयोजन करणे.

१७) उद्योगांमध्ये ऊर्जेचा व्यवस्थितपणे वापर व्हावा यासाठी उद्योजकांना मार्गदर्शन करणे.

१८) उद्योजकांना तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करणे.

मिटकॉन उद्योग/व्यवसाय यांना मार्गदर्शन करणारी एक महत्वाची संस्था आहे.

## ८.३ परिभाषिक शब्द

## ८.४ स्वयं अध्ययन प्रश्न

प्रश्न १ : नोंदणी प्रक्रिया व त्याचे टप्पे थोडक्यात स्पष्ट करा?

प्रश्न २ : नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे थोडक्यात स्पष्ट करा?

प्रश्न ३ : जिल्हा उद्योग केंद्रचे कार्य व उद्देश विशद करा?

प्रश्न ४ : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची भुमिका थोडक्यात स्पष्ट करा?

## ८.५ सारांश

## ८.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न१ : नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे स्पष्ट करा

प्रश्न २: नोंदणी प्रक्रिया व त्यातील टप्पे सविस्तर वर्णन करा

प्रश्न ३: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सविस्तर माहिती लिहा

प्रश्न ४: महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे कार्य स्पष्ट करा

प्रश्न ५: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाचे वर्णन करा

प्रश्न ६: महाराष्ट्र औद्योगिक आणि तांत्रिक सल्लागार संघटनेची सविस्तर माहिती लिहा

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.येवले, अरून; सुखदाणे, छाया आणि चौधरी, अरविंद (२०१०) उद्योजकता विकास, जळगांव: प्रशांत पब्लिकेशन.

२.कडवेकर, व्ही.; रावळ सी. ए. आणि कोठावदे, आर. (२००५) व्यवसायिक उद्योजकता,पुणे : डायमुड बुक डेपो

३.कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर, (२००६) व्यवसायिक उद्योजकता-२, पुणे : डायमंड बुक डेपो

४. कडवेकर, व्ही. आणि कोठावदे, आर, (२००७) व्यवसायिक उद्योजकता-३, पुणे : डायमंड बुक डेपो

५.देशमुख,प्रभाकर(२००२)उद्योजकता विकास, नागपुर :पिंपळापुरे ॲण्ड कंपणी पब्लिशर्स

**6. Khan] M.A, (1992) Entrepreneurial Development in India, New Delhi: Kanishka Publishing House**

**7.Khanka, S.S. (2001) Entrepreneueship Development, New Delhi: S.Chand & Co.**

**8.Desai, Vasant (2001) Dynamics of Entrepreneur Development and Management, New Delhi:**

**9.Gupa, C.B. (1999) Entrepreneurship and Small Business Management, New Delhi: S Chand & Co.**